
CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, ८ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ३२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**विनम्र अभिवादन**



श्री संताजी महाराज जगनाडे यांची आज जयंती

# बांगलादेशात मंदिरे जाळली



बांगलादेशच्या ढाका शहरात दोन मंदिरे जाळण्याच्या निषेधार्थ देशात ठिकठिकाणी तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. कोलकाता, जम्मू, डोडासह विविध भागांमध्ये नागरिकांनी बांगलादेशचा धिक्कार केला

## हिंदूंवरील अत्याचारांची मालिका सुरूच

◆ **कोलकाता, ७ डिसेंबर**

बांगलादेशातील ढाका जिल्ह्यात असलेली मंदिरे शुक्रवारी जाळण्यात आली, असा दावा इस्कॉनने शनिवारी केला. इस्कॉनचे सदस्य आणि वैष्णवांवर लक्ष्यित हल्ले सुरूच आहेत. नामहट्टाची संपत्ती असलेली येथील दोन मंदिरे व त्यातील मूर्ती जाळण्यात आल्या, अशी माहिती इस्कॉन कोलकाताचे अध्यक्ष राधारमण दास यांनी वृत्तसंस्थेला दिली.

बांगलादेशातील इस्कॉनचे मंदिर जाळण्यात आले. ढाक्यातील श्री श्री लक्ष्मीनारायणाची मूर्ती आणि मंदिरातील इतर सर्व सामान पूर्णतः जाळण्यात आले, असे राधारमण दास यांनी 'एक्स'वरील पोसिटमध्ये म्हटले आहे.

ढाका जिल्ह्यातल्या तुरग पोलिस ठाणे हद्दीतील धौर गावातील हरे कृष्ण नामहट्ट संघाचे श्री श्री राधाकृष्ण मंदिर आणि श्री महाभाग्य लक्ष्मीनारायण मंदिर आज पहाटे २ ते ३ वाजताच्या सुमारास काही समाजकंटकांनी जाळले, असे या पोस्टमध्ये म्हटले आहे. मंदिराच्या मागील भागातल्या छतावरचे टिन उचकटून पेट्रोल किंवा इतर ज्वलनशील पदार्थांचा वापर करून आग लावण्यात आली.

इस्कॉनने बांगलादेशातील अंतरिम सरकारचे लक्ष वेधले असतानाही येथे हिंदूंवरील हल्ले कायम आहेत. या संदर्भात दिलेल्या तक्रारींवर पोलिस आणि प्रशासनाकडून काहीही केले जात नाही, असा आरोप दास यांनी केला.

इस्कॉनच्या नामहट्ट केंद्रावर झालेल्या हल्ल्याचा व जाळपोळीचा तीव्र निषेध करतो. या हल्ल्यात श्री श्री लक्ष्मीनारायणाची मूर्ती आणि मंदिरातील इतर वस्तू जाळण्यात आल्या, असे भाजपाचे बंगालमधील प्रदेशाध्यक्ष सुकांता मुजुमदार यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### इस्कॉनच्या संपत्तींवर चार महिन्यांपासून हल्ले

अटक करण्यात आलेले इस्कॉनचे चिन्मय प्रभू यांना नाकारलेला जामीन आणि हिंसक हल्ल्यांच्या पृष्ठभूमीवर त्यांच्या सुरक्षिततेबद्दलही राधारमण दास यांनी चिंता व्यक्त केली. अवामी लीग सत्तेतून बेदखल झाल्यानंतर अंतरिम सरकार सत्तेत आल्यापासून इस्कॉनच्या संपूर्ण बांगलादेशातील संपत्तींवर मागील चार महिन्यांपासून हल्ले सुरू आहेत.

# १७३ नवनिर्वाचित आमदारांनी घेतली शपथ



सदस्यत्वाची शपथ घेताना देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार

◆ **मुंबई, ७ डिसेंबर**

आजपासून महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात झाली असून, ७ ते ९ डिसेंबर या कालावधीत तीन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात १७३ नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांचा शपथविधी पार पडला. उर्वरित सदस्यांना रविवारी शपथ दिली जाणार आहे.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी विधानसभा सदस्य कालिदास सुलोचना निळकंठ कोळंबकर यांची विशेष अधिवेशनासाठी हंगामी अध्यक्ष म्हणून निवड केल्याची घोषणा विधानसभेत करण्यात आली. त्यानंतर हंगामी अध्यक्षांनी दिवसाच्या कामकाजाला सुरुवात केली. यावेळी कालिदास कोळंबकर यांनी नवनिर्वाचित सदस्यांना सदस्यपदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली.

शपथविधीचा श्रीगणेशा मलकापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार चैनसुख संचेती यांच्यापासून करण्यात आला. पहिल्या क्रमांकावर संचेती यांनी शपथ घेतली. त्यानंतर सिंदखेडराजाचे आमदार जयकुमार रावळ, सिन्नरचे माणिकराव कोकाटे, चवथ्या स्थानावर रामटेकचे आशिष जयस्वाल यांनी शपथ घेतली.

**मुख्यमंत्र्यांनी घेतली पाच क्रमांकावर शपथ**

पहिल्या चार सदस्यांची शपथ झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाचव्या क्रमांवार शपथ घेतली. मुख्यमंत्री फडणवीस यांचा शपथविधी सुरू असताना सभागृहात आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी उपस्थित आमदारांकडून जय श्री राम तसेच छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देण्यात आल्या. त्यानंतर सहाव्या आणि सातव्या क्रमांकावर उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवारांना शपथ देण्यात आली. ◀(तभा वृत्तसेवा)

## विरोधकांचा शपथविधीवर बहिष्कार

◆ **मुंबई, ७ डिसेंबर**

विशेष अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांनी सभात्याग करीत, शपथविधीवर बहिष्कार टाकला. ईव्हीएम विरोधात ही भूमिका घेतली असल्याचे सांगण्यात येत होते.

सकाळी शपथविधीला सुरुवात झाल्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शपथ घेईस्तोवर विरोधक सभागृहात उपस्थित राहिले. त्यानंतर लगेच कुठलीही घोषणा न करता, निषेध न नोंदवता एकमेकांना इशारे करून सभागृहाबाहेर जायला सुरुवात केली. यावेळी उबाठा गटाचे आदित्य ठाकरे, भास्कर जाधव वगळता महाविकास आघाडीतील अन्य कोणाताही मोठा नेता उपस्थित नव्हता. सत्ताधारी बाकांवरून बर्हिगमन करत असलेल्या विरोधकांना मुद्दाम छेडखानी करण्यासाठी कॉमेन्ट पास केले जात होते. लोकशाही चिरडण्याचे काम या सरकारने केले, असा आरोप विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जितेंद्र आव्हाड यांनी केला. जनतेत या विजयाबाबत आनंद नाही. जनतेच्या भावनांचा विचार करीत आम्ही शपथविधीवर बहिष्कार टाकत असल्याची घोषणा त्यांनी केली.

**सभागृहात बसता येणार नाही : अजित पवार**

विरोधकांनी शपथविधीवर बहिष्कार टाकला. त्याचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चांगलाच समाचार घेतला. जे आमदारकीची शपथ उद्यापर्यंत घेणार नाहीत, त्यांना विधानसभेत बसता येणार नाही, असे अजित पवार यांनी विरोधकांना ठणकावले. ◀(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### महादेव ॲप प्रकरणात ३८८ कोटींची संपत्ती जप्त

**नवी दिल्ली :** छत्तीसगडमधील मोठे राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सहभाग असलेल्या महादेव ॲपमधील 'मनी लॉंड्रिंग' तपासात ३८८ कोटी रुपयांची संपत्ती नव्याने जप्त करण्यात आली, अशी माहिती अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने शनिवारी दिली. यात मॉरिशस येथील कंपनी टॅनो इन्व्हेस्टमेंटर अपॉर्च्युनिटीज फंडाने दुबईतील हवाला ऑपरेटर हरीशंकर टिब्रेवालशी संबंधित एफपीआय आणि एफडीआयच्या माध्यमातून केलेली गुंतवणूक आणि प्रवर्तकांच्या नावे छत्तीसगड, मुंबई आणि मध्यप्रदेशातील कित्येक सट्टेबाजी ॲप्सचा समावेश आहे. बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत ५ डिसेंबर रोजी एकूण ३८७.९९ कोटी रुपये मूल्य असलेल्या संपत्तीच्या जप्तीचा आदेश जारी करण्यात आला. या प्रकरणात ईडी टिबेरवालची चौकशी करीत आहे.

### मणिपूरमध्ये दारुगोळा जप्त

**इम्फाळ :** मणिपूरच्या थौबल जिल्ह्यात मोठ्या प्रमाणातशस्त्रास्त्रे आणि दारुगोळ्याचा साठा जप्त करण्यात आला, अशी माहिती पोलिसांनी शनिवारी दिली. पेची चिंकलांगच्या पायथ्याशी राबवण्यात आलेल्या शोधमोहिमेत ही जप्ती करण्यात आली.

# धनादेश अनादरप्रकरणी जमानतदारास सश्रम कारावास

◆ **बुलढाणा, ७ डिसेंबर**

कर्ज परतफेड करण्यासाठी पतसंस्थेला दिलेला धनादेश अनादरित झाल्याप्रकरणी जमानतदारास सश्रम कारावासाची शिक्षा येथील सत्र न्यायाधीश एस. एम. जोशी यांनी ठोठावली.

शिवसाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बुलढाणा रजि. नं. ३४४ च्या तुळशीनगर शाखेकडून प्रल्हाद भीमला राठोड रा. बुलढाणा यांनी कर्ज घेतले होते. त्या कर्जाचा भरणा करण्यास कर्जदाराने टाळाटाळ केल्याने त्याचे कर्ज खाते एनपीएमध्ये गेले. त्यामुळे पतसंस्थेमार्फत वसुली कारवाईदरम्यान आरोपी व जमानतदार यांच्याकडे थकित कर्ज रकमेची मागणी करण्यात आली.

या प्रकरणातील जमानतदार प्रकाश सखाराम चव्हाण याने थकित कर्ज रक्कम भरण्यापोटी २ डिसेंबर २०१७ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बुलढाणाचा ३ लाख २० हजार रुपयांचा धनादेश दिला. मात्र, आरोपीने पतसंस्थेला दिलेला धनादेश वटविण्याकरिता पतसंस्थेने बँकेकडे जमा केला असता, तो अनादरित झाला.

त्यानंतर पतसंस्थेने वकिलामार्फत रजिस्टर नोटीस पाठविली. परंतु, आरोपी प्रकाश चव्हाण याने कर्ज परतफेडीकरिता दिलेल्या धनादेशाची रक्कम विहित मुदतीत पतसंस्थेकडे जमा न करता, मागणी नोटीसची पूर्तता केली नाही. त्यानंतर पतसंस्थेमार्फत वसुली अधिकारी रमेश देशमुख यांनी न्यायालयात फौजदारी खटला दाखल केला होता.

संबंधित प्रकरणातील सर्व न्यायालयीन कारवाई पार पाडल्यानंतर न्या. एस. एम. जोशी, यांनी बुधवार ४ डिसेंबर रोजी आरोपी प्रकाश चव्हाण यास ३ महिने सश्रम कारावास व ४ लाख ५० हजार रु. दंडाची शिक्षा ठोठावली. दंडाची रक्कम तत्काळ भरावयाची आहे. न भरल्यास आरोपीस १ महिना शिक्षा भोगावी लागेल. तक्रारकर्ता पतसंस्थेकडून ॲड. उदय कारंजकर यांनी युक्तिवाद केला. ◀(तभा वृत्तसेवा)

### मिलिंद नार्वेकरांच्या पोस्टमुळे अबू आझमी मविआतून बाहेर

(पान ३ वर) ▶

### ऑस्ट्रेलियाची सामन्यावर मजबूत पकड

(पान ६ वर) ▶

## समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध

◆ **नवी दिल्ली, ७ डिसेंबर**

८५ नवीन केंद्रीय विद्यालये उघडण्यास मान्यता देऊन सरकारने शालेय शिक्षण शक्य तितके सुलभ करण्याचा निर्णय घेतला आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सांगितले.



केंद्र सरकारने उचललेल्या या पावलामुळे अनेक विद्यार्थ्यांना फायदा होईल तसेच नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असे मोदी यांनी ठामपणे सांगितले.

शालेय शिक्षण शक्य तितके सुलभ करण्याचा आणखी एक मोठा निर्णय आमच्या सरकारने घेतला आहे. याअंतर्गत देशभरात ८५ नवीन केंद्रीय विद्यालये उघडली जाणार आहेत. या पावलामुळे मोठ्या प्रमाणातील विद्यार्थ्यांचा फायदा होईल तसेच रोजगार निर्मितीही होणार आहे, असे मोदी यांनी 'एक्स'वर हिंदीत केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार समाजातील प्रत्येक घटकाला शालेय शिक्षण देण्यास सरकार कटिबद्ध आहे. त्याचाच एक भाग म्हणून केंद्र सरकारने देशभरात २८ नवीन केंद्रीय विद्यालये सुरू करण्यास मंजुरी दिली. यामुळे निवासी आणि दर्जेदार शालेय शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विस्तार होईल, असे मोदी यांनी हिंदीतील दुसऱ्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

देशभरातील जोडणी वाढवण्यासाठीही सरकार वचनबद्ध असल्याचे मोदी यांनी म्हटले. त्या दिशेने आमच्या सरकारने राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्यातील रिठाला-कुंडली कॉरिडॉरला मंजुरी दिली. यामुळे दिल्ली आणि हरयाणातील प्रवाशांना सुलभता मिळेल, असे त्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)






## संक्षिप्त वृत्त



### सौम्य तीव्रतेचा ताण पोषक असतो : डॉ. बुरटे

**सोलापूर. दि. ७ डिसेंबर -**

जीवनात ताण हा असलाच पाहिजे. ताण असल्याशिवाय प्रगती होत नाही. प्रगती खुंटते. त्यामुळे आपली प्रगती होण्यासाठी सौम्य तीव्रतेचा ताण पोषक असल्याचे डॉक्टर निहार बुरटे यांनी सांगितले. डॉक्टर बुरटे हे मनोदय न्यूरोसायकियाट्रिक सेंटरचे सल्लागार मानसोपचारतज्ज्ञ आणि संचालक आहेत. सिंहगड इन्स्टिट्यूट अंतर्गत इंटर्नल क्वालिटी अश्युरन्स सेल आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थने सिंहगड इन्स्टिट्यूट च्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. हे चर्चासत्र सिंहगड इन्स्टिट्यूट च्या कॅम्पसमध्ये पार पडले. यास चांगला प्रतिसाद लाभला. यावेळेस प्राचार्य शंकर नवले, रोटरी नॉर्थ च्या अध्यक्षा जानवि माखिजा, संचालक सुनील दावडा, संतोष सपकाळ, दीपक आर्वे, आसावरी सराफ यांची उपस्थिती होती. मान्यवरांचा सत्कार डॉक्टर प्रा. प्रदीप तपकीरे, प्रा. विजयकुमार बिरादार, प्रा. ए के शेख यांनी सन्मान केला. या चर्चासत्रात पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह ताण यातील फरक सांगितला. अंतर्गत, बाह्य, विकासात्मक, परिस्थितीजन्य आणि तीव्र ताण असे प्रकार असल्याचे सांगून यातून बाहेर पडण्यासाठी काय करावे यावर बहुमूल्य मार्गदर्शन केले. शेवटी सिंहगड इन्स्टिट्यूट च्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांनी काही प्रश्न विचारून शंकांचे समाधान करून घेतले. सूत्रसंचालन प्रा. आयेशा आलीम यांनी केले.



### शौर्य दिनानिमित्त विश्व हिंदू परिषद, बजरंग दलातर्फे महाआरती

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

शौर्य दिनानिमित्त विश्व हिंदू परिषद बजरंग दलातर्फे शुक्रवारी दाजी पेठ येथील श्रीराम मंदिरात महाआरती उत्साहात करण्यात आली. यावेळी विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत मार्गदर्शक मंडळाचे हभप लक्ष्मण महाराज चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष हभप अभिमन्यू महाराज डोंगरे, आ. देवेंद्र कोठे, भाजपचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, भाजपाचे माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, भाजपाचे शहर उपाध्यक्ष जय साळुंके, माजी नगरसेवक गुरूशांत धुत्तरगावकर, माजी नगरसेवक मेघनाथ येमूल, दत्तात्रय पोसा, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री संजय जमादार, सहमंत्री बाबू गिरगल, कोषाध्यक्ष हितेश माधु यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रभू श्रीरामांची महाआरती करण्यात आली. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे सर्व जिल्हा कार्यकर्ते बजरंग दलाचे जिल्हा संयोजक सिद्राम चरकुपल्ली, सहसंयोजक नागेश बंडी, रवी बोल्ली, अमित सारोळकर, सोलापुरे, लुटे तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रंगनाथ बंकापुर, जगदीश् कर्रे, अधिवक्ता परिषदेचे ॲड. शांतीवीर महिन्द्रकर उपस्थित होते.

### परशुराम गुंडेली यांचे निधन



**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

परशुराम व्यंकय्या गुंडेली (वय ९०) यांचे शुक्रवारी रात्री ९ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली व नातवंडे असा परिवार आहे. ते पद्मशाली शिक्षण संस्थेचे माजी सचिव, सोलापूर पावरलुम फेडेरेशनचे माजी अध्यक्ष, शारदा सहकारी सूत गिरणीचे माजी संचालक व यंत्रमागधारक संघ, सोलापूरचे माजी संचालक या विविध पदांवर त्यांनी काम केले.

### जाहीर समन्स

रेमुनं. १००९/२०२१

**सोलापूर येथील मे. सिव्हिल जज्ज सिनियर डिव्हिजन न्यायालय सो, यांचे कोर्टात**

**(मे. श्री. जहागिरदार जज्ज साहेब)**

**मे. सोलापुर ई कॉन रेसिफाईनचे भागीदार,**
**१) श्री. दुर्गाप्रसाद मुरलीधर मिणीयार**
**२) श्री. गुलाबचंद जिवराज शहा**
**३) श्री. उदय दुर्गादास मिणीयार**
**४) श्री. निलय विपुल शहा,**
वादी नं. १ ते ४ यांचे कुलमुखत्यारधारक म्हणुन
**श्री. दुर्गाप्रसाद मुरलीधर मिणीयार**
रा. ४४/३, महावीर भगवती सोसायटी,
सम्राट चौक, सोलापुर, ४१३००३, **- वादी**

विरुध्द

**श्री. वैभव विलास कुलकर्णी**
वय : ४१ वर्षे, धंदा : व्यापार,
रा. इंडियन मॉडेल स्कुल समोर, जुळे सोलापूर. **- प्रतिवादी**

१) ज्याअर्थी वादी मे. सोलापूर ई कॉन यांनी तुमच्याविरुध्द मे. कोर्टात दावा दाखल केला असुन सदर दाव्याचे समन्स अनेकदा पाठविले असता सदरहूकामी प्रतिवादीस में. कोर्टातर्फे अनेकदा बेलिफमार्फत समन्स काढले असता, प्रतिवादी हा दिलेल्या नमुद पत्त्यावर अनेक वर्षापासुन रहात नाही, असा रिर्पोट आल्यामुळे ते न बजावता परत आले आहे व मे. कोर्टानी सदर सामनेवाला यांना जाहिर समन्सव्दारे समन्स बजावणीचा हुकुम केला आहे.

त्याअर्थी प्रतिवादी यांना सदर जाहिर समन्सव्दारे कळविण्यात येते की, सदर दाव्याचेकामी कोणाचेही कसल्याही प्रकारचे काही हरकत अथवा म्हणणे असल्यास हि जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासुन मे. कोर्टानी दिलेली तारीखः ०७/०१/२०२४ रोजी स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. अन्यथा या प्रकरणी तुम्हास काही सांगावयाचे नाही असे ग्रहीत धरुन सदर दाव्याचे एकतर्फी सुनावणी केली जाईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५ माहे १२ सन २०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्कयाने प्रसिध्द केले असे.

**सही/-** **लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **हुकुमावरून सही/- सहा. अधिक्षक मे. जिल्हा न्यायालय, सोलापूर**

# मारकडवाडी ग्रामस्थावरील कारवाईच्या निषेधार्थ मविआचा शपथविधीवर बहिष्कार!

## ईव्हीएमवरूनही संशय

## आज घेणार शपथ



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई,दि.७ डिसेंबर-**

विधानसभा निवडणुकीत नामुष्कीजन्य पराभवाला सामोरे जावे लागलेल्या विरोधी महाविकास आघाडीने विशेष अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सभात्याग करीत शपथविधीवर बहिष्कार घातला.ईव्हीएम मशीन व निवडणूक आयोगाबाबत संशय आणि मारकडवाडीतील ग्रामस्थांवर करण्यात आलेल्या कारवाईचा निषेध करत त्यांनी विधिमंडळाच्या पायऱ्यावर धरणे आंदोलन करीत निदर्शने केली.

विधानसभा निवडणुकीच्या निकालावर संशय व्यक्त करण्यात येत आहे. सोलापूरम धील माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावात निवडणुकीच्या निकालानंतर मॉक पोलिंग घेण्याचा निर्णय घेण्यात आला. पण पोलिसांकडून विरोध झाल्यानंतर हे मॉक पोलिंग मागे घेण्यात आले. मात्र या घटनेची नोंद राष्ट्रीयस्तरावर होत आहे . सोशल मीडियावर याबाबतच्या पोस्ट झपाट्याने व्हायरल होत आहे. महाविकास आघाडीचे नेते शरद पवार , उद्धव ठाकरे हे या गावाला लवकरच भेट देणार आहेत तर लोकसभेतील विरोधी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी या गावातून ईव्हीएम मशीन विरोधात देशव्यापी आंदोलनाची सुरुवात करणार आहेत .या सर्व बाबींचे पडसाद विधानसभेच्या विशेष अधिवेशनात पहिल्या दिवशी उमटले.

विधिमंडळ परिसरात महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून याबद्दल भूमिका मांडण्यात आली. ठाकरे गटाचे विधिमंडळ नेते आदित्य ठाकरे म्हणाले की, एखादे सरकार एवढ्या मतांनी निवडून येते , जो जल्लोष पाहायला हवा , तसे राज्यात काहीच दिसत नाही. मग प्रश्न हाच पडतो की हे जनतेने दिलेलं बहुमत आहे की ईव्हीएम- निवडणूक आयोगाने दिलेलं बहुमत आहे. तेव्हा मारकडवाडीतील लोकांनी मॉक पोल मागितला. तो होऊ दिला नाही. त्यामुळे जनतेचा मान राखून आम्ही आज शपथ घेत नाही. उद्या आम्ही शपथ घेणार आहोत,

तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले,' राज्यात भाजपा युतीचे सरकार आले असले तरी आपल्या मतदानाने हे सरकार आलेले नाही ,अशीच भावना जनतेला वाटत आहे. जनतेच्या मतांचे हे सरकार नाही. मारकडवाडीच्या लोकांची जी भावना आहे तीच राज्यातील बहुतांश जनतेची भावना आहे. जनभावनेचा आदर करत महाविकास आघाडीतील विधानसभा सदस्यांनी आज शपथ न घेण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी महाविकास आघाडीचे नेते भेट घेऊन पुढील रणनिती ठरवतील. भाजपा युतीचे सरकार हे जनतेचे सरकार नाही. मतांची चोरी करून आलेल्या सरकारने आझाद मैदानावर शपथविधी सोहळ्यावर कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी केली. तरुण मुले व शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. नागपूर भागात ७७३ शेतकऱ्यांनी आत्महत्या झाल्या पण भाजपा युतीला त्याचे काही देणेघेणे नाही.

### मारकडवाडीची लढाई...

लोकशाही व मताचा अधिकार वाचवण्याची जबाबदारी आमची आहे. मारकडवाडीतून जी ठिणगी पेटलेली आहे ती देशात पोहचवण्याचा काँग्रेसचा संकल्प आहे. यासंदर्भात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी चर्चा झाली असून बॅलेट पेपरवर मतदान घेण्याच्या आंदोलनावर दिल्लीत तयारी सुरु आहे. सर्व तयारी झाल्यानंतर मारकडवाडीचे आंदोलन देशव्यापी करण्यासंदर्भात निर्णय होईल असेही नाना पटोले म्हणाले. आयकर विभागाने जप्त केलेली अजित पवारांची १ हजार कोटींची संपत्ती परत देण्याच्या मुद्द्यावर बोलताना नाना पटोलो म्हणाले की, ना खाऊंगा, ना खाने दुंगा ही भूमिका नरेंद्र मोदींच्या लोकांसाठी नाही. भाजपाबरोबर असलेल्या नेत्यांच्या भ्रष्ट कारभारावर पांघरूण घालण्याचा हा प्रयत्न आहे, हे त्याचे आणखी एक उदाहरण आहे.

### जितेंद्र आव्हाड म्हणाले...

मारकडवाडीत काही लोकांना काल रात्री अटक करण्यात आली आहे. त्यामुळे आम्ही जिंकलो आसेलतरी आज शपथ घेणार नाही. या निकालावर महाराष्ट्राचा विश्वास बसत नाही. मारकडवाडीने बॅलेट पेपर वर निवडणुकी घेण्याचा निर्णय घेतला. यात निवडणूक आयोगाचा काय संबध आहे? पोलिसांचा काय संबध आहे? गावाने एखादा निर्णय घेतला तर लोकाशाही पध्दतीने आलेले सरकार वरवंटा पसरवण्याचे काम करत आहे.

# कंत्राटी शिक्षक भरतीला फुलस्टॉप

## शिक्षक भरतीबाबत न भेटण्याचा जि. प. शिक्षण विभागाने लावला फलक

## डीएड, बीएडधारकांच्या कंत्राटी पद भरती प्रक्रियेला तूर्तास लावला ब्रेक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

राज्य शासनाकडून शालेय शिक्षण विभागातर्फे १० किंवा त्यापेक्षा कमी पट संख्येच्या शाळांमध्ये १५ हजार रुपये मानधनावर कंत्राटी शिक्षकाची नियुक्ती प्रक्रिया तूर्तास थांबविण्यात आली आहे. गुरुवार दि. ५ नोव्हेंबर रोजी झालेल्या राज्यभरातील शिक्षणाधिकाऱ्यांच्या ऑनलाईन बैठकीत कमी पट संख्येच्या शाळांमध्ये कंत्राटी पद भरतीसाठी अर्ज प्रक्रीया सुरु करु नये, असे स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, सोलापूर शहर जिल्ह्यात याही ५२ पदांची नियुक्ती होणार होती. त्या उमेदवारास १५ हजार रुपये मानधनासह, काही नियमावली निश्चित केली होती. त्यासाठी पुढील आठवड्यापासून अर्ज मागवण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार होती. परंतु, गुरुवारी (दि.५) नोव्हेंबर रोजी संपन्न झालेल्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या बैठकीत ती प्रक्रिया तूर्त स्थगित करण्यात आली आहे. कंत्राटी पदासाठी अर्ज स्वीकृती कधीपासून सुरु होणार? याबाबत शिक्षण विभागात चौकशीसाठी येणाऱ्यांची गर्दी वाढत असल्याने शिक्षणाधिकाऱ्यांनी कार्यालयाच्या बाहेर, कंत्राटी शिक्षक भरतीसाठी भेटू नये, नंतर कळविण्यात येईल, असे फलक लावण्यात आला आहे. राज्यशासनाने २० किंवा त्यापेक्षा कमी पट-संख्येच्या शाळेत सेवानिवृत्त, कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा निर्णय घेतला होता. यावर आक्रोश मोर्चा काढला होता. त्याची दखल घेऊन शासनाने हा निर्णय मागे घेतला होता. त्यानंतर १० किंवा त्यापेक्षा कमी पट संख्येच्या वर्गावर नियमीत ऐवजी स्थानिक डीएड किंवा बी.एड झालेल्या सुशिक्षित बेरोजगारास संधी देण्याचा निर्णय घेतला होता.

# क्षयरोगमुक्त मोहिमेचा शुभारंभ

## उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली क्षयरोगमुक्त भारत करण्याची शपथ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वकांक्षी योजनेनुसार संपूर्ण भारत देशातून सन २०२५ अखेर पर्यंत क्षयरोगाला हददपार करण्याचे उददीष्ट आहे. या अंतर्गत १०० दिवसीय टीबी मुक्त भारत अभियान राबविण्यात येत आहे. त्याचा शुभारंभ महापालिका क्षेत्रात करण्यात आला. प्रसंगी महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी क्षयरोग मुक्त भारत करण्याची शपथ दिली.

या मोहिमेचा आज संपूर्ण देशामध्ये शुभारंभ करण्यात आला. सोलापूर शहरातील महापालिकेच्या वतीने मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. साबळे वाघीरे कंपनी विडी घरकूल येथे मनपा उपायुक्त आशिष लोकरे, आरोग्य सेवा सहसंचालक डॉ. दिगंबर कानगुळे, मनपा आरोग्याधिकारी डॉ. राखी माने, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर, राज्य एसटीएसयु टीम लीडर सुधाकर जोशी, आयसीटी तज्ञ आकाश खाडे, साबळे वाघीरे कंपनीचे व्यवस्थापक अंकुष राठोड, शहर भाजपा युवा मोर्चा विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष सोमा, वैद्यकीय अधिकारी डॉ. मोनिका पाटील, वैद्यकीय व्यवसायीक डॉ. पुजारी व डॉ. अमोल माळगे, कारखान्याचे पर्यवेक्षक मोनिका जरेकर आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. सोलापूर मनपाच्या सर्व १५ नागरी आरोग्य केंद्राकडे या मोहिमेस सुरूवात करण्यात आली. सोलापूर कारागृह, विविध शाळा, मठ, मंदिर, विट भटटी, कारखाने अशा विविध ठिकाणी शुभारंभाचा कार्यक्रम घेउन नागरिकांची तपासणी करण्यात आली. या मोहिमेचा प्रचार व प्रसार निक्षय वाहनातून करण्यात येणार असून, आकाशात फुगे सोडून हे वाहन मार्गस्थ करण्यात आले. शिबीरास ४०० नागरिक उपस्थित होते. त्यापैकी १८५ महिला विडी कामगार लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी एक्सरे- २२, थुंकी तपासणी-९, रक्त तपासणी ५ या तपासण्या करण्यात आल्या. निक्षय चॅम्पियन यांनी आपले मनोगत व्यक्त केले. राजश्री शाहू प्रशालेच्या विद्यर्थ्यांनी पथसंचालन केले. सूत्रसंचालन आशा सेविका सारिका गाडे यांनी केले.

# मार्कंडेय रुग्णालय परिसर घेईल का मोकळा श्वास?

## रुग्णांच्या नातेवाईकांना बाउन्सर्सची डोकेदुखी

## बांबू बांधून अडविण्यात आला होता रस्ता



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर -**

पूर्वभागातील मार्कडेय सोलापूर सहकारी रुग्णालयच्या मुख्य प्रवेशद्वारच्या दोन्ही बाजूला पळविक्रेत्यांनी अतिक्रमण केलेले आहे. या भागात चहा टपऱ्या व नाष्टा सेंटर्सही वाढलेली आहेत. याठिकाणी दुचाकी, तीनचाकी, चारचाकी वाहनांची सतत वर्दळ असते. त्यामुळे रुग्णालयात जा-ये करताना मोठी कसरत करावी लागत आहे. या सर्व समस्या दूर होऊन मार्कडेय रुग्णालय परिसर मोकळा श्वास घेईल का? असा संतापजनक सवाल रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांतून उपस्थित केला जात आहे. मार्कडेय सोलापूर सहकारी रुग्णालयमध्ये तज्ज्ञ डॉक्टर्सकडून केले जाणारे चांगले उपचार, पुरविण्यात येणाऱ्या उत्कृष्ट सेवासुविधा आणि त्यापोटी आकारण्यात येणारे कमी बील यांसारख्या कारणांमुळे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा अशा विविध ठिकाणचे लोक उपचारासाठी या रुग्णालयात मोठ्या प्रमाणात येत असतात. परंतु रुग्णालयचे मुख्य प्रवेशद्वार आणि परिसरातील वाढते अतिकमण यामुळे नातेवाईक आणि रुग्णांना तारेवरची कसरत करावी लागते.

सहकार तत्वावर चालविण्यात येत असलेल्या या रुग्णालयातील उपचार खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहे. रुग्णसेवा हीच ईशसेवा यानुसार डॉकटर मंडळी आस्थेवाईकपणे सेवा देत असतात. रुग्णालयचे संचालक मंडळही विश्वस्त भावनेने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांचे अडीअडचणी सोडविण्यासाठी पुढाकार घेत असतात. परंतु या रुग्णालयच्या विविध विभागात नियुक्त करण्यात आलेले बाउन्सर्स शांतपणे न सांगता खेकसतात. त्यामुळे नातेवाईकांना या बाउन्सर्सची डोकेदुखी बनली आहे.

रुग्णालयच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूने भद्रावती चौक, कुचन हायस्कूलकडे आणि डाव्या बाजूने आंध्र दत्त चौक, पोलीस मुख्यालयकडे जाणारा रस्ता आहे. या दोन्ही मार्गावर वाहने कसेही लावली जातात. मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूच्या बोळातही वाहनांची दाटीवाटी झालेली असते. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूकडील एका कुटुंबाने पुलगम शोरुमकडे जाणारा बोळवजा रस्ता मध्यंतरी बांबू बांधून अडविले होते.

### झेरॉक्स, नातेवाईक आणि पायपीट

रुग्णांना दाखल करताना, उपचारप्रसंगी आणि डिस्चार्ज करतेवेळी रुग्णालयकड्न काही कागदपत्रांचे झेरॉकस मागण्यात येते. त्यासाठी परगावच्या रुग्णांच्या नातेवाईकांना दूरवर पायपीट करावी लागते. बुधवार व लाईट बंद असल्यावर याचा जास्त त्रास होतो. ही गैरसोय टाळण्यासाठी रुग्णालयने त्यांच्याकडील मशीनद्वारे झेरॉकस करुन घ्यावे. पाहिजे असेल तर त्याचे पैसे बिलामध्ये समाविष्ट करावे, असे एका नातेवाईकाने सांगितले.

# दीपस्तंभ नाटकामुळे नावलौकिक मिळाला आणि मी घडलो : डॉ. ओक

## डॉ. गिरीश ओक यांच्या पुस्तकाचे प्रकाशन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर -**

प्रिसिजन वाचन अभियान कार्यक्रमात शनिवारी, ०७ डिसेंबर २०२४ रोजी अभिनेते डॉ गिरीश ओक यांच्या तो कुणी माझ्यातला' या पुस्तकाचे डॉ सुहासिनी शहा यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या प्रकाशन कार्यक्रमास जेष्ठ चित्रकार रविमुकुल, अनुबंध प्रकाशनचे अनिल कुलकर्णी व या पुस्तकांचे शब्दांकन ज्यांनी केले ते लेखक शिरीष देखणे उपस्थित होते. या पुस्तक प्रकाशन सोहळ्यानंतर अभिनेते डॉ गिरीश ओक यांची शिरीष देखणे यांनी प्रकट मुलाखत घेतली.

प्रारंभी सर्व मान्यवरांचे स्वागत डॉ सुहासिनी शहा यांच्या हस्ते झाले. प्रकाशन कार्यक्रमामध्ये पुस्तकाचे मुखपृष्ठकार चित्रकार रविमुकुल ह्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले कि, शब्दांवरील प्रेमामुळे या क्षेत्रात आलो. मुखपृष्ठ म्हणजे पुस्तकाशी मुक्त केलेला संवाद आहे. डॉ सुहासिनी शहा या पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी बोलताना म्हणाल्या कि, प्रिसिजन वाचन अभियानात होत आहे हे प्रिसिजन आणि सोलापूरकरांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. हल्लीच्या धावपळीच्या जीवनामध्ये वाचन संस्कृती खूप कमी झाली आहे या वाचन संस्कृतीला गती देण्यासाठी प्रिसिजन फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही वाचन अभियान सुरू केला आहे.

पुस्तक प्रकाशन कार्यक्रमानंतर अभिनेते डॉ गिरीश ओक यांची प्रकट मुलाखत लेखक शिरीष देखणे यांनी घेतली. तो कुणी माझ्यातला या पुस्तकाविषयी बोलताना त्यांनी सांगितले कि लेखक, प्रकाशक आणि मुखपृष्ठकार यांच्या आग्रहामुळे हे पुस्तक प्रत्यक्षात आले. या मुलाखती दरम्यान डॉ ओक यांनी आपला सर्व नाट्य प्रवास उलघडला. नागपूर महाविद्यालयातुन नाट्य प्रवासाची सुरवात झाली. कॉलेजच्या गॅदरिंगमुळे या क्षेत्रात आलो.

अभिनयाची चटक म्हणजे भिकेचे डोहाळे होते. चालू असलेले दोन दवाखाने व गर्भ श्रीमंतीतील घर सोडून मुंबईत आल्यावर घर, जेवण, पैसे आणि स्वतःची किम्मत समजली. सुरवातीच्या काळात पैसे खर्च करायला नव्हते आणि पैसे खर्च करायला वेळ नाही. आयुष्याच्या सुरवातीला केलेला स्ट्रगल आठवून आता मजा येते कारण स्ट्रगल मधून मिळालेले यश हे स्वर्गसुख देतो.

पुढे बोलताना डॉ ओक यांनी सांगितले कि, डॉ काशिनाथ घाणेकर यांच्या सोबतच घडलेला किस्सा सांगितला. डॉ काशिनाथ घाणेकर हे हाऊसफुलकिंग होते. नाटकच्या आधी वाजवलेली घंटा ही नाटक सुरु होण्याचे इंडिकेशन आहे. घंटानाद ऐकला कि अंगात ऊर्जा निर्माण होते व नाट्य प्रवेश होतो. दिपस्तंभ नाटकाबद्दलचा ही त्यांनी एक किस्सा सांगितला कि नाटकात एका महिलेला आगीमध्ये ढकललं म्हणून मावशीने भेटण्यास नकार दिला होता.पुढे बोलताना ते म्हणाले कि दीपस्तंभ नाटकामुळे नावलौकिक मिळाला आणि माझ्या अस्थिर जीवनाला स्थिरता आली अशी कृतज्ञता ही त्यांनी व्यक्त केली.

मुलाखतीमध्ये पुढे डॉ ओकांनी आकाशमिठी या नाटकात साकारलेल्या छ. शिवाजी महाराजांची भूमिकाबद्दल सांगितले तसेच या नाटकातील अफजल खान भेटीच्या आधीच संवाद वाचून दाखविला. हा संवाद ऐकताना प्रेक्षकांच्या अंगावर अक्षरशः शहारे उभे राहिले. या मुलाखती दरम्यान डॉ. गिरीश ओक यांनी अभिनय केल्याला नाटकांच्या व्हिडीओ क्लिप दाखवण्यात आल्या व कार्यक्रमाच्या शेवटी तो मी नव्हेच या नाटकातील लाखोबा लोखंडे याचा शेवटचा सिन सादर करून रसिक प्रेक्षकांना खळखळून हसविले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन माधव देशपांडे यांनी व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# राममंदिरासाठी दहा फूट सोन्याचा कळस!



**१५ मार्चपर्यंत पूर्ण होणार संपूर्ण काम**

**अयोध्या, ७ डिसेंबर**

रामलल्लाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना जानेवारीत झाली. त्यानंतर वर्षभर मंदिर परिसरातील इतर काम सुरू होती. पण, आता ही कामे पूर्ण होत आहेत. यात मुख्य रामललाच्या मंदिराचा दहा फुटांचा कळस सोन्याने मढवला जाणार आहे, अशी माहिती राममंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी दिली.

राममंदिर निर्माण समितीची बैठक गुरुवारी पार पडली. यानंतर शुक्रवारी या समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी राममंदिराच्या कामाचा आढावा घेतला. त्यांनी मंदिर उभारणीचे काम योग्य आणि समाधानकारकरीत्या सुरू असल्याचे सांगितले. या कामासाठी कामगारांची संख्या वाढवण्यात आली आहे, तरी देखील अपेक्षेपेक्षा ही संख्या कमी असल्याचे त्यांनी सांगितले. राममंदिराचे काम पूर्ण करण्याला प्राध्यान्य दिले जाणार असून, १५ मार्चपर्यंत ते पूर्ण होईल, असे मिश्रा यांनी सांगितले. सप्त मंदिरांचे सर्व कामही पूर्ण केले जाणार आहे. मार्चपर्यंत तीनचतुर्थांश काम पूर्ण होईल, किरकोळ काम शिल्लक राहील, असे ते म्हणाले. मंदिराच्या खालच्या बाजूला असलेले ५०० फूट लांबीचे आर्टवर्क पूर्ण झाले आहे. तिथे आता दगडांवर रामकथेतील प्रसंग कोरले जात आहेत. त्याचबरोबर यात्री सुविधा, अग्निशमन केंद्र, पाणी प्रकल्पाच्या योजना उभारल्या जात आहेत. जानेवारीपर्यंत ही कामे ट्रस्टकडे सोपविण्यात येणार आहे. राममंदिराचा १० फुटांपर्यंतचा कळस सोन्याने मढवला जाणार आहे, असे नृपेंद्र मिश्रा यांनी सांगितले.

# आता २१ डिसेंबर जागतिक ध्यान दिवस

## भारताचा सहप्रस्ताव संयुक्त राष्ट्रसंघात एकमताने मंजूर

**न्यू यॉर्क, ७ डिसेंबर**

२१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस म्हणून साजरा केला जावा, हा भारताने सादर केलेला मसुदा सहप्रस्ताव संयुक्त राष्ट्रसंघात एकमताने मंजूर करण्यात आला. भारताच्या नेतृत्वाखालील लिकटेंस्टिन, श्रीलंका, नेपाळ, मेक्सिको आणि अँडोरा या देशांच्या समूहाने शुक्रवारी १९३ सदस्यीय संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत 'जागतिक ध्यान दिवस' या शीर्षकाच्या प्रस्तावाला सार्वमताने पारित करण्यासाठी मार्गदर्शन केले. सर्वसमावेशक कल्याण आणि आंतरिक परिवर्तनाचा दिवस! शुक्रवार २१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिन संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत घोषित करण्याबाबतचा ठराव सर्वसहमतीने स्वीकारण्याबाबत भारतासह कोअर ग्रुपच्या इतर राष्ट्रांनी मार्गदर्शन केले, याचा आनंद आहे, असे संयुक्त राष्ट्रसंघातील भारताचे कायम प्रतिनिधी पार्वथनेनी हरीश यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. भारताचे संपूर्ण मानवी कल्याणाचे नेतृत्व 'वसुधैव कुटुंबकम्' या आपल्या सभ्यताविषयक सिद्धांतातून आले आहे. हरीश यांनी नमूद केले की, २१ डिसेंबर हिवाळ्यातील सर्वांत लहान दिवस चिन्हांकित करते, जी भारतीय परंपरेत उत्तरायणवर्षातील एक शुभ काळ, विशेषतः आंतरिक चिंतनासाठी आणि ध्यानाची सुरुवात आहे. २१ जून रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय योग दिवस, उन्हाळ्यातील सर्वांत मोठ्या दिवशी येतो. २०१४ मध्ये भारताने २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून घोषित करण्यास पुढाकार घेतला होता, याची आठवण करून देताना हरीश म्हणाले की, एका दशकात ही एक जागतिक चळवळ बनली आहे, ज्यामुळे जगभरातील सामान्य लोक योग करीत आहेत आणि त्यांना त्यांच्या दैनंदिनाचा भाग बनवू लागले आहेत.

# मिलिंद नार्वेकरांच्या पोस्टमुळे अबू आझमी मविआतून बाहेर

## विरोधकांच्या बहिष्कारात घेतली शपथ

**मुंबई, ७ डिसेंबर**

अयोध्येतील वादग्रस्त ढांच्याचा विध्वंस करण्याच्या घटनेचे स्वागत करताना उद्धव ठाकरे गटाने त्यांच्या मुखपत्रात एक जाहिरातही प्रकाशित केली. तसेच ठाकरे यांचे विश्वासू मिलिंद नार्वेकर यांनी तशी पोस्टही केली. याचा निषेध करीत समाजवादी पार्टीने महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, मविआने ईव्हीएमचा निषेध करून शपथविधी सोहळ्यावर बहिष्कार घातला असताना, सपाचे आमदार अबू आझमी आणि रईस शेख यांनी आज शपथ घेत, मविआला जोरदार धक्का दिला.







अयोध्येतील वादग्रस्त ढांचा ज्यांनी पाडला, त्यांच्यावर आम्हाला अभिमान आहे, अशा आशयाची पानभर जाहिरात ठाकरे यांच्या मुखपत्रातून प्रकाशित करण्यात आली. सोबतच, उबाठा गटाचे नेते मिलिंद नार्वेकर यांनी ही जाहिरात 'एक्स' या समाजमाध्यम हॅण्डलवरही झळकवली. याचा आम्ही तीव्र निषेध करतो, असे सपा नेते अबू आझमी यांनी म्हटले आहे.

मी आमचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्याशी आताच फोनवरून चर्चा केली असून, आम्ही मविआतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे, असे ते म्हणाले.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सपाचे अबू आझमी शिवाजीनगर मानखुर्द आणि रईस शेख भिवंडी मतदारसंघातून निवडून आले होते. मात्र, आज अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आझमी यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत दिले. आमदार रईस शेख यांनी कालच सोशल मीडियावर ठाकरे गटाच्या हिंदुत्ववादी भूमिकेचा विरोध केला होता. मविआच्या सर्व आमदारांनी शपथ घेण्यास नकार देत विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला होता. मात्र, अबू आझमी आणि रईस शेख यांनी मविआच्या भूमिकेशी फारकत घेत आमदारकीची शपथ घेतली.

अबू आझमी यांनी मविआतून बाहेर पडण्याचे कारण सांगताना म्हटले की, मविआचा घटकपक्ष असलेला एक पक्ष म्हणतो की, आम्ही हिंदुत्वाच्या मुद्यावर कायम आहोत. उद्धव ठाकरे स्वतः हिंदुत्वाच्या मुद्यावर काम करा, असे कार्यकर्त्यांना सांगतात. ६ डिसेंबरला वादग्रस्त ढांचा पाडणाऱ्यांचे अभिनंदन केले जाते. अशा पक्षासोबत आम्ही राहू शकत नाही. (वृत्तसंस्था)

### ठाकरे गटाची प्रतिक्रिया

अबू आझमी यांच्या भूमिकेवर ठाकरे गटाचे प्रतोद सुनील प्रभू यांनी प्रतिक्रिया दिली. अबू आझमी यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना विचारून हा निर्णय घेतला असेल, तर त्यावर मी काय बोलणार? महापालिका निवडणुका समोर आहेत, अशा स्थितीत आपल्याला एकत्र राहायला हवे, असे प्रभू यांनी स्पष्ट केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी शनिवारी राज्य विधानसभेच्या विशेष अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी महायुतीतील अन्य नेतेही मोठ्या संख्येत उपस्थित होते

# अंदमानमध्ये आयकर विभागाचे छापे

**पोर्ट ब्लेअर, ७ डिसेंबर**

अंदमान-निकोबार द्वीपसमूहातील अनेक ठिकाणांवर आयकर विभागाने छापेमारी केली. या छापेमारीत आयकर विभागाचे १२० पेक्षा जास्त अधिकारी सहभागी झाले होते, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्याने शनिवारी दिली.

द्वीपसमूहातील काही व्यावसायिकांनी करविवरणात अनियमितता केल्याच्या संशयावरून ४ डिसेंबरपासून ही छापेमारी सुरू करण्यात आली. कोलकाता येथील आयकर विभागाचे पथक पोर्ट ब्लेअरच्या चर्च रोड, फिनिक्स बे, मरिन हिल्स, अब्रेदीन बाजार आणि दिलानीपूर परिसरात छापेमारी करीत आहे. या व्यतिरिक्त बाबू लेन आणि जंगलीघाट परिसरातही कारवाई करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

अशाच प्रकारची छापेमारी महात्मा गांधी आणि गुरुद्वारा मार्गावर केली जात आहे. ही एक सुव्यवस्थित कारवाई आहे. आढळलेली तथ्ये आम्ही लवकरच उघड करू. करविवरण भरण्यात अनियमितता आणि जीएसटीत समस्या असल्याचा आम्हाला संशय आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले.

पोर्ट ब्लेअर येथील वीर सावरकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर ४ डिसेंबर रोजी १२० अधिकाऱ्यांचा समावेश असलेले आयकर विभागाचे पथक उतरले. ज्या व्यावसायिकांवर छापेमारी करायची आहे, त्यांना पोर्टब्लेअरमधून बाहेर जाऊ देऊ नका, असा आदेश त्यांनी विमानतळावरील अधिकाऱ्यांना दिला, अशी माहिती सूत्रांनी दिली. (वृत्तसंस्था)

## बराक व्हॅलीतील हॉटेल्समध्ये बांगलादेशींना बंदी

**गुवाहाटी, ७ डिसेंबर**

बांगलादेशातील हिंदू व इतर अल्पसंख्यकांवरील हल्ले थांबत नाही, तोपर्यंत बांगलादेशींना प्रवेश दिला जाणार नाही, अशी घोषणा आसामच्या बराक व्हॅलीतील हॉटेल मालकांनी केली आहे.

काछारमधील तीन जिल्ह्यांचा बराक व्हॅलीत समावेश होता. यात काछार, श्रीभूमी (करीमगंज), हैलकांडी आहे. या तिनही जिल्ह्यांची १२९ किमी लांबीची सीमा बांगलादेशच्या सिलहट भागाशी लागून आहे.

बांगलादेशातील हिंदू आणि इतर अल्पसंख्यकांची स्थिती चिंताजनक आहे. आम्ही हे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारणार नाही. त्यामुळे अत्याचार थांबेपर्यंत बराक व्हॅलीतील कोणत्याही हॉटेलमध्ये बांगलादेशींना प्रवेश न देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे, अशी माहिती बराक व्हॅली हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशनचे अध्यक्ष बाबूल राय यांनी दिली. स्थैर्य परतावे, हे बांगलादेशातील लोकांनी सुनिश्चित केले पाहिजे. (वृत्तसंस्था)

# कायदेभंग आंदोलन करा : इम्रान खान

**इस्लामाबाद, ७ डिसेंबर**

कारागृहात असलेले पाकिस्तानचे माजी पंतप्रधान यांनी आपल्या समर्थकांना पेशावर शहरात १३ डिसेंबर रोजी जमण्याचे आणि कायदेभंग चळवळ सुरू करण्याचे आवाहन केले. हे आंदोलन करण्यासाठी त्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले, तर पाकिस्तानात मोठे अराजक माजण्याची शक्यता आहे.

इम्रान खान यांच्या एक्स हँडलवर हे निवेदन पोस्ट करण्यात आले आहे. इम्रान खान यांचा निरोप, असे सांगून यात म्हटले की, १३ डिसेंबर रोजी खैबर पैख्तुनवा प्रांताची राजधानी पेशावर येथे जमा व्हा. या प्रांतावर इम्रान खान यांच्या पीटीआय (पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ) पक्षाचे प्राबल्य आहे.

२५ नोव्हेंबर रोजी इस्लामाबाद येथे काढलेला निषेध मोर्चा हाणून पाडण्यासाठी सरकारकडून बळाचा वापर केला गेला. याची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. या मोर्चाला पांगवताना झालेल्या हिंसाचारात १२ जणांचा मृत्यू झाला होता तसेच मागच्या वर्षी ९ मे रोजी झालेल्या हिंसाचारात ८ जणांचा मृत्यू झाला होता तसेच पीटीआय पक्षाच्या अटक केलेल्या नेत्यांना सोडण्यात यावे, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

या दोन मागण्या पूर्ण न झाल्यास १४ डिसेंबरपासून पाकिस्तानमध्ये कायदेभंग आंदोलन सुरू करण्यात येईल आणि पुढील स्थितीसाठी सरकार पूर्णपणे जबाबदार असेल, असा इशारा इम्रान खान यांनी दिला. दरम्यान सरकारने मात्र २५ नोव्हेंबरच्या मोर्चात कुणाचाही मृत्यू झाला नसल्याचे म्हटले आहे. तसेच, मागच्या वर्षी ९ मे रोजी पीटीआयच्या समर्थकांनी लष्करी अधिकाऱ्यांवर हल्ले केले होते, असे सरकारकडून सांगण्यात आले. (वृत्तसंस्था)

# ममता बॅनर्जींशी चर्चा करायला कोलकात्याला जाऊ

## उबाठा गटाची भूमिका

**नवी दिल्ली, ७ डिसेंबर**

ममता बॅनर्जी यांना काय वाटते, ते आम्हाला समजले आहे. ममता बॅनर्जी यांनी आमच्यासोबत राहिले पाहिजे, अशी आमची इच्छा आहे. आमच्यात काही मतभेद असले तरी ते छोटे आहे, यावर त्यांच्याशी चर्चा करून मार्ग काढता येईल. त्यांच्याशी चर्चा करायला आम्ही कोलकात्याला जाऊ, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले.

**राजदचा वेगळाच सूर**

काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील वादात राजदने वेगळाच सूर लावला. लालूप्रसाद यादव हेच खऱ्या अर्थाने इंडिया आघाडीचे शिल्पकार आहे, असे राजदने म्हटले आहे. राजदच्या पुढाकारानेच बिहारमध्ये इंडिया आघाडीच्या स्थापनेची पहिली बैठक झाली होती, या बैठकीला तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी उपस्थित होत्या, याकडे राजद प्रवक्ते मृत्युंजय तिवारी यांनी लक्ष वेधले.



इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्ष आपापल्या राज्यात भाजपाविरोधात भक्कमपणे लढत आहेत. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी भाजपाविरोधात नेटाने लढत आहे. झारखंडमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकीत आम्हाला चांगले यश मिळाले. २०२५ मध्ये बिहार विधानसभेची निवडणूक आहे. बिहारमध्ये इंडिया आघाडी एकजुटीने उभी आहे, असे मृत्युंजय तिवारी म्हणाले

**काँग्रेसची भूमिका**

ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेवर काँग्रेसने सावध प्रतिक्रिया व्यक्त केली. ममता बॅनर्जी मोठ्या नेत्या असल्या तरी, देशाचे नेतृत्व करण्याची क्षमता फक्त राहुल गांधी यांच्यातच आहे, असे काँग्रेस प्रवक्ते इमरान मसूद यांनी म्हटले आहे. ममता बॅनर्जी यांना तसे वाटत असेल, पण आम्हाला तसे वाटत नाही. या मुद्यावर आम्ही चर्चा करायला तयार आहो, असे काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी म्हटले. ममता बॅनर्जी यांच्या शब्दावर त्यांचा पक्ष चालत असेल, पण आम्ही काँग्रेस म्हणून तसे वागू, असे त्या म्हणाल्या. (तभा वृत्तसेवा)

### काँग्रेसने आत्मचिंतन करावे : डी. राजा

भाकपचे डी. राजा यांनीही अप्रत्यक्षपणे ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेचे समर्थन केले. काँग्रेसने आत्मचिंतन करण्याची गरज आहे. या मुद्यावर चर्चा करण्यासाठी इंडिया आघाडीची बैठक बोलावली पाहिजे, असे राजा म्हणाले. हरयाणा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने इंडिया आघाडीतील घटकपक्षांना सामावून घेतले नाही. काँग्रेसने घटक पक्षांना सामावून घेतले असते आणि योग्य ते प्रतिनिधित्व दिले असते, तर या दोन्ही राज्यांत निवडणुकीचे निकाल वेगळे राहिले असते, असे राजा म्हणाले.

# राहुल नार्वेकर पुन्हा होणार विधानसभाध्यक्ष!

## आज अर्ज दाखल करण्याची शक्यता

**मुंबई, ७ डिसेंबर**



विधानसभेच्या नव्या अध्यक्षांची सोमवारी निवड होणार आहे. या पदावर पुन्हा एकदा भाजपा नेते राहुल नार्वेकर यांची निवड होण्याची शक्यता आहे. ते या पदासाठी रविवारी उमेदवारी अर्ज दाखल करू शकतात.

राहुल नार्वेकर यांनी गेल्या अडीच वर्षांत मोठ्या कौशल्याने विधानसभेचे कामकाज हाताळले होते. ठाकरे गट आणि शिंदे गट यांच्यातील शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतच्या वादात नार्वेकर यांनी निर्णायक भूमिका बजावली होती. त्यामुळे तेच विधानसभाध्यक्ष होतील, अशी सूत्रांची माहिती आहे.

राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदावरील निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. नार्वेकर रविवारी दुपारी आपला अर्ज दाखल करतील. यावेळी महायुतीकडे प्रचंड संख्याबळ असल्याने नार्वेकर यांची निवड ही केवळ औपचारिकता मानली जात आहे.

**पक्ष ठरवेल त्याप्रमाणे निर्णय घेणार**

राहुल नार्वेकर यांनी यावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, मला पक्षाकडून जी जबाबदारी दिली जाईल, ती पार पाडणार आहे. पक्षाकडून विधानसभा अध्यक्षपदासंदर्भात जो निर्णय घेतला जाईल, तो मला मान्य असेल. मला पक्षाने अनेक संधी दिल्या आहेत आणि यापुढेही जी संधी दिली जाईल, त्यानुसार काम करेन. (वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचा परिचय

## देवेंद्र गंगाधरराव फडणवीस

**जन्म** : २२ जुलै, १९७०

**जन्म ठिकाण** : नागपूर

**शिक्षण** : एलएल.बी. (नागपूर विद्यापीठ तृतीय मेरिट), एम.बी.ए., डिप्लोमा इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, डी.एस.ई. बर्लिन, जर्मनी येथून उत्तीर्ण

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी अमृता

**अपत्ये** : एक मुलगी

**व्यवसाय** : सामाजिक कार्य

**पक्ष** : भारतीय जनता पक्ष

**मतदार संघ** : ५२ - नागपूर (दक्षिण-पश्चिम)

**इतर माहिती**



कार्यकारी सदस्य, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (युनायटेड नेशन्सद्वारा मान्यताप्राप्त संस्था): उपाध्यक्ष, द सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नाशिक (भोसला मिलिटरी स्कूल), उपाध्यक्ष, राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था, अध्यक्ष, स्व. आबाजी थत्ते अनुसंधान संस्थानचे नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, नागपूर; अध्यक्ष, नागपूर जिल्हा बास्केट बॉल संघटना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, विविध उपक्रमात सहभाग.

१९८९ वॉर्ड अध्यक्ष, भाजपा, धरमपेठ वॉर्ड, नागपूर; १९९० प्रसिद्धी प्रमुख, भाजपा, नागपूर (पश्चिम); १९९२-९५ अध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा, नागपूर शहर; १९९५-२००४ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश, भाजयुमो; २००४-२००९, २००९-२०१४ राष्ट्रीय उपाध्यक्ष, भाजयुमो; २००९ भाजपा विदर्भ निवडणूक प्रमुख, २०१० महामंत्री, २०१२-२०१४ प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भाजपा; ग्लोबल पार्लमेंट या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व करणारे प्रथम भारतीय लोकप्रतिनिधी; उपाध्यक्ष, ग्लोबल पार्लमेंट फोरम, हाबीतात; १९९२ व १९९७ नागपूर महानगर पालिका सदस्य व १९९७ मध्ये महापौर. १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९, २०१९-२०२४ विधानसभा सदस्य, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्यावतीने २००३ या वर्षाचा विधानसभेतील उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार, 'उत्कृष्ट वक्ता' म्हणून राष्ट्रीय पुरस्कार, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

३१ ऑक्टोबर २०१४ ते २१ नोव्हेंबर २०१९ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री. २२ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०१९ दुसऱ्यांदा मुख्यमंत्री, डिसेंबर २०१९ ते जून २०२२ विधानसभेचे विरोधी पक्ष नेते. ३० जून २०२२ रोजी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ, खाती - गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, गृहनिर्माण, ऊर्जा, राजशिष्टाचार. नोव्हेंबर २०२४ मध्ये विधानसभेवर फेरनिवड, ५ डिसेंबर रोजी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ.

## एकनाथ संभाजी शिंदे

**जन्म** : ६ मार्च १९६४

**जन्म ठिकाण** : अहिर, तालुका- महाबळेश्वर, जिल्हा- सातारा

**शिक्षण** : बी.ए

**ज्ञातभाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी लता

**अपत्ये** : एक मुलगा

**व्यवसाय** : उद्योग व सामाजिक कार्य

**पक्ष** : शिवसेना

**मतदार संघ** : १४७ - कोपरी- पाचपाखाडी, जिल्हा- ठाणे

**इतर माहिती**



ठाणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, १९८६ मध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न आंदोलनात १०० कार्यकर्त्यांसह सक्रीय सहभाग, ४० दिवस बेल्लारी येथे तुरुंगवास, ठाणे शहरात ओपन आर्ट गॅलरी, सचिन तेंडुलकर मिनी स्टेडियम, इंटरनिटी सुविधा भूखंडावर बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक, हुतात्मा हेमंत करकरे क्रीडा संकूल, जॉगिंग पार्क, सेंट्रल लायब्ररी सुरु केली.

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी विशेष योगदान; एमएमआरडी सक्षम बनविण्यात यश, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग, वांद्रे-वरळी सी लिंक, वाशी येथील तिसरा खाडीपुल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची क्षमता वाढविण्यासाठी खालपूर-लोणावळा टनेल मार्ग, विदर्भात रेल्वेच्या २७ उड्डाणपूलाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न.

१९९७ व २००२ दोन वेळा नगरसेवक, तीन वर्षे स्थायी समिती सदस्य, चार वर्षे सभागृह नेता, महानगरपालिका ठाणे, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ २०१९-२०२४ विधानसभा सदस्य; २०१४-२०१९ विधिमंडळ शिवसेना गट नेते; १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ विरोधीपक्ष नेता, ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री; जानेवारी २०१९ सार्वजनिक आरोग्य खात्याचा कार्यभार व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री; डिसेंबर २०१९ पासून शिवसेनेचे गट नेते; नोव्हेंबर २०१९-जून २०२२ नगर विकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्याचे मंत्री. ३० जून २०२२ रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ. खाती- सामान्य प्रशासन, नगरविकास, माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, परिवहन, सामाजिक न्याय, पर्यावरण व वातावरणीय बदल, खनिकर्म आणि इतर. नोव्हेंबर २०२४ मध्ये विधानसभेवर फेरनिवड, ५ डिसेंबर २०२४ रोजी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ.

## अजित अनंतराव पवार

**जन्म** : २२ जुलै १९५९

**जन्म ठिकाण** : देवळाली प्रवरा, तालुका- राहुरी, जिल्हा- अहमदनगर

**शिक्षण** : बी.कॉम

**ज्ञातभाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी सुनेत्रा

**अपत्ये** : दोन मुले

**व्यवसाय** : शेती

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

**मतदारसंघ** : २०१ - बारामती, जिल्हा-पुणे

**इतर माहिती** :

विश्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामती; सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा; संचालक, छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, तालुका इंदापूर; संचालक, श्री. छत्रपती सहकारी साखर कारखाना, लि. भवानीनगर.



१७ जून १९९१ ते १८ सप्टेंबर १९९१ सदस्य, लोकसभा १९९१-९५, १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९, २०१९-२०२४ विधानसभा सदस्य, २८ जून १९९१ ते नोव्हेंबर १९९२ कृषी, फलोत्पादन व ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, १९९२ ते फेब्रुवारी, १९९३ जलसंधारण, ऊर्जा व नियोजन खात्याचे राज्यमंत्री; २७ ऑक्टोबर १९९९ ते २५ डिसेंबर २००३ पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे), फलोत्पादन खात्याचे मंत्री; २६ डिसेंबर २००३ ते ३१ ऑक्टोबर २००४ ग्रामविकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे) खात्याचे मंत्री; ९ नोव्हेंबर २००४ ते ७ नोव्हेंबर २००९ जलसंपदा, लाभक्षेत्र विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री; ७ नोव्हेंबर, २००९ ते ९ नोव्हेंबर २०१० जलसंपदा व ऊर्जा खात्याचे मंत्री; ११ नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ राज्याचे उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन आणि ऊर्जा); २२ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१९ उपमुख्यमंत्री, डिसेंबर २०१९ ते जून २०२२ उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), जुलै २०२३ मध्ये उपमुख्यमंत्रिपदाची शपथ, खाती - वित्त व नियोजन, नोव्हेंबर २०२४ मध्ये विधानसभेवर फेरनिवड, ५ डिसेंबर २०२४ रोजी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ. विश्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामती; सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा; संचालक, छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, तालुका इंदापूर; संचालक, श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, लि. भवानीनगर; संचालक, माळेगाव सहकारी साखर कारखाना, लि., संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई; १३ ऑगस्ट २००६ ते १९ ऑगस्ट २०१८ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# सायबर संकटाचे भविष्यभय!

सामाजिक सुरक्षिततेस आव्हान देणाऱ्या किंवा समाजहितास घातक अशा कोणत्याही गोष्टीस लगाम घालावयाचा असेल, तर जनजागृती हा सर्वाधिक महत्त्वाचा उपाय असतो. अशा बाबी लोकांच्या नजरेस आणून देणे व त्यापासून सावध राहण्याच्या सूचना देणे हा जनजागृतीचा मार्ग असल्याने, जेव्हा जेव्हा समाजस्वास्थ्य बिघडविणाऱ्या घटना घडतात, तेव्हा तेव्हा त्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जात असतो. वाढती गुन्हेगारी, फसवणूक, आर्थिक घोटाळे, भ्रष्टाचार आदी अनेक बाबी सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्या असतात. त्यांना आळा घालण्यासाठी प्रशासनातील यंत्रणा सतत सजग असतातच, पण समाजाने किंवा नागरिकांनी जागरूक राहून अशा बाबींविरोधात सावधागिरी बाळगली, तर यापासून उद्भवणारे धोके टाळणेदेखील शक्य होते. म्हणूनच, अशा बाबींना आळा घालण्यासाठी केवळ यंत्रणांची सावधगिरी पुरेशी नसते. समाजभान जागे असणेही महत्त्वाचे असते. अलिकडेच रिझर्व्ह बँकेने एका जाहिरातीतून अशाच एका गंभीर गुन्हेगारीकडे समाजाचे लक्ष वेधले. आसपास घडणाऱ्या अशा घटनांच्या बातम्या वाचून, ऐकून किंवा अनेकदा अनुभवूनही त्याबाबत सजग राहिले नाही, तर गुन्हेगारीला शिरकाव करण्याची संधी मिळते आणि त्याचे गंभीर परिणाम समाजास भोगावे लागतात. रिझर्व्ह बँकेच्या त्या जाहिरातीतून अशाच एका आर्थिक फसवणुकीच्या नव्या तंत्रापासून सावध राहण्याचा इशारा प्रसृत झाला आणि त्यापाठोपाठ अशाच गुन्ह्याची शिकार होऊन सर्वस्व गमावलेल्या एका सुशिक्षिताची कैफियतदेखील सुरक्षा यंत्रणांपर्यंत पोहोचली. फसव्या पार्सल स्कॅमपासून सावध राहा, अशा स्पष्ट सूचना गेल्या बुधवारी रिझर्व्ह बँकेने राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रांतील जाहिरातींद्वारे दिल्या होत्या. रिझर्व्ह बँक, सीबीआय, सरकारी एजन्सी, कुरियर कंपनी किंवा संबंधित अधिकाऱ्यांच्या नावाने तुम्हाला एखादा ऑडिओ किंवा व्हिडीओ कॉल येतो, त्यामध्ये तुमच्यावर एखाद्या गुन्ह्याशी संबंधित असल्याचा थेट ठपका ठेवला जातो आणि कारवाईची धमकी देऊन तुमच्याकडे पैशाची मागणी केली जाते अथवा चौकशीचा फार्स करून मिळविलेल्या माहितीच्या आधारे तुमच्या बँक खात्यातील मोठी रक्कम परस्पर काढून घेतली जाते. फसवणूक झाल्याचे लक्षात येते, तोवर अशी पीडित व्यक्ती कफल्लक झालेली असते.

डिजिटल व्यवहारांचे असंख्य फायदे देशात दिसू लागल्यानंतर डिजिटल फसवणुकीचे गैरप्रकारही देशात वाढू लागल्याने, अनेकांना अशा फसवणुकीचे फटके बसू लागल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्याची गंभीर दखल घेतली. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरच्या आठवड्यातील 'मन की बात' कार्यक्रमाद्वारे जनतेशी संवाद साधताना त्यांनीही अशा गुन्हेगारीपासून सावध राहण्याचा इशारा दिला. सावधगिरी बाळगणे, फसवणुकीच्या प्रयत्नांस बळी न पडता अशा चौकशा धुडकावून लावणे हा उपाय केवळ जनजागृतीतूनच करता येतो आणि अशा गुन्हेगारीस रोखता येते. त्यामुळे, फसवणूक झाल्यानंतर डिजिटल गुन्हेगारीचा सुळसुळाट झाल्याच्या तक्रारी करून सुरक्षा यंत्रणा किंवा प्रशासनाच्या नावाने बोटे मोडण्यापेक्षा, या जाळ्यात न फसण्याची खबरदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे. पंतप्रधानांच्या त्या आवाहनानंतर रिझर्व्ह बँकेने जाहिरातीद्वारे दिलेल्या इशाऱ्याची शाईदेखील सुकलेली नसताना दोन-तीन दिवसांपूर्वी मुंबईत गोरेगाव येथे अशाच एका गुन्ह्यास बळी पडलेल्या सेवानिवृत्त व्यक्तीने आपल्या बँक खात्यातील तब्बल ७२ लाखांची रक्कम गमावली आहे. पोलिस अधिकारी असल्याचे भासवून व्हिडीओ कॉल करणाऱ्या व्यक्तीने पार्सलमध्ये अमली पदार्थ असल्याचे सांगून कारवाईची भीती दाखवत पीडित व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशील गोळा केला आणि आधार क्रमांकासह सर्व आवश्यक माहिती घेऊन ही रक्कम परस्पर काढून घेतली. आपली फसवणूक झाल्याचे ध्यानात आल्यावर या व्यक्तीने पोलिसांच्या सायबर गुन्हेविरोधी शाखेकडे तक्रार केली. फसवणुकीने उकळली गेलेली रक्कम परत मिळावी यासाठी पोलिस यंत्रणांनी हातपाय हलवावेत अशी आता या व्यक्तीची अपेक्षा असेल. त्यात गैर नाही, पण सावधगिरीच्या सूचना अखंडपणे चहुबाजूंनी दिल्या जात असतानाही बेसावध राहून अशा गुन्ह्याच्या सापळ्यात सापडण्याचा भोळसटपणा करणाऱ्यांना यापेक्षा वेगळा अनुभव काय येणार या प्रश्नाचे उत्तर अवघड नाही.

गेल्या ऑक्टोबर महिन्यात 'मन की बात' कार्यक्रमातून जनतेस संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अशा गुन्हेगाराविरोधातील सावधगिरीचा गंभीर इशारा देशास दिला होता. देशाच्या कानाकोपऱ्यातील असंख्य नागरिक मोदी यांच्या या आभासी संवाद सभेस आवर्जून हजेरी लावत असल्याने, अशा गुन्हेगारीविषयी एव्हाना देशात पुरेशी जागरूकता निर्माण झाली असतानाही, सायबर गुन्हेगारीच्या या प्रकारास बळी पडण्याचे प्रकारही घडतच असतात. गेल्या काही वर्षांत अशा गुन्हेगारीच्या माध्यमातून कष्टाने मिळविलेल्या कोट्यवधींच्या रकमेवर गुन्हेगारांनी डल्ला मारलाच, पण निष्पाप, निरपराध सामान्य नागरिकांस प्रचंड मनस्तापही भोगावा लागला आहे. अशा गुन्ह्यात हात असल्याचा आरोप करणाऱ्या दूरध्वनीमुळे कुटुंबाचे मानसिक स्वास्थ्य बिघडल्याच्या व मानसिक ताण असह्य झाल्यामुळे मृत्यू ओढवल्याच्या काही घटनादेखील याआधी घडल्या असल्याने, डिजिटल अरेस्ट नावाने फोफावलेली सायबर गुन्हेगारी रोखण्याकरिता जनतेनेच जागरूक राहावयास हवे ही बाब अधोरेखित झाली आहे. थांबा, विचार करा आणि कृती करा हा पंतप्रधानांनी दिलेला कानमंत्र अशी गुन्हेगारी रोखण्यासाठी पुरेसा ठरू शकतो, हेही सिद्ध झाले आहे. असा फोन किंवा व्हिडीओ कॉल आल्यास घाईघाईने प्रतिसाद देऊन आपली वैयक्तिक माहिती देऊ नये, कारण कोणतीही सरकारी यंत्रणा फोनवर धमकी देऊन पैशाची मागणी करत नाही किंवा खाजगी



गोपनीय बाबींची माहिती गोळा करत नाही हे लक्षात घेतल्यास अशा गुन्हेगारीला धुडकावून लावणे शक्य असते. एक है तो सेफ है असा आणखी एक संदेश पंतप्रधानांनी देशाला दिला आहे. आर्थिक फसवणुकीच्या प्रकारांतही हा संदेश ध्यानात ठेवला तर गुन्हेगारी रोखता येऊ शकते. अनेकदा फसवणुकीचे अनुभव इतरांपासून लपविण्याची मानसिकता असते. आपण फसवले गेलो हे सांगणे कमीपणाचे वाटते, त्यामुळे अशा फसवणुकीचा मनस्ताप एकट्यास किंवा त्या कुटुंबास सोसावा लागतो. त्याऐवजी अशा फसवणुकीचा अनुभव इतरांपर्यंत पोहोचविल्यास गुन्हेगारीविरुद्ध एक होऊन सुरक्षिततेचे कवच समाजाभोवती निर्माण होऊन गुन्ह्यास आळा घालणे सोपे होऊ शकते. कारण, डिजिटल अरेस्ट नावाची कोणतीही व्यवस्था कोणत्याही कायद्यात नाही. ही फसवणूक आहे आणि बदमाशांनी सामाजिक अर्थव्यवस्थेवर घातलेला घाला आहे, याची जाणीव रुजविण्यासाठी जनजागृती गरजेची आहे.

डिजिटल गुन्हेगारीचा वाढता सुळसुळाट पाहता, आगामी काळात सायबर गुन्हेगारी हे भारतासमोरील सर्वांत मोठे आव्हान असेल, हे स्पष्ट दिसू लागले आहे. जसजसे तंत्रज्ञान विकसित होत जाते, तसतसा त्याचा गैरफायदा घेण्याचे तंत्रज्ञानदेखील विकसित होत असल्याचे दिसते. त्यातूनच सायबर गुन्हेगारी वाढीस लागली असून कोट्यवधी रुपयांची लूट सुरू झाली आहे. या गुन्हेगारीस आळा घालण्याचे उपाय शोधणाऱ्या असंख्य परिषदा गेल्या काही वर्षांत झाल्या. या क्षेत्रातील तज्ज्ञांनी उपाय शोधण्यासाठी अहोरात्र संशोधने सुरू ठेवली आहेत. पण दहशतवादाहूनही अधिक भय फैलावणाऱ्या व असुरक्षिततेचे सावट माजविणाऱ्या या गुन्ह्याचे आव्हान अधिकाधिक गडद होऊ लागले आहे. दहशतवादाचे जागतिक आव्हान थोपविण्यासाठी सुरक्षा यंत्रणांना काहीसे यश येत असले, तरी सायबर गुन्हेगारी पूर्णपणे रोखणे सोपे नाही याची जाणीव आता या यंत्रणांनाही झाली आहे. समाजमाध्यमांचा प्रचंड फैलाव झाल्यामुळे आभासी मंचाची उपलब्धता आता सर्वांसाठी सोपी झाली आहे. प्रचंड प्रमाणात वाढलेल्या या गुन्हेगारीच्या असंख्य प्रकरणांचा तपास गेल्या दहा वर्षांहूनही अधिक काळापासून संपूर्ण यशाच्या टप्प्यापर्यंत पोहोचू शकलेला नाही, ही बाब चिंताजनक आहे. या गुन्हेगारांचा नेमका ठावठिकाणा शोधणे हेदेखील एक आव्हान आहे. अनेकदा हे गुन्हेगार देशाबाहेर असल्याने कायदेशीर कारवाईवरही मर्यादा येत असल्याचे सांगण्यात येते. कृत्रिम बुद्धिमत्ता हे विकसित तंत्रज्ञानाचे वरदान ठरेलच, पण त्याचा गैरवापर झाल्यास तो सर्वांत धोकादायक शापदेखील ठरेल, अशी भीती जागतिक स्तरावर व्यक्त होत असते. सायबर गुन्हेगारीसारख्या प्रकाराने ही भीती वास्तविक असल्याच्या जाणिवा आता होऊ लागल्या आहेत. डीपफेक, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर होणारे सायबर हल्ले नजीकच्या भविष्यकाळात तीव्र होणार आहेत, असा इशारा देणारा 'डाटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडिया (डीएससीआय)' चा एक अहवाल अलिकडेच प्रसिद्ध झाला आहे. विशेषतः आरोग्य क्षेत्राशी आणि आर्थिक क्षेत्राशी संबंधित असलेल्यांना ही गुन्हेगारी लक्ष्य करेल, अशी शक्यताही या संस्थेने वर्तविली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून घडणारे असे गुन्हे शोधणे अधिक अवघड होणार आहेच, पण या गुन्ह्यांचे जाळे पसरविणे मात्र सोपे होणार आहे, असा या अहवालाचा इशारा आहे. जानेवारी ते एप्रिल २०२४ या केवळ चारच महिन्यांच्या काळात भारतीय नागरिकांनी अशा गुन्ह्यास बळी पडून तब्बल १७५० कोटी रुपये गमावले, असे केंद्रीय गृहखात्याच्या आकडेवारीवरून दिसते. अशा गुन्ह्यांच्या सुमारे साडेसात लाख तक्रारी गृहखात्याच्या राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर दाखल झाल्या आहेत. या वर्षी पहिल्या पाच महिन्यांतच या तक्रारींमध्ये सात हजारांची भर पडली. गुन्ह्याचे प्रमाण शंभर टक्क्यांहूनही अधिक वाढल्याचे ही आकडेवारी दर्शविते. यापैकी ८० टक्क्यांहून अधिक गुन्हे ऑनलाईन घोटाळे म्हणून नोंदले गेले असून गेमिंग ॲप्स, अधिक परताव्याची प्रलोभने दाखवून ऑनलाईन गुंतवणुकीची आमिषे, ओटीपीच्या माध्यमातून होणारी लुबाडणूक, अशा अनेक प्रकारांचा सुळसुळाट झाला आहे. केवळ डिजिटल अरेस्टसारख्या भयावह गुन्हेगारीतूनच नागरिकांच्या सुमारे सव्वाशे कोटींच्या कमाईवर सायबर गुन्हेगारांनी डल्ला मारला आहे, तर शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या माध्यमातून पैसे कमावण्याच्या प्रलोभनांस बळी पडलेल्या वीस हजारांहून अधिक नागरिकांनी १४०० कोटींहून अधिक रक्कम गमावली आहे.

केवळ आर्थिक लुबाडणूक हेच सायबर गुन्हेगारीचा भस्मासुर रोखण्यापुढील आव्हान नाही, तर या माध्यमातून संवेदनशील माहितीची चोरी, सामाजिक शांततेस धोका निर्माण करणाऱ्या हालचाली रोखण्याचे आव्हानही यापुढे बिकट होत जाणार आहे, असे भाकीत या अहवालाने वर्तविले आहे. सरकारी सेवांच्या नावाने बनावट ॲप्लिकेशन तयार करून लोकांस लुबाडण्याचे व फसविण्याचे प्रकारही वाढीस लागण्याची भीती असल्याने, संपूर्ण व्यवस्थांची विश्वासार्हताही पणाला लागणार आहे. सरकारी सेवांच्या नावाने समाजमाध्यमांवर बनावट व्यवस्था निर्माण करून त्यामध्ये गुंतवणूक करण्याची आमिषे दाखवून फसविण्याचे प्रकार वाढले, तर ते मोठेच संकट ठरेल, अशी भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. या संकटापासून बचाव करण्यासाठी केंद्र सरकारने व विविध यंत्रणांनी काही उपाययोजना केल्या आहेत, आणि विशेषतः गुंतवणूकदारांचे हितसंबंध व अर्थव्यवहार सुरक्षित करण्याच्या दृष्टीने काही पावलेदेखील टाकली आहेत. शेअर बाजारासारख्या आर्थिक उलाढालीवर केंद्रित असलेल्या व्यवस्थांना वेठीस धरणाऱ्या समांतर गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी सेबीने काही नियामक कृती कार्यक्रम आखला आहे. अनावश्यक सॉफ्टवेअरचा वापर थांबविणे, नियामकांचा वावर मर्यादित करणे, अशा काही उपाययोजनाही सुरू असल्याचे सांगण्यात येते. गुंतवणूकदारांचे आर्थिक संरक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने इंडियन कॉम्प्युटर ॲण्ड इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम, सायबर सुरक्षित भारत, सायबर स्वच्छता केंद्र आणि राष्ट्रीय सायबर सुरक्षितता धोरणही आखले आहे. ही सुरक्षितता निश्चित करण्यासाठी ज्यांची मदत घेता येईल त्या सर्वांस सायबर गुन्हेविरोधी मोहिमेत सहभागी करून घेतले जाणार आहे. ज्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर करून गुन्हेगारीने उच्छाद मांडला, तेच तंत्र वापरून गुन्हेगारी मोडून काढण्याची शिफारस डीएससीआयने केली आहे.

या मोहिमांमुळेच, आसामातील सायबर गुन्हेगारांची एक टोळी उद्ध्वस्त करून पोलिसांनी १४ जणांना अटक केली. गेल्या वर्षी मे महिन्यात सायबर गुन्हेगारीकरिता वापरले गेलेले २८ हजार मोबाईल फोन जप्त करण्याचा आदेश केंद्र सरकारने टेलिकॉम कंपन्यांना दिला होता. त्याशिवाय या मोबाईल फोनशी जोडले गेलेल्या २० लाख मोबाईल फोनची फेरतपासणीही करण्यात आली होती. गेल्या एप्रिल महिन्यात हरयाणातील नूंह जिल्ह्यात ४० जणांची एक सायबर गुन्हेगारी टोळी जेरबंद करण्यात आली. या टोळीने देशभरात धुमाकूळ घालून असंख्यांना लुबाडल्याचे उघड झाले होते. उत्तर भारतातील अनेक गावांत सायबर गुन्हेगारीचे अड्डे असल्याचे उघडकीस येत असल्याने धोक्याच्या घंटा आता अगदी उंबरठ्याशी वाजू लागल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी या गुन्हेगारीवर विदारक प्रकाश टाकणारी जमतारा नावाची मालिका देशभर चर्चेत होती. जमताराच्या कार्यपद्धतीची नेमकी नक्कल करून नागरिकांची आर्थिक लुबाडणूक करणारे अनेक मॉडेल विविध ठिकाणी कार्यरत असल्याच्या संशयावरून आता सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. सायबर गुन्हेगारांना वेसण घालून नागरिकांचे हक्क सुरक्षित राखण्यासाठी सरकारी स्तरावर प्रयत्न सुरू असले, तरी नागरिकांनी जागरूकता दाखविली तरच या युद्धास बळ मिळणार आहे. अन्यथा, सायबर गुन्ह्यांचे भविष्यभय सतत डोक्यावर दाटलेले राहणार आहे.

dineshgune@gmail.com

## प्रासंगिक

**विनोद देशमुख**

# विलक्षण लोकनेता

भाजपा विचार परिवाराचे मुख्यालय आणि देशाचे मध्यवर्ती शहर असलेले नागपूर. येथील भाजपाने गेल्या तीन तपांमध्ये एक नव्हे, दोन दिग्गज लोकनेते पक्षाला, राज्याला अन् देशाला दिले. पहिले नितीन गडकरी आणि दुसरे देवेंद्र फडणवीस. यातील गडकरी राष्ट्रीय राजकारणात आहेत तर देवेंद्र पाव शतकापासून आमदार म्हणून राज्याचे राजकारण करीत आहेत. एवढेच नव्हे, तर राज्याचे सर्वोच्च पद मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता ही तीनही पदे भूषविणारे महाराष्ट्रातील आतापर्यंतचे ते एकमेव नेते ठरले आहेत.

दांडगा जनसंपर्क आणि विकासकामांवर भर हे त्यांच्या कामाचे अन् लोकप्रियतेचे सूत्र आहे. त्यांनी पाच वर्षे मुख्यमंत्री आणि अडीच वर्षे उपमुख्यमंत्री म्हणून आपल्या कामांची चमक राज्यभर दाखवली आणि आपला कायम ठसा उमटवला, हे कोणालाही नाकारता येणार नाही.



समृद्धी महामार्गापासून शेततळ्यांपर्यंत आणि मेट्रोपासून शेतकऱ्यांना वीज बिल माफीपर्यंत समाजातील सर्व वर्गांसाठी विकासाच्या विविध योजना राबविणारा एक चौफेर नेता, अशी देवेंद्र फडणवीस यांची ओळख निर्माण झालेली आहे. गृह, विधि व न्याय, नगरविकास, जलसंपदा, ऊर्जा, गृहनिर्माण ही खाती सांभाळताना त्यांनी त्या त्या खात्यांसाठी मोलाचे राज्यव्यापी निर्णय घेऊन ते राबविले आणि लाखो लाभार्थींना दिलासा दिला. फक्त साडेसात वर्षांत इतकी मोठी कामगिरी करणारे देवेंद्र अनोखे नाहीत, असे कोण म्हणू शकतो ?

लोकसंग्रह आणि नेतृत्व याची बीजे त्यांच्या डीएनएतच असल्याचे विद्यार्थिदशेतच दिसून आले. वडील स्व. गंगाधरराव फडणवीस यांच्याकडून मिळालेला हा वारसा त्यांनी जोपासला आणि वाढवला. भाजपा युवा मोर्चाचे वॉर्ड अध्यक्ष म्हणून वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला, तेव्हापासून गेल्या ३५ वर्षांत त्यांनी एकदाही मागे वळून पाहिलेले नाही. सर्वांत तरुण नगरसेवक, सर्वांत तरुण महापौर, आमदार आणि नंतर थेट मुख्यमंत्री असा त्यांचा नेत्रदीपक प्रवास राहिला. याचे कारण, लोकांचे अपार प्रेम, सहकार्य एका बाजूला तर जनतेची नाडी ओळखून त्यांच्या हिताची कामे झपाट्याने करण्याची हातोटी दुसऱ्या बाजूला, यांच्या संगमातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडले आहे.

लोकनेता कसा असावा, याचा आदर्शच त्यांनी घालून दिला आहे. तरुण वयातच लाभलेले लोकनेतेपद त्यांनी वेळोवेळी स्वकर्तृत्वाने सिद्ध करून दाखविले आहे. त्यामुळेच नागपूर शहरातील दक्षिण-पश्चिम (नैर्ऋत्य) नागपूर विधानसभा मतदारसंघाने त्यांना आमदार म्हणून लागोपाठ सहा वेळा निवडून दिले आणि महाराष्ट्राला दोनदा मुख्यमंत्रीही दिला. महाराष्ट्राच्या इतिहासात उपराजधानीच्या नागपूर शहराला पहिल्यांदा मुख्यमंत्रिपदाचा मान २०१४ मध्ये मिळाला तो त्यांच्यामुळेच. मंत्री म्हणून कुठलाही अनुभव नसतानाही देवेंद्र यांनी मुख्यमंत्रिपद समर्थपणे सांभाळले आणि राज्यात विकासाचा अन् क्रांतिकारी निर्णयांचा धडाका लावला, हे संपूर्ण राज्याने पाहिले आहे.

२०१९ मध्ये मतदारांचा स्पष्ट कौल मिळूनसुद्धा शिवसेनेच्या राजकारणापायी भाजपा-शिवसेना युतीचे सरकार गेले आणि देवेंद्र फडणवीसांना विरोधी पक्षनेता व्हावे लागले. ती भूमिकाही त्यांनी चोख बजावली आणि महाविकास आघाडी सरकारचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणला. नंतरच्या राजकीय उलाढालीत एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपद देऊन स्वतः उपमुख्यमंत्री होण्याचा उमदेपणा आणि पक्षनिष्ठा यांचे आगळेवेगळे दर्शन त्यांनी घडविले, हे उभ्या महाराष्ट्राने अनुभवले. या कारकीर्दीतही त्यांनी शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दीर्घकालीन 'मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत' योजना आणली आहे. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना वीज बिल पुढील पाच वर्षे माफ करण्याचा हा निर्णय ऊर्जामंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत धाडसानं घेतला आहे. शेतकऱ्यांना पर्यायी सौर ऊर्जा पंप देण्याची योजनाही विजेची मोठी बचत साधण्यातून दुहेरी लाभाची होणार आहे. जलसंपदा मंत्री म्हणून महत्त्वाकांक्षी पाच नद्याजोड प्रकल्प मार्गी लावण्याचे भविष्यासाठीचे फार मोठे काम त्यांनी केले आहे. यात विदर्भातील वैनगंगा-नळगंगा प्रकल्प सर्वांत मोठा असून त्याची अंदाजित लागत सव्वा लाख कोटींच्यावर आहे. पाच लाख हेक्टर शेतजमीन सिंचित करू शकणारा हा महाप्रकल्प विदर्भासाठी वरदानच ठरणार आहे.

शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून इतरांसारखे फक्त मिरवण्यापेक्षा ठोस उपाययोजना आणि त्याचवेळी सर्वांगीण नागरी विकासालाही मोठ्या प्रमाणावर चालना, असे संतुलन साधणारा एक परिपूर्ण लोकनेता देवेंद्र यांच्या रूपात विधानसभेत पाठविण्याचे भाग्य नैर्ऋत्य नागपूर मतदारसंघाला सतत लाभले आहे. त्यांच्या मतदारांनी यंदाही याची पुनरावृत्ती करून त्यांना पुन्हा मुख्यमंत्रिपदी बसविले. वसंतराव नाईक यांच्यानंतर असे फक्त देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दलच घडले आहे. दोघेही वैदर्भीय, हे विशेष.

सहा महिन्यांपूर्वीच्या लोकसभा निवडणुकीत भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी यांच्या महायुतीला महाराष्ट्रात जबर फटका बसला असताना, महायुतीने विधानसभेत अभूतपूर्व यश मिळविले आणि विरोधकांना सातवे आसमान दाखविले. याचे सर्वाधिक श्रेय देवेंद्र फडणवीस यांच्या धडाकेबाज नेतृत्वाला, त्यांच्या कुशल रणनीतीला, सुनियोजित समन्वयाला आहे. त्यांनी भाजपाला सलग तीनदा शंभरी पार नेले आहे. २०१४-१२२, २०१९-१०५ आणि आता विक्रमी २०२४-१३२. गेल्या वेळी उद्धव ठाकरेंच्या महत्त्वाकांक्षेपायी शिवसेनेने बेईमानी केली नसती तर देवेंद्र फडणवीस यांना यावेळी मुख्यमंत्रिपदाची हॅट्ट्रिक करण्याचा नवा विक्रम नोंदविता आला असता. तरीही सर्व जनतेची काळजी वाहताना सामाजिक संतुलन साधणारे सशक्त सरकार मुंबईत प्रकर्षाने हवे असताना तेच 'पुन्हा आले' हेही कमी नाही. अशा या सर्वसमावेशक, संयमित, विकासोन्मुख, कणखर, भविष्यवेधी नेतृत्वाला पुढच्या काळात सतत पाठबळ देणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. त्यांची ही कारकीर्दही संपूर्ण पाच वर्षे यशस्वी होण्यासाठी १४ कोटी जनतेच्या वतीने शुभेच्छा!

९८५०५८७६२२

## रविवारची पत्रे

### विरोधकांत शिष्टाचारही राहिलेला नाही

निवडणुकीत जय-पराभव हे तर चालणारच आहे. तुमचे कार्य लोकांना भावले की तुम्हाला मत मिळणार. महाराष्ट्रात निवडणूकीपूर्वी प्रत्येक सभेत इंडिया आघाडीचे नेते व खास करून महाराष्ट्राचे शिवसेना उबाठाचे एकमेव नेते व जनतेचे मनोरंजन करणारे व पत्रकारांना बातमीची खिरापत देणारे संजय राऊत खूप काही बोलत होते. आज ते वक्तव्य आठवले की मजाच वाटते. एकदाची निवडणूक झाली व जनतेने आपला कौल दिला. आता विषय संपायला हवा. आता देवेंद्र, अजितदादा, एकनाथराव हे समस्त महाराष्ट्राचे नेते झाले. मग आलेल्या निमंत्रणाचा मान ठेवण्याचा शिष्टाचार देखील विरोधी विसरले. शपथविधी सोहळ्यात उद्योजक, अभिनेते, लाडक्या बहिणी, सामान्य जन इतकेच काय तर नागपुरातून चहावाला देखील गेला होता. अशावेळी विरोधी पक्षाची उपस्थिती ही मोठेपणा जपणारी असते. पण अजूनही राजकीय शहाणपण आले नाही. उद्धव साहेब सोडा कारण त्यांना सल्ला राऊतांचा आहे. त्यामुळे ते बुडणारच आहे. तसेच तिकडे काँग्रेस तर अगदी डुक लावुन बसली आहे परंतु जाणते शरदराव यांनी तरी मोठेपणा या वयात दाखवायला हवा होता. तेच 'मोठे' झाले असते. परंतु केवळ बोलण्यात वेळ घालवणारे हे विरोधी नेते आलेली वेळ घालवतात हेच खरे. शिष्टाचार हा उत्तम राजकीय खेळीचा एक भाग आहे हे या महाभागांना कोण सांगणार?

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### ईव्हीएमला दोष, लोकशाहीची थट्टाच!

राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीस घवघवीत यश मिळाले. परंतु या यशाचं गुपित ईव्हीएममध्ये दडलेलं असल्याचा विषारी प्रचार विरोधक करीत आहेत. लोकसभा निवडणुकीत रालोआला महाराष्ट्रासह देशातील अनेक मतदारसंघात पराभवाचा सामना करावा लागला होता. तेव्हा मात्र ईव्हीएमबद्दल एक शब्दही न बोलणारे विरोधक महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवाने विचलित झालेले दिसत आहेत. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर ईव्हीएमवर संशय घेत काही नेत्यांनी तर पुन्हा एकदा मतपत्रिकेवर निवडणूक घ्या आणि निकाल पाहा असे हास्यास्पद विधान केले. ईव्हीएम पद्धती शंभर टक्के अचूक आहे हे अनेकदा सिद्ध झाले आहे, तरीही ईव्हीएमला दोष देणे म्हणजे लोकशाहीची थट्टाच म्हणावी लागेल.

**अखिल देशपांडे**/अकोला

## दखल

**अजय पत्की**

# स्वस्थ समाजाकरिता प्रमाणबद्ध प्रजनन दर आवश्यक



गेल्या महिन्यात नागपुरात कठाळे कुल संमेलन आयोजित करण्यात आले होते. संमेलनात देशभरातून ४०० पेक्षा अधिक कुटुंबीय सहभागी झाले होते. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी भारतातील एकूण प्रजनन दर २.१ च्या खाली गेल्याबद्दल चिंता व्यक्त केली होती. सरसंघचालक म्हणाले की, बदली दरापेक्षा टीएफआर (टोटल फर्टिलिटी रेट) कमी होणे म्हणजे समाजाचे अस्तित्व कोणीही नष्ट केल्याशिवाय आपोआप संपुष्टात येऊ शकते. त्यामुळे आपला समाज दीर्घकाळात नामशेष होण्याचा धोका आहे, जे मोठ्या चिंतेचे कारण आहे. त्यांनी म्हटले आहे की टीएफआर कोणत्याही परिस्थितीत २.१ च्या खाली येऊ नये.

सरसंघचालकांनी विधान पहिल्यांदाच केलेले नाही. यापूर्वीचे सरसंघचालक स्व. श्री. सुदर्शनजी यांनी देखील असे विधान काही वर्षांपूर्वी केलेले होते आणि तेव्हा देखील तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. संघाप्रमाणेच संघ प्रेरित संघटनांमध्ये देखील सरसंघचालकांचे मार्गदर्शन आणि विविध प्रसंगी केलेल्या सूचना यावर गांभीर्याने अध्ययन आणि चर्चा होत असतात. स्वदेशी जागरण मंचाच्या बैठकीतून या विषयावर यापूर्वी कार्यकर्त्यांचे अनेकदा प्रबोधन करण्यात आले आहे. इतकेच नव्हे तर स्वदेशी जागरण मंचने लखनौ येथे जून २०२४ मध्ये झालेल्या राष्ट्रीय परिषदेच्या बैठकीत या संदर्भात एक ठराव देखील संमत केला होता.

झपाट्याने कमी होत असलेला एकूण प्रजनन दर (टीएफआर), म्हणजे सरासरी १५-४९ वर्षे वयाची महिला तिच्या आयुष्यात किती मुलांची निर्मिती करते, भविष्यातील लोकसंख्येचा आकार, ज्यामध्ये घट होण्याची अपेक्षा आहे, आणि आपला समाज व्यक्त करतो अशा त्याच्या अस्तित्वावर होणाऱ्या परिणामांबद्दल हे लक्षात घेण्यासारखे आहे की लॅन्सेटने आपल्या ताज्या प्रकाशनात २०२१ सालापर्यंत भारताचा टीएफआर १.९१ पर्यंत कमी झाल्याचे सांगितले होते. येथे हे उल्लेखनीय आहे की सन १९५० मध्ये प्रजनन दर प्रति स्त्री ६.१८ मुले होता.

२.१ च्या टीएफआरला 'रिप्लेसमेंट-लेव्हल प्रजनन क्षमता' मानले जाते. याचा अर्थ असा की दोन मुले असलेली स्त्री स्वतःच्या आणि तिच्या जोडीदाराच्या जागी दोन नवीन जीवन आणते. त्यातून हे सुनिश्चित होते की पुढची पिढी स्वतःची जागा घेते. देशाची लोकसंख्या प्रत्यक्षात कमी होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल, असे सरसंघचालकांनी म्हटले आहे. आपण हा इशारा गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. कारण जागतिक स्तरावर, कल सामान्यतः टीएफआरमध्ये घट होण्याकडे आहे. आपण पाहतो की, सतत घसरत असलेले आणि कमी टीएफआर असलेले विकसित देश त्यांच्या लोकसंख्येच्या आकुंचनाला सामोरे जात आहेत. दक्षिण कोरिया, जपान, जर्मनी इ.मधील एकूण प्रजनन दर २.१ च्या बदली पातळीपेक्षा खूप खाली घसरला आहे. त्यामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. भारताने या देशांकडून शिकले पाहिजे आणि घसरत चाललेला दर पूर्ववत् करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. या उपाययोजना करणे क्लिष्ट आणि अति दीर्घकालीन असते. उपाययोजनांचे परिणाम दिसायला अनेक वर्षे लागू शकतात. त्यामुळे तातडीने निदान व्यापक प्रबोधनाला सुरुवात करणे अत्यावश्यक आहे.

**राष्ट्रीय परिवार आणि स्वास्थ्य सर्वेक्षण ५ नुसार प्रजनन दराची २०२१ ची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **उत्तर भारत** | | - तामिळनाडू : | १.८० | - गुजरात : | १.९० |
| - उत्तर प्रदेश : | २.३५ | - तेलंगणा : | १.८२ | - मध्य प्रदेश : | २.०० |
| - उत्तराखंड : | १.९० | - पुद्दुचेरी : | १.७० | - महाराष्ट्र : | १.६८ |
| - पंजाब : | १.६३ | | | - राजस्थान : | २.०० |
| - हरयाणा : | २.०० | **पूर्व भारत** | | | |
| - हिमाचल प्रदेश : | १.७० | - आसाम : | १.९० | **उत्तर-पूर्व भारत** | |
| - जम्मू-काश्मीर | १.४० | - बिहार : | ३.०० | - अरुणाचल प्रदेश : | २.११ |
| - लद्दाख : | १.३० | - झारखंड : | २.३० | - मणिपुर : | २.१७ |
| | | - ओडिशा : | १.८० | - मेघालय : | २.९१ |
| **दक्षिण भारत** | | - पश्चिम बंगाल : | १.६० | - मिजोरम: | २.०७ |
| - आंध्र प्रदेश : | १.७० | | | - नागालॅण्ड : | १.७१ |
| - कर्नाटक : | १.७० | **पश्चिम भारत** | | - सिक्कीम : | १.०५ |
| - केरळ : | १.८० | - गोवा : | १.३२ | - त्रिपुरा : | १.७७ |

२०२० मध्ये महाराष्ट्रातील एकूण प्रजनन दर (टीएफआर) १.५०० होता, जो विक्रमी कमी होता. २००५ ते २०२० या कालावधीत महाराष्ट्रातील टीएफआर सरासरी १.८०० होता, २००५ मध्ये हा सर्वाधिक २.२०० च्या शिखरावर होता. महाराष्ट्रासाठी टीएफआर भारताच्या रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्तालयाने नोंदवला आहे.

बालमृत्यू दरात घट झाल्यामुळे देशातील तरुण लोकसंख्या सातत्याने वाढू लागली आहे, ज्याला 'डेमोग्राफिक डिव्हिडंड' म्हणून ओळखले जाते. २००१ ची आकडेवारी घेतली, तर देशातील तरुणांची (१५ ते ३५ वर्षे वयोगटातील) लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ३३.८० टक्के होती, जी २०११ मध्ये वाढून ३४.८५ टक्के झाली. सध्या ती एकूण लोकसंख्येच्या ३५.३ टक्क्यांहून अधिक आहे. आपली लोकसंख्या पाहिल्यावर हे स्पष्ट होते की आज भारतामध्ये इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत आपली तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. लोकसंख्येचा हा भाग देशाच्या विकासात अधिक योगदान देऊ शकतो. ही आपली जमेची बाजू आहे. बदलत्या काळानुसार, अर्थशास्त्रज्ञांना हे समजू लागले आहे की वाढती लोकसंख्या आता एक ओझे नाही आणि आरोग्य सेवांमध्ये झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे मृत्युदरात, विशेषतः बालमृत्यूमध्ये मोठी घट झाली आहे, ज्यामुळे आपल्या मुलांची दीर्घकाळ जगण्याची क्षमता देखील वाढली आहे.

**लोकसंख्याशास्त्रीय लाभांश राष्ट्राच्या विकासात योगदान**

प्रजनन दर प्रतिस्थापन दरापेक्षा कमी झाल्यास आमच्या मुलांच्या जगण्याची शक्यता वाढवण्याचे आमचे प्रयत्न पुरेसे ठरणार नाहीत. २००० च्या भारताच्या लोकसंख्या धोरणातही स्पष्टपणे नमूद केले आहे की, क्रॉस-सेक्टरल ॲक्शन स्ट्रॅटेजीज अवलंबून, २०१० पर्यंत टीएफआर ते रिप्लेसमेंट लेव्हल (२.१ चा टीएफआर) वाढवणे हे मध्यम-मुदतीचे ध्येय आहे.

सामाजिक विकास, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत आर्थिक वाढीच्या गरजा पूर्ण करू शकतील अशा पातळीवर २०४५ पर्यंत लोकसंख्या स्थिर करणे हे त्याचे दीर्घकालीन उद्दिष्ट पुढे ठेवले गेले आहे. टीएफआरमधील या ढासळत्या कलाबद्दल चिंता करून, स्वदेशी जागरण मंच भारतातील सामान्य लोकांना आणि विशेषतः मत निर्माते, धोरण विश्लेषक आणि धोरण निर्मात्यांनी या मुद्द्यावर खोलवर विचार करण्याचे आवाहन करतो की टीएफआरमधील घट प्रतिस्थापन पातळीच्या खाली आहे, जी दीर्घकाळात समाजाच्या अस्तित्वासाठी हानिकारक आहे. आपण हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे की आज भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावत असलेली देशाची लोकसंख्या टिकवून ठेवायची आहे, जेणेकरून आपल्या विकासाच्या प्रयत्नांमध्ये कोणताही अडथळा येणार नाही. तसेच हेही समजून घेतले पाहिजे की जर आपण या संदर्भात सावधगिरी बाळगली नाही तर, कमी होत जाणारा एकूण प्रजनन दर लोकसंख्येमध्ये एक धोकादायक असंतुलन निर्माण करू शकतो ज्यामुळे अवलंबित्वाचा भार वाढू शकतो आणि आपला विकास कमी होऊ शकतो.

आपल्या प्रगत आणि शिक्षित समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची २०२३ ची ताजी आकडेवारी केवळ काळजी करण्यासारखीच नव्हे तर चिंताजनक म्हणजे प्रजनन दर १.५० पेक्षा कमी झाली असल्याचे संकेत आहेत.

विश्व आरोग्य संघटना, विदेशी औषध उत्पादक कंपन्या, सामाजिक प्रबोधन करणाऱ्या जागतिक संघटना आणि वैश्विक सामाजिक माध्यमे यांनी विशेषतः उदारीकरणानंतर म्हणजे १९९१ नंतर आपल्या देशात कुटिलतापूर्वक जो धुमाकूळ घातला त्याचा परिणाम आहे. 'हम दो, हमारे दो', 'छोटा परिवार, सुखी परिवार' या आकर्षक घोषणांनी जगासमोर अनेक बिकट प्रश्न निर्माण झाल्याचे जागतिक स्तरावर स्वीकारले जात आहे. वाढत्या लोकसंख्येकरिता अन्नधान्य, शिक्षण, वैद्यकीय सुविधा पुरविणे अशक्य असल्याचा निर्वाळा देत दोनपेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्यांच्या सुविधा रद्द करण्यापर्यंत नियम ताणले गेले. विशिष्ट वर्ग या नियमांचा बळी ठरला. देशातल्या बुद्धिजीवी, अध्ययनशील समाजशास्त्री, राष्ट्रप्रेमी आणि एकूणच समाजाने या विषयाच्या विविध आयामांचे सखोल अध्ययन आणि चिंतन करून विशेषतः तरुणांमध्ये व्यापक प्रबोधन करण्याची गरज आहे. अनेकांसोबत चर्चा केल्यानंतर वर्षानुवर्षे समाजकार्य करणाऱ्या अनेकांना देखील या सामाजिक प्रश्नाची साधी तोंडओळख सुद्धा नाही असे ध्यानात येते. अध्ययनकर्त्यांनी या विषयाच्या आयामांवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकावा असे वाटते.

अ. भा. सह संयोजक, स्वदेशी जागरण मंच
९४२२१०४८२१

# जिल्ह्याच्या काही भागात अवकाळी पाऊस

## फळबागा अन् द्राक्षबागांना पावसाचे भय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या काही भागात शनिवारी पहाटे अवकाळी पावसाने हजेरी लावली. सोलापूर जिल्ह्यालगत असलेल्या धाराशिव जिल्ह्यातही या पावसाने जोरदार हजेरी लावल्याने अनेकांच्या फळबागा, फुलोऱ्यात आलेल्या द्राक्षबागांना फटका बसण्याची भीती जाणकार शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, हा पाऊस मोठा नसल्याने सध्या काही नुकसान नाही मात्र मोठा पाऊस पडला तर मात्र द्राक्ष बागायदारांचे मोठे नुकसान होण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे.

या अवकाळी पावसामुळे माळरान आणि जिरायत शेतजमिनीतील रब्बी हंगामातील सर्वच पिकांना मोठा फायदा होणार असून, याचा ज्वारी पिकाला जास्तीचा फायदा होणार असल्याचीही माहिती काही शेतकऱ्यांनी दिली. ज्या ज्वारीपिकाला पाण्याची गरज होती; त्या ठिकाणी असा जोरदार पाऊस पडला तर त्या पिकांना जणू अमृतसंजीवनीच मिळाल्यासारखे होते आणि अशा जोरदार पडलेल्या एकाच पावसावर ज्वारीच्या कणसाला टपोरे दाणे येतात; अशीही माहिती काही जाणकार शेतकऱ्यांनी दिली. सध्या वाप्यातील (बागायती) रब्बी पिके डोलत असून, त्या पिकांना असा पाऊस पडणे म्हणजे दुग्ध शर्करा योगच समजले जाते. ज्या भागात या अवकाळी पावसाने हजेरी लावली त्या ठिकाणच्या उत्पन्नात भरीव वाढ यंदा होणार असल्याचेही संकेत काही शेतकरी बांधवांनी दिले. एकंदरीत, या अवकाळी पावसामुळे कही खुशी, कही गम असाच प्रकार दिसून येणार आहे.

सोलापुरातही आज सकाळी थोडे सुर्यदर्शन झाले आणि पुन्हा दिवसभर ढगाळी वातावरण दिसून आले. असेच ढगाळी वातावरण गेल्या आठ दिवसांपासून सोलापूर शहर-जिल्ह्यात सुरू आहे. अजूनही अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात येत असल्याने भविष्यातही अजून अवकाळी पावसाची भीती आहे.

# महायुती सरकारकडून सोलापूरकरांना अनेक अपेक्षा

## स्थानिक नेत्यांनाच मंत्री अन् पालकमंत्री करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्यानंतर सोलापुरात भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला आणि आता भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी परजिल्ह्यातील पालकमंत्री सोलापूरला न देता आहे त्या सोलापूरच्याच आमदारांपैकी एकाला पालकमंत्री, मंत्रीपद देवून सोलापूरच्या विकासाला चालना द्यावी, अशी अपेक्षा भाजपाच्या काही जेष्ठ नेत्यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली.

गेल्या ५ वर्षात स्थानिकचे पालकमंत्री झाले नसल्याने विकास रखडला असल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे. इतकेच कायतर त्या कालावधीत दरवर्षी पालकमंत्री बदल झाल्याने नव्याने आलेल्या पालकमंत्र्यांना सोलापूरच्या प्रश्नांबाबत कधीही जिव्हाळाच निर्माण झाला नाही. यामुळे सोलापूरच्या विमानतळाचा प्रश्न असो, उजनी पाण्याचे वार्षिक नियोजन करणे, शहरातील बेरोजगारी, नवीन उद्योग शहरात आणणे, बोरामणी विमानतळ विषय असो अथवा शहरातील उड्डाणपुलांचा विषय असो...अनेक विषय असून, आजवर कोणत्याही पालकमंत्र्यांनी या विषयांकडे गांभीर्याने न पाहिल्याने हे प्रश्न गेल्या १० वर्षांपासून रखडलेलेच आहेत. जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी, जागा महामार्गामध्ये गेल्या असून, अपेक्षित मोबदला त्यांना मिळाला नसल्याची त्यांची खंत आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या प्रगतीसाठी स्थानिकच्या आमदारांना मंत्री करून पालकमंत्री पद द्यावे, अशी अपेक्षा सोलापूरकरांची आहे.







### कोणाच्या गळ्यात पडणार पालकमंत्रीपदाची माळ

सोलापूर शहरात महायुतीतून आ. सुभाष देशमुख, आ. विजय देशमुख, आ. देवेंद्र कोठे हे तीन आमदार निवडून आले आहेत. तर जिल्ह्यातील अक्कलकोट मतदारसंघातून आ. सचिन कल्याणशेट्टी, पंढरपूर-मोहोळ मतदारसंघातून समाधान आवताडे हे आमदार म्हणून निवडून आले आहेत. दरम्यान, या ५ जणांपैकी सोलापूर जिल्ह्याचा कोण मंत्री अन् पालकमंत्री होणार? याची उत्सुकता शिगेला पोहाचली आहे.

# सिव्हिल हॉस्पिटलमधील बी ब्लॉकच्या पाठीमागे तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

सिव्हील हॉस्पीटलच्या बी ब्लॉकच्या पाठीमागे तरूणाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. अभिजित बळीराम रोकडे (वय २१, रा. पडसाळी, ता. उत्तर सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. ६ डिसेंबर रोजी रात्री पावणे आकराच्या सुमारास सिव्हील हॉस्पीटलमधील बी ब्लॉकच्या पाठीमागे अज्ञात कारणावरून अभिजित रोकडे याने विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे त्यास त्रास होऊ लागल्याने अभिषेक रोकडे यांनी त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल के. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



# गुळवंची ग्रामपंचायतीच्या वतीने घरगुती मिक्सर वाटप

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

जागतिक अपंग दिनानिमित्त गुळवंची ग्रामपंचायतच्या वतीने पाच टक्के निधीतून घरगुती मिक्सर वाटप करण्यात आले. यावेळी उत्तर सोलापूर शिवसेना तालुकाप्रमुख संजय पौळ, गुळवंची गावचे सरपंच सुनील जाधव, उपसरपंच आरती इंगळे, विष्णू दादा भोसले-पाटील, धनाजी भोसले-पाटील, दिनेश जगताप, तृप्ती पौळ उपस्थित होते. यावेळी माजी उपसरपंच पांडुरंग नवगिरे,संभाजी भोसले-पाटील, प्रशांत पौळ, अशोक बोराडे, सागर बोराडे उपस्थित होते.

# फताटेवाडी ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधीचा झाला गैरवापर

## गैरप्रकाराचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल; सरपंच हरिश्चंद्र राठोड यांना नोटीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर**

जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील फताटेवाडी ग्राम पंचायतीच्या ग्रामनिधीत गैरप्रकार झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. त्यानुसार जिल्हा परिषदेकडून चौकशी केली. ग्रामपंचायतीने दप्तर उपलब्ध न दिल्याबाबतचा चौकशी अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे. सरपंच हरिशचंद्र राठोड यांना ग्रामपंचायत विभागाने दप्तर उपलब्ध करुन देण्यासाठी नोटीस पाठविली आहे.

### विरोधकांनी राजकीय द्वेषापोटी केली तक्रार

ग्रामपचायतींमध्ये सर्व प्रकारची कामे केली आहेत. विरोधकांनी राजकीय द्वेषापोटी तक्रार केली आहे. याअगोदर दोन चौकशी झाल्या आहेत. त्यात गैरप्रकार झाल्याचे उघड झाले नाही. काम करणाऱ्यांना विनाकारण त्रास दिला जात आहे.

सदरचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला असून त्या संदर्भात जिल्हाधिकारी निर्णय घेतील. फताटेवाडी ग्रामनिधीत अनियमतता झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. त्यानुसार समिती नेमून चौकशी केली. ग्रामपंचायतींचे दप्तर उपलब्ध नसल्याने चौकशी समितीने अंतिम अहवाल दिला नाही. तो अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला. त्यावर ते निर्णय घेतील. **- ईशाधिन शेळकंदे,** उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग

दरम्यान, फताटेवाडी ग्राम पंचातीच्या ग्रामनिधीत गैरप्रकार झाल्याची तक्रार ग्रामस्थ विनोद चव्हाण यांनी ग्रामपंचायत विभागाकडे केली होती. त्यानंतर ग्रामपंचायतीने ग्रामसेवक बी. डी. पाटील यांना निलंबित करून चौकशी समिती नेमली होती.

ग्रामपंचायतीचे दप्तर उपलब्ध नसल्याने ग्रामनिधीत गैरप्रकार झाला की नाही, हे सिद्ध करता येत नसल्याचे चौकशी समितीने सांगितले. ग्रामपंचायतीने दप्तर उपलब्ध करुन द्यावे, अशी मागणी नोटिसीद्वारे केली आहे.

## संक्षिप्त वृत्त




# श्री कॉम्प्युटर्सला सर्वोत्कृष्ट संगणक संस्थेचा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

महारराष्ट्र ज्ञान महामंडळाची वार्षिक सभा नुकतीच पार पडली.या सभेत रामलाल चौक येथील श्री कॉम्प्युटर्सला सोलापूर जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट संगणक प्रशिक्षण संस्था हा पुरस्कार देण्यात आला. क्लिक कोर्सेसचा सर्वाधिक निकाल, विद्यार्थी संख्या, सुपर परफार्मिंग इन्स्टिटयूट, समाजोपयोगी उपक्रम या प्रकारात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. निर्मलकुमार फडकुले सभागृहातील या सभेत महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यस्थापकीय संचालक विना कामत आणि रिजिनल मॅनेजर महेश पत्रिके, रोहित जेऊरकर यांच्या हस्ते हा पुरस्कार श्री कॉम्प्युटर्सचे संस्थापक सचिन तिकटे व संचालिका शामबाला तिकटे यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्कारांमध्ये सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक आणि भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. यश संपादन करण्यासाठी संस्थेच्या संचालिका शामबाला तिकटे, सहशिक्षक प्रियंका दसाडे, प्रतीक्षा कांबळे, सुषमा व्हनमाने, वैष्णवी मसरे, लक्ष्मी निंबाळकर, पूजा दसाडे यांचे योगदान महत्वपूर्ण ठरले. सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# राज्य नाट्य स्पर्धेद्वारे हजारो रंगकर्मींची घडली रंगयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे होत असलेल्या ६३ व्या राज्य नाट्य स्पर्धेने महाराष्ट्रातील हजारो हौशी रंगकर्मींना नाट्यविष्कार सादर करण्याची संधी मिळाली असून राज्यातील आणि राज्याबाहेरील अशा २५ केंद्रांतून प्राथमिक फेरीतील नाट्योत्सव रंग भरू लागला आहे.

दरवर्षी होणाऱ्या या राज्य नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी एकूण २५ केंद्रावर संपन्न होत असते. यातून प्रत्येक केंद्रावर किमान १४ ते १५ नाट्य संघांचा प्रवेश याप्रमाणे ३५० ते ३७५ नाट्यसंघ आपले नाट्य प्रयोग सादर करत असतात. यामधून प्रत्येक नाट्य संघाचे तंत्रज्ञ आणि कलावंत असे एकूण २० जण गृहीत धरले तर अंदाजे सात हजार ते साडेसात हजार रंगकर्मी रंगमंचावर आपले कौशल्य पणाला लावत असतात. प्रत्येक केंद्रावरून प्राथमिक फेरीतील पहिले तीन विजेते घोषित होतात. तर केंद्राच्या संख्याबळानुसार पहिले दोन किंवा तीन नाटकांना अंतिम फेरीसाठी निवडले जाते. मराठी नाटकांच्या संवर्धन आणि हौशी कलावंतांना रंगमंच उपलब्ध व्हावा म्हणून राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा आयोजित करते. स्पर्धेचे हे ६३ वे वर्ष आहे. सोलापूर केंद्रावर तीन नाट्यप्रयोग होणे बाकी आहे. त्यामध्ये ८ डिसेंबरला विक्रमाचा घातांक क्ष, ९ डिसेंबरला छदम् आणि १० डिसेंबरला मोनालिसा नटवर्य डॉ. गिरीश ओक यांच्या शुभेच्छा. स्वतः राजनाट्य स्पर्धेतून व्यावसायिक कलाक्षेत्रामध्ये भक्कम पाय रोउन असलेले डॉ. गिरीश ओक काही कार्यक्रमानिमित्त सोलापूरला आले होत. नटवर्य डॉ. गिरीश ओक यांनी सोलापूरच्या राज्य नाट्य स्पर्धा केंद्राला भेट देवून स्पर्धा संयोजनाबद्दल स्पर्धेच्या सोलापूर केंद्राचे समन्वयक अमोल धाबळे यांचे कौतुक केले.



# मुंबईतून पळून आलेली दोन मुले पालकांच्या स्वाधीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि. ७ डिसेंबर-**

अभ्यासासाठी वारंवार बोलत असल्याने रागाच्या भरात दोन मुलांनी मुंबईतून पळ काढून सोलापूर गाठले. शहरातील बीट मार्शलच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी चौकशी केली. नंतर मुंबई येथे आई- वडिलांना संपर्क साधून मुलांना त्यांच्या स्वाधीन केले.

रुद्राक्ष दीपक मावळे (वय १५, रा. ५ फावरेचाळ, पुष्पा पार्क, बानडोगरी, मालाड, मुंबई) व यशवंत शिवशंकर म्हेत्रे (वय १४, रा. ०१ वारलीचाळ, पुष्पा पार्क, बानडोगरी, मालाड, मुंबई) असे ताब्यात घेण्यात आलेल्या दोघांची नाव आहेत. रूद्राक्ष व यशवंत हे दोघे श्री सिद्धेश्वर मंदिर परिसरात फिरताना आढळून आले. ऑपरेशन मुस्कान १३ अंतर्गत कर्तव्यावर असलेल्या फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या बीट मार्शलला ही दोन मुले आढळून आली. त्यांनी दोघांकडे चौकशी केली, तेव्हा त्यांनी मुंबईचे रहिवासी असल्याचे सांगितले.

## निधन वार्ता

### प्रदीप मस्के

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**



जुना बोरामणी येथील प्रगतशील शेतकरी प्रदीप दत्तात्रय मस्के (वय ४१ वर्षे) यांचे शनिवारी दुपारी अकस्मात निधन झाले. त्यांच्यावर बोरामणी येथे रविवार दि.८ डिसेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली,भाऊ,आई असा परिवार आहे. पत्रकार रविंद्र मस्के यांचे ते सख्खे चुलत बंधू होत.

### रविकुमार चिट्याल

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**



जुना अक्कलकोट व्यंकटेश नगर येथील रविकुमार रामचंद्रम चिट्याल (वय- ६०) यांचे दि.७ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा उद्या (रविवार) सकाळी ११ वाजता राहत्या घरातून निघणार आहे.

### महादेव करंडे

**वैराग, दि. ७ डिसेंबर-**



वैराग येथील विद्यामंदिर हायस्कुलचे माजी सहशिक्षक तथा श्री महांकाळेश्वर देवस्थान ट्रस्ट सासुरेचे विश्वस्त मार्गदर्शक महादेव श्रीपती करंडे (वय ८४) यांचे हृद्यविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन पत्नी, चार मूल, दोन मुली असा परिवार आहे. जगदंबा उदयोग समूहाचे अध्यक्ष डॉ. अजय करंडे आणि मीरा माहिदर महानगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक सचिन करंडे यांचे ते वडील होत. त्यांच्यावर वैराग येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अनंता पतंगे-म्हेत्रे

**पंढरपूर, दि. ७ डिसेंबर-**

श्रीसंत नामदेव शिंपी समाजाचे जेष्ठ समाजसेवक अनंत तुकाराम पतंगे-म्हेत्रे (वय ७४) यांचे शनिवारी सकाळी ८.१५ वा. हृदयविकाराच्या निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. गोपाळपूर रोडवरील वैकुंश स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



# पैशाच्या कारणावरुन सासूला जावयाकडून मारहाण

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

कुंभारी येथील नविन विडी घरकुल परिसरात सासूला पैशाच्या कारणावरून जावयाकडून मारहाण केल्याची घटना घडली. रजिया महेबूब मोहोळकर (वय ४८, रा. शास्त्री नगर, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. ७ डिसेंबर रोजी नविन विडी घरकुल परिसरात मुलीला भेटण्यास गेल्या होत्या. त्यावेळी जावई कादर शेख व इतर दोघांनी रजिया यांना पैशाच्या कारणावरून लाथाबुक्क्याने जबर मारहाण केली.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000034477 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:17/2024-2025, Particulars: -** Work of providing servicing of skilled persons on outsource basis at PAC Division, Solapur and 400 kV R.S. Division Lamboti Estimated **cost:** Rs. 82,89,547/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 82,895/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 07.12.2024 to 22.12.2024 **Last Date of Submission:** 22.12.2024 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 23.12.2024 at 12:00Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details please visit to https://srmetender.mahatransco.in.
**PRE-BID Meeting:** 13.12.2024 @ 12:00 pm at EHV O&M Circle Solapur.
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

**मध्य रेल्वे**

**NI वर्कसाठी लाइटिंगची तरतूद खुली निविदा सूचना क्रमांक**
**LCF/DR/GS/ 474/DG/2024/10, दि. 02.12.2024**

उपमुख्य विद्युत अभियंता (कॉन्स्ट.) दादर, टिळक पुलाजवळ, पश्चिम रेल्वेच्या प्लॅटफॉर्म क्र. 5 समोर, दादर (पश्चिम) मुंबई - 400028 भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने वेब-साईटद्वारे ऑनलाइन निविदा मागविण्यात येत आहेत. खालील कामासाठी नामांकित कंत्राटदारांकडून: कामाचे नाव: एनआय कामासाठी डीजी सेटसह प्रकाश व्यवस्था करण्याची तरतूद मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील कसारा, कर्जत, जासई, जेएनपीटी, पनवेल, सायन येथे. अंदाजे खर्च: कामाची एकूण किंमत रु. 3,40,62,647/- (रु. तीन कोटी चाळीस लाख बासष्ट हजार सहाशे सत्तेचाळीस फक्त) बयाण रक्कम: रु. 3,20,300/- (रुपये तीन लाख वीस हजार तीनशे फक्त) किंवा www.lreps.gov.in वेबसाइटद्वारे मार्गदर्शन केल्यानुसार पूर्ण कालावधी: पावसाळ्यासह 06 (सहा) महिने. निविदा फॉर्मची किंमत: NIL ऑफरची वैधता: ६० (साठ) दिवस. वेबसाइट: www.ireps.gov.in या वेबसाइटवरून निविदा सूचना आणि निविदा दस्तऐवजात प्रवेश केला जाऊ शकतो: सबमिट करण्याची तारीख आणि वेळ: 23/12/2024 रोजी 15:00 तासांपर्यंत निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 23/12/2024 रोजी 15:00 तासांनंतर टीप: संभाव्य निविदाकारांना सूचित केले जाते की त्यांच्या ऑफर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने निविदा करण्यापूर्वी त्यांनी अटी आणि शर्ती, पात्रता निकष, ईएमडी आणि निविदा दस्तऐवजाची किंमत सादर करण्याची पद्धत इत्यादींसंबंधी निविदा तपशीलांसाठी CRIS वेबसाइट www. Ireps.gov.in

**DCEE (C), दादर, मुंबई** 588

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४५/२०२४
नि. ०७

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधिश सो., यांचे कोर्टात**

**१) सुनिता राजेंद्र जिरगे**
**२) समर्थ राजेंद्र जिरगे**
अर्जदार नं. १ स्वतः करीता व अर्जदार नं.२ यांचे अ.पा.क. जनक आई म्हणून. **- अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन** **- सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दि. कि. अर्ज नं. १४५/२०२४ हा अज्ञानाच्या नांवे असलेली खालील नमूद मिळकत विक्री करण्यासाठी गार्डीयन्स वार्डस ॲक्ट १९९० चे कलम ९ प्रमाणे यातील अर्जदार नं. २ समर्थ राजेंद्र जिरगे हा अज्ञान असून त्याच्या नांवे खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत विक्री करण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत कोणाची काही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठर्थ अथवा विरुध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास अथवा या जमीनीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हिस्सा असल्याबाबत त्यांनी हा जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक ०८/०१/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अज्ञान अर्जदार क्र.२ याच्या मालकीची खालील नमूद जागा ही विक्री करणेकामी आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

**१) मिळकतीचे वर्णन** :- जिल्हा सोलापूर, तालुका अक्कलकोट येथील मौजे अक्कलकोट (ग्रामीण), अक्कलकोट नगर परिषद हद्दीतील बिनशेती खुली प्लॉट जागा यासी गट नं.१०२६, पैकी प्लॉट नं.५८, यांसी क्षेत्र १.३८.०५ चौ.मी., यासी आकार १३रु.८० पैसे यासी चतुःसिमा :- पूर्वेस - प्लॉट नं. ६९, दक्षिणेस -१२ मीटर रस्ता, पश्चिमेस - ९ मीटर रस्ता, उत्तरेस प्लॉट नं. ३९. येणेप्रमाणे वर्णन केलेली बिनशेती खुली प्लॉट जागा त्यातील दगड, माती, वृक्ष, पाषाण वगैरे तदंगभूत वस्तुसहीतची मिळकत

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे माझ्या सहीने हे जाहीर प्रसिध्द केले ता. ७/१२/२०२४

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.८७/२०२४
निशाण नं. ५

**बार्शी येथील मे, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात**

१) श्रीमती सिमा राजेंद्र आंधळकर, वय ४६ वर्षे, धंदा-घरकाम,
२) प्रगती राजेंद्र आंधळकर, वय-२५ वर्षे, धंदा-शिक्षण, **--अर्जदार**
३) प्रणय राजेंद्र आंधळकर, यय-१८ वर्षे, धंदा- शिक्षण,
सर्व रा. ग्रामपंचायत ऑफिस जवळ, सौंदरे, ता. बार्शी,
४) प्रियंका अजय गुळमिरे, वय-२८ वर्षे, धंदा-घरकाम,
रा.-फ्लॅट नं.०८, २ह-१२१, साईसीध्द हौ. सो.
अपोझिट शाहू गार्डन, शाहूनगर, ग-बॉल्क, पुणे

**विरुध्द**

रामलिंग गौरीशंकर आंधळकर, वय ५४ वर्षे, धंदा-शेती,
रा.- गट नं.५२१/२/२, प्लॉट नं. ८१, आत्रिक ऋषी रोड, **--सामनेवाला**
स्वराज्य कॉलनी, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

१) ज्याअर्थी, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज यातील अर्जदार नं. १ ची पत्नी व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडिल राजेंद्र तुकाराम आंधळकर यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत व तसे वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेकरिता या मे. कोर्टात दाखल केला आहे.

२) त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदारांचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असतील तर हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेली ता. १७/१२/२०२४ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विद्यीज्ञा मार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदती नंतर मे. कोर्टात पुढील हुकूम होतील.

हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. ०५/१०/२०२४

**कनिष्ठ लिपिक**

**शिक्का**

**सही/-**
**राहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्या. क. स्तर, बार्शी)**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः बार्शी तालुक्यातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब. डी. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी हद्दीतील मिळकत त्याचा गट नं.२९९/४, याचे क्षेत्रफळ ०१ हे. ७४आर यापैकी ०० हे ६८ आर, यासी चतुःसिमा पूर्वेस त्याच गटातील इंदुमती भारत केदरलिंगे यांची जमीन, दक्षिणेस बार्शी नागोबाचीवाडी रोड, - पश्चिमेस त्याच गटातील कांचन सतिश गुंड यांची जमीन, उत्तरेस गट नं. २९८ या वर्णनाची मिळकत आहे. वर वर्णन केलेली मिळकत ही श्री. विलास शिवाजी गुंड यांच्या मालकी वहिवाटीची होती व आहे. वर नमूद मिळकत ही विलास शिवाजी गुंड यांना रे.मु.नं. ६६४/२०१७ मधील कोर्ट वाटपातून मिळालेली आहे. नमुद केलेल्या मिळकतीस श्री. विलास शिवाजी गुंड यांचे नावाची ७/१२ उतारा ला नोंद आहे. सदर मिळकतीमध्ये श्री. विलास शिवाजी गुंड यांचा प्रत्यक्ष कब्जा / वहिवाट आहे. श्री. विलास शिवाजी गुंड यांनी वरील मिळकत विक्रीस काढलेली आहे त्यामुळे आमचे अशिलानी वरील मिळकत खरेदी करण्याचे ठरवलेले आहे. वर नमुद मिळकत ही निर्वेध, निजोखमी असले बद्दल श्री. विलास शिवाजी गुंड यांनी आमचे अशिलास खात्री, भरवसा व विश्वास दिलेला आहे. वर नमुद मिळकत ही निर्वेध निजोखमी असले बद्दल आमचे अशिलाची खात्री झालेली आहे. वरील मिळकती मध्ये श्री. विलास शिवाजी गुंड यांचे शिवाय इतर कोणाचाही कायदेशीर हक्क संबंध नव्हता व नाही. याची आमचे अशिलास खात्री झालेली आहे. या शिवाय वरील प्लॉट मध्ये श्री. विलास शिवाजी गुंड यांचीच कबजे वहिवाट असले बद्दल ही आमचे अशिलाची खात्री झालेली आहे.

तरी देखील वरील मिळकती संदर्भाने कोणाचे खरेदीखत, साठेखत, कब्जा, वहिवाट, लिज, कर्ज, गहाणखत, दान, पोटगी, वाटप अशा किंवा इतर कोणत्याही प्रकारचे काही हक्क अधिकार असलेस त्यांनी कागदपत्रासह खाली नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसात लेखी हरकत नोंदवावी मुदतीत कोणाची काहीही लेखी हरकत न आलेस आमचे आशिल ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाची काहीही हरकत / तक्रार चालणार नाही कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली ता. ०७/१२/२०२४.

**सही/-**
**श्री. अनिल रघुनाथराव पाटील** B.A.. (Hon's) LL.B
**श्री. अभिजीत अनिल पाटील** B.A.. LL.B L.L.M.
ॲडव्होकेटस्
'फॉर्च्यून टॉवर' फ्लॅट नं.१५, तिसरा मजला, श्री भगवंत मंदिराजवळ, बार्शी नगरपरिषदे समोर बार्शी
मो.नं. ९४२१०२४६९२ / ९४०५७२७१२०

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- डि।। व सब डि।। सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे कुंभारी** येथील **गट नं. ३३९/३४२/१/ब** यापैकी बिनशेती **प्लॉट नं. ९** याचे एकूण क्षेत्र **२००.०२ चौ.मी.** इतके आहे. ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे क्षेत्र **२.००.०२ आर.चौ.मी.** इतके आहे. **यांसी चतुः सिमा** :- पूर्वेस : प्लॉट नं. ८, दक्षिणेस: गट नं. ३३८ चा भाग, पश्चिमेस : प्लॉट नं. १०, उत्तरेस : १२.०० मी. रस्ता असे आहे. सदर मिळकत **प्रकाश लक्ष्मण मोकाशे** यांचे मालकीची असून ७/१२ उताऱ्यावर त्यांचे नावाची नोंद फेरफार क्र. १३६०० ने नोंद झालेली आहे. सदर मिळकत **प्रकाश लक्ष्मण मोकाशे** यांनी आमचे अशिल यांना विक्री करण्याचे ठरवून इसारा पोटी रक्कम स्विकारुन व्यवहार ठरविलेला आहे. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री **प्रकाश लक्ष्मण मोकाशे** यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी परंतु सदर मिळकतीत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, करार, दान, लिज, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वाटणी, पोटगी, टाच, जप्ती, कुळ, वहिवाट, कब्जाकरार, मदार, या संबंधीचा हक्क असेलस आणि इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क व हितसंबंध असलेस अथवा सदर मिळकती सबंधी कोणाचीही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास अथवा कोणत्याही प्रकारे सावकारी बोजा असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत सदर मिळकतीत असलेले हक्क दर्शविणारे कागदपत्रे पुराव्यासह खालील नमुद पत्यावर प्रत्यक्ष येऊन असलेल्या हक्काची खात्री पटवून दयावी. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार व हरकत न आल्यास ठरल्याप्रमाणे आमचे अशिल यांनी **प्रकाश लक्ष्मण मोकाशे** यांचेबरोबर ठरवलेला वर नमुद मिळकती संबंधीचा व्यवहारास कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार आमचे अशिल यांचेवर अगर त्यांनी खरेदी करुन घेतलेल्या मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसवणुक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ही जाहीर नोटीस दिली ता.०६/१२/२०२४.

**अशिल**

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. सलाम मोहम्मदसाब बगलुर**
B.A., LL.B., M.S.W. D.M.C.J. **ॲडव्होकेट**
ऑफीस पत्ता. गाळा नं. १०, पहिला मजला, दारुस्सलाम अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### आशिया चषक कायम राखण्याचे भारताचे लक्ष्य

**मस्कत :** भारतीय कनिष्ठ महिला हॉकी संघ मस्कत, ओमान येथे होणाऱ्या कनिष्ठ गट महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत भाग घेण्यासाठी सज्जा झाला असून त्यांनी या स्पर्धेचे विजेतेपद ापल्याकडेच कायम ठेवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. ७ ते १५ डिसेंबर दरम्यान होणारी ही स्पर्धा चिली येथे होणाऱ्या एफआयएच कनिष्ठ महिला विश्वचषक २०२५ स्पर्धेसाठी पात्रता स्पर्धा म्हणूनही काम करते. भारतीय संघाचे नेतृत्व प्रशिक्षक तुषार खांडकर, कर्णधार ज्योती सिंग आणि उपकर्णधार साक्षी राणा करणार आहेत. या संघात दीपिका, वैष्णवी विठ्ठल फाळके, सुनीलिता टोप्पो आणि मुमताज या खेळाडूंचाही समावेश आहे. या खेळाडू गत वर्षीच्या विजेतेपदापासून वरिष्ठ संघासाठी खेळल्या असून त्या स्पर्धेदरम्यान उर्वरित खेळाडूंना मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करतील. २०२३ मध्ये भारताने अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाचा २-१ असा पराभव करून प्रथमच विजेतेपद पटकावले. भारताच्या अ गटात चीन, मलेशिया, थायलंड आणि बांगलादेशचा समावेश आहे. ब गटात दक्षिण कोरिया, जपान, चीन तैपेई, हाँगकाँग व श्रीलंका संघांचा समावेश आहे.

# ऑस्ट्रेलियाची सामन्यावर मजबूत पकड

## ट्रॅव्हिस हेडचे शतक, लॅबुशेनचे अर्धशतक ● भारत अजून २९ धावांनी पिछाडीवर

◆ **ॲडिलेड, ७ डिसेंबर**

बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेतील भारताविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाने फलंदाजी व गोलंदाजीचे जबरदस्त प्रदर्शन करत सामन्यावर आपली पकड मजबूत केली.

मार्नस लॅबुशेनचे अर्धशतक व ट्रॅव्हिस हेडच्या झटपट शतकाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने ८७.३ षटकांत ३३७ धावा काढल्या. सिराज व बुमराहने प्रत्येकी ४ बळी टिपल्यामुळे ऑस्ट्रेलियाला १५७ धावांची आघाडी मिळवता आली. मात्र दिव्यांच्या प्रकाशाखाली भारताचा दुसरा डाव कोसळला. आजचा खेळ आटोपला तोपर्यंत भारताने दुसऱ्या डावात २४ षटकांत १२८ धावांत आपला निम्मा संघ गमावला. त्यावेळी ऋषभ पंत नाबाद २८ धावांवर, तर नितीश कुमार रेड्डी नाबाद १५ धावांवर खेळत होते. भारत अजून २९ धावांनी पिछाडीवर आहे.

पर्थमधील गमावलेल्या पहिल्या कसोटी सामन्यातील अनुभवावरून सावध होत ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी दुसऱ्या डावात भारताची फलंदाजी बहरू दिली नाही. मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स आणि स्कॉट बोलॅण्ड या वेगवान गोलंदाजांनी भारतीय फलंदाजांवर दबाव आणला. त्यांना त्यांच्या विकेट-टू-विकेट गोलंदाजीचे बक्षीस मिळाले. बोलॅण्ड व कमिन्सने प्रत्येकी दोन बळी टिपले, तर स्टार्कने शुभमन गिलला (२८) सुंदर इनस्विंगरसह त्रिफळाचित केले. बोलॅण्डने यशस्वी जयस्वाल (२४) व विराट कोहलीला (११) ॲलेक्स कॅरीकडून झेलबाद केले, तर कमिन्सने के. एल. राहुलला (७) कॅरीकडून झेलबाद केले, तर कर्णधार रोहित शर्माचा (६) त्रिफळा उडवला.


फटकेबाजी मारताना ट्रॅव्हिस हेड


फटका मारताना शुभमन गिल

त्यापूर्वी, ऑस्ट्रेलियाने कालच्या १ बाद ८६ धावांवरून पुढे आपल्या पहिल्या डावास सुरुवात केली. कालचा नाबादवीर नॅथन मॅकस्विनी ३९ धावांवर बोद होण्यापूर्वी त्याने मार्नस लॅबुशेनसोबत दुसऱ्या गड्यासाठी ६७ धावांची भागीदारी केली. बुमराहने स्टीव्ह स्मिथला (२) यष्टिमागे पंतकडे झेल सोपवण्यास भाग पाडले, मात्र त्यानंतर लॅबुशेन व ट्रॅव्हिस हेड या जोडीने भारतीय गोलंदाजांचा समाचार घेत चौथ्या गड्यासाठी ६५ धावांची भागीदारी करून ऑस्ट्रेलियाला १६८ धावांचा टप्पा गाठून दिला. दरम्यान ट्रॅव्हिस हेडने १११ चेंडूंत १० चौकार व ३ षट्काराच्या मदतीने आपल्या १०० धावा पूर्ण केल्या. पुढे ट्रॅव्हिस हेडने मिचेल स्टार्क (१८), ॲलेक्स कॅरी (१४) व पॅट कमिन्सच्या (१२) साथीने संघाला ३१० धावांचा टप्पा गाठून दिला, याचवेळी हेडची घोडदौड मोहम्मद सिराजने रोखली. ट्रॅव्हिस हेडने १४१ चेंडूंत १७ चौकार व ४ षट्कारांसह झटपट १४० धावांची खेळी केली. तळाच्या फळीतील उर्वरित तीन फलंदाजांनी ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या डावात ८७.३ षटकांत ३३७ धावा उभारून देण्यास मदत केली.

भारताच्या दुसऱ्या डावाची सुरुवातही निराशाजनक झाली. सलामीवीर यशस्वी जयस्वालचा जोडीदार केएल राहुल (७) लवकरच बाद झाला, नंतर जयस्वालसुद्धा (२४) बोलॅण्डच्या गोलंदाजीवर कॅरीकडून झेलबाद झाला. त्यानंतर भरवशाचे खेळाडू विराट कोहली (११) व शुभमन गिल (२८) सुद्धा नियमित अंतराने तंबूत परतले.

रोहित शर्माकडून दमदार खेळीची अपेक्षा होती, परंतु तो सुद्धा ६ धावा काढून बाद झाला. भारताने २०.५ षटकांत १०५ धावांत आपले महत्त्वपूर्ण पाच मोहरे गमावले. पुढे ऋषभ पंत व नितीश कुमार रेड्डीने खेळ थांबेपर्यंत नाबाद खेळी करत भारताला २४ षटकांत ५ बाद १२८ धावांवर पोहोचवले. पॅट कमिन्स व स्कॉट बोलॅण्डने प्रत्येकी २ बळी, तर मिचेल स्टार्कने एक बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

## डी. गुकेश-डिंग लिरेनदरम्यानचा १० व्या फेरीचाही सामना अनिर्णीत

### जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद

◆ **सिंगापूर, ७ डिसेंबर**

येथे सुरू असलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत शनिवारी भारतीय युवा ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश व विद्यमान विश्वविजेता डिंग लिरेन यांच्यादरम्यानचा दहाव्या फेरीचा सामनाही अनिर्णीत राहिला. भारतीय आव्हानवीर डी गुकेशने पुन्हा एकदा गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेनशी बरोबरी साधली. उभय प्रतिस्पर्ध्यांदरम्यानचा हा सलग सातवा डाव अनिर्णीत राहिला. या दोघांचेही प्रत्येकी ५ असे समान गुण आहे. तरीही अजिंक्यपद पटकावण्यासाठी अजून २.५ गुणांची गरज आहे.

दहाव्या फेरीत डी. गुकेशकडून कोंडी फोडण्याची आशा होती. गुकेशसाठी काळ्या तुकड्यांसह हा खेळ सर्वात सोपा होता. तो लंडनच्या पद्धतीने खेळला, परंतु डिंग लिरेनने कोणतीही जोखीम घेतली नाही व ड्रॉ निकालावर तो आनंदी होता. दोन्ही खेळाडूंनी ३६ चालीनंतर डाव बरोबरीत राखण्यास मान्यता दिली. चौदा फेऱ्यांच्या या स्पर्धेत डी. गुकेश पुढील डाव पांढऱ्या सोंगट्यानिशी खेळणार आहे. २.५ दशलक्ष डॉलर्स बक्षिसाच्या या स्पर्धेत केवळ चार शास्त्रीय डाव खेळायचे शिल्लक आहेत आणि १४ फेऱ्यांनंतर बरोबरीत निकाल लागल्यास विजेता ठरवण्यासाठी वेगवान वेळेच्या नियंत्रणाखाली डाव खेळला जाणार आहे. ३२ वर्षीय लिरेनने सुरुवातीचा डाव जिंकला होता, तर १८ वर्षीय गुकेशने तिसऱ्या डावांत विजय नोंदवला होता. ◂(वृत्तसंस्था)



डावपेच रचण्यात मग्न डिंग लिरेन व डी. गुकेश

## भारत-बांगलादेश अंतिम सामना आज

### १९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट

◆ **दुबई, ७ डिसेंबर**

रविवारी येथील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर एसीसी १९ वर्षांखालील पुरुष क्रिकेटपटूंच्या आशिया चषक स्पर्धेत विजेतेपदासाठी भारत आणि बांगलादेश यांच्या दरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे. बांगलादेशच्या भेदक गोलंदाजीविरुद्ध भारताच्या दमदार फलंदाजीची असा हा निर्णायक सामना असेल.



आठ विजेतेपदांसह स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघ असलेला भारत तीन विजयाच्या अंतरानंतर आपला मुकुट पुन्हा मिळवण्यास उत्सुक असेल. गतविजेत्या बांगलादेशने गत आवृत्तीत भारताला पराभूत केले होते. हा अंतिम सामना म्हणजे २०२३ च्या उपांत्य फेरीतील भारत व बांगलादेशदरम्यानच्या सामन्याची पुनरावृत्ती असेल. भारताच्या फलंदाजीचे नेतृत्व सलामीवीर आयुष म्हात्रेने केले असून त्याने १७५ धावा केल्या आहेत. १३ वर्षीय वैभव सूर्यवंशीने या स्पर्धेत १६७ धावा केल्या आहेत. तो आगामी आयपीएलमध्ये खेळणार आहे.

दुसरीकडे, बांगलादेश संघाचे यशत्यांच्या गोलंदाजांवर अवलंबून आहे. मोहम्मद अल फहाद आणि मो. इक्बाल हसन इमोनने प्रत्येकी १० बळी टिपून यशस्वी गोलंदाजांच्या यादीत ते आघाडीवर आहे. भारताची मोहीम पुनरुत्थानाची ठरली आहे. पाकिस्तानविरुद्धच्या पराभवानंतर डळमळीत सुरुवात केल्यानंतर भारतीय संघाने शैलीत पुनरागमन केले व उपांत्य फेरीत श्रीलंकेला पराभूत केले.

बांगलादेशनेही संपूर्ण स्पर्धेत सातत्य राखले आहे. त्यांचा गट साखळी फेरीत श्रीलंकेविरुद्ध एकमेव पराभव झाला, परंतु त्यांनी उपांत्य फेरीत पाकिस्तानवर सात गडी राखून वर्चस्व राखून अंतिम स्थान निश्चित केले. ◂(वृत्तसंस्था)

## मेस्सीला मौल्यवान खेळाडूचा पुरस्कार

◆ **मियामी, ७ डिसेंबर**

अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लियोनेल मेस्सीला मेजर लीग फुटबॉल स्पर्धेतील सर्वात मौल्यवान खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. मेस्सीने या स्पर्धेत इंटर मियामी क्लबचे यशस्वीपणे नेतृत्व केले. मेस्सीला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मेस्सीच्या कामगिरीमुळे मियामीला नियमित एमएलएस हंगामात ७४ गुणांची नोंद करण्यात मदत झाली आणि त्याच्या माध्यमातून क्लबला पहिले-वहिले स्पोर्ट्स शिल्ड मिळाले.


पुरस्कारासह लियोनेल मेस्सी

मला हा पुरस्कार दुसऱ्या परिस्थितीत मिळाला असता, तर अधिक आवडले असते. आम्ही अंतिम सामना खेळू शकलो असतो, तर बरे वाटले असते, असे मेस्सीने पुरस्कार स्वीकारताना आपले मनोगत व्यक्त केले.

या वर्षी मेजर लीग सॉकर (एमएलएस) विजेता होण्याचे आमचे मोठे स्वप्न होते. तसे झाले नाही, पण पुढच्या वर्षी आम्ही प्रयत्न करण्यासाठी आणखी मजबूत होऊ. असे ३७ वर्षीय मेस्सी म्हणाला. एमएलएसमध्ये मेस्सी ३६ गोल योगदानांसह आघाडीवर असून त्याने २० गोल केले आणि १६ गोलमध्ये सहकार्य करत आपला नियमित हंगाम संपवला. हा पुरस्कार मेस्सीला दुखापतग्रस्त मोसमात मिळाला. या हंगामात तो केवळ १९ सामने खेळताना दिसला.

लियोनेल मेस्सीचे अभिनंदन. मेस्सी आमच्या लीगमध्ये असल्याचा आम्हाला गौरव वाटतो, असे एमएलएसचे आयुक्त डॉन गार्बर म्हणाले. जगातील सर्वोत्कृष्ट खेळाडू मेजर लीग सॉकरमध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू असणे ही खरोखरच आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे, असेही ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था).

## मेलबर्नमधील चौथ्या कसोटीपूर्वी शमी भारतीय संघात सहभागी होऊ शकतो

◆ **बंगळुरू, ७ डिसेंबर**

भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी कठोर आहार पाळत असून त्याने सुमारे सहा किलोग्रॅम वजन कमी केल्याचे समजते. जर सर्व काही ठीक झाले तर राष्ट्रीय क्रिकेट अकादमी लवकरच त्याचे तंदुरुस्त प्रमाणपत्र जारी करेल. अशा परिस्थितीत मोहम्मद शमी मेलबर्नमध्ये होऊ घातलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यापूर्वी भारतीय संघात सहभागी होऊ शकतो.

ॲडिलेड येथे शनिवारी गुलाबी चेंडूच्या कसोटीत भारताच्या वेगवान गोलंदाजांचा संघर्ष सुरू असताना माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी मोहम्मद शमीचा लवकरात लवकर संघात समावेश करण्याची शिफारस केली आहे.



दुसऱ्या कसोटीला समालोचक म्हणून संबोधित करताना रवी शास्त्री यांनी मालिकेसाठी पाहुण्या संघाच्या वेगवान गोलंदाजी आक्रमणाबद्दल चिंता व्यक्त केली.

शमीच्या उपलब्धतेबद्दल एक प्रकारची आशा दिसत असताना अनेक दिग्गजांनी सूचित केले आहे की, दीर्घकाळ दुखापतीतून सावरलेल्या वेगवान गोलंदाज शमीला लवकरच ऑस्ट्रेलियाला पाठवावे. त्याकरिता तसे प्रयत्न सुरू आहेत.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये परतल्यानंतर शमीने आतापर्यंत मध्य प्रदेश विरुद्ध रणजी करंडक गट साखळी सामन्यात भाग घेतला व सय्यद मुश्ताक अली चषक स्पर्धेतील संपूर्ण साखळी सामनेही खेळला आहे.

वैद्यकीय पथक शमीच्या वजनावर काम करत आहे. शमी सोमवारी सय्यद मुश्ताक अली चषकात चंदीगडविरुद्धच्या उप-उपांत्यपूर्व सामन्यामध्येही खेळणार आहे. गत १६ दिवसांच्या कालावधीतील हा त्याचा आठवा सामना असेल. ◂(वृत्तसंस्था)

## वाणिज्य दूतावासाकडून महिला क्रिकेट संघाचे स्वागत

**ब्रिस्बेन:** ब्रिस्बेनमधील भारतीय वाणिज्य दूतावासाने ब्रिस्बेन क्लबमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यापूर्वी भारतीय महिला संघाचे स्वागत केले. टीम इंडिया तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. ॲलन बॉर्डर फील्ड येथे हा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर, उपकर्णधार स्मृती मंधाना व प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांनी चहापानाचा आस्वाद घेतला. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या महिला विभागाने अधिकृत द एक्स हॅण्डलवर पोस्ट टाकून ही माहिती दिली व या आयोजनाबद्दल आनंद व्यक्त केला. गुरुवारी झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा पाच राखून पराभव केला. रविवारी होणाऱ्या दुसऱ्या वन-डेनंतर तिसरा आणि शेवटचा वन-डे ११ डिसेंबर, बुधवारी पर्थधील वाका स्टेडियमवर होणार आहे.

## महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेज विजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेत संगमेश्वर महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले.

हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयाने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित केलेल्या या स्पर्धेमध्ये संगमेश्वर महाविद्यालयाने सलामीच्या सामन्यात स्वेरी कॉलेज पंढरपूरचा ८ गोलने पराभव केला. उपांत्य फेरीत त्यांनी वालचंद महाविद्यालयास ३ गोलने नामविले. सोशल महाविद्यालयाविरुद्धच्या अंतिम सामन्यात मध्यांतरापर्यंत संगमेश्वर महाविद्यालयाने एक गोलची आघाडी घेतली. त्यानंतर खेळावर चांगल्या प्रकारे पकड ठेवून उर्वरित वेळेमध्ये अजून दोन गोल करून ३-0 गोलने विजय मिळविला.

संघास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, प्रा. शरणबसवेश्वर वांगी, क्रीडा शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ.ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले.



**विजेता संघ :** स्टीफन भोसले, आदर्श बिराजदार, तुषार गंधगे, प्रज्योत कांबळे, सुमित होटगीकर, यश वडवेराव, समर्थ चलवादी, आदित्य कदम, ऋतुराज घोडके, शेख मोहीम, राहुल शिंदे, निरंजन ढोबळे, राघव दुबे, रुद्रेश संकपाळ, सुमित राजपूत, प्रतीक गायकवाड, राज कुश्ते, प्रणव शिंदे, आर्यन वाघमारे व पार्थ भोसले.

## मृण्मयी देशपांडे दुसऱ्यांदा महाराष्ट्र बॅडमिंटन संघात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**



येथील मृण्मयी अतुल देशपांडे हिची राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी महाराष्ट्र महिला संघात सलग दुसऱ्यांदा निवड झाली आहे.

बेंगळुरू येथे १८ ते २४ डिसेंबर दरम्यान खेळल्या जाणाऱ्या ८६व्या राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी मृण्मयीची दुहेरी प्रकारात बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाच्या रँकिंगनुसार निवड झाली असल्याचे महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनने कळविले आहे. मृण्मयी दुहेरीत प्रेरणा अलवेकर हिच्याबरोबर खेळणार आहे. मृण्मयीचे सध्याचे रँकिंग (राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय) : दुहेरी : ७(२१२), एकेरी : ६२(४३०).



## अणणप्पा काडादी प्रशालेत क्रीडा सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

अणणप्पा काडादी हायस्कूल येथे क्रीडा महोत्सव मोठा उत्साहात पार पडला. मल्लिकार्जुन हत्तुरे प्रशालेचे मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे यांच्या हस्ते आंतरवर्गीय क्रीडास्पर्धा उद्घाटन करण्यात आले. प्रारंभी प्रशालेच्या खेळाडूंनी क्रीडा ज्योत प्रमुख अतिथींना मानवंदना देवून दिली. त्यानंतर ध्वजारोहण व शपथविधी घेण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन हवेत फुगे, कबूतर सोडून क्रीडा स्पर्धेला सुरुवात झाली.

प्रास्ताविक मुख्याध्यापक अनिल पाटील यांनी केले. याप्रसंगी क्रीडांगणावर कबड्डी, डॉजबॉल, लंगडी व मैदानी स्पर्धा या विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला. तसेच क्रीडा सप्ताह अंतर्गत स्काऊट गाईडच्या वतीने आनंद मेळावा घेण्यात आला. विविध खाद्यपदार्थाचे स्टॉल ठेवण्यात आले. अनुप थोरात, रतिकांत गायकवाड, रुद्र सुरवसे वेदांत शिरसेकर,अभय भास्कर, श्रवण कांबळे या विद्यार्थ्यांनी आनंद मेळाव्यात सहभाग घेतला. स्काऊट मास्तर प्रदिप अळ्ळीमोरे, राहुल भिंगे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन राहुल भिंगे तर आभार प्रदर्शन मीनाक्षी बिराजदार यांनी केला. पाहुण्यांचा परिचय क्रीडा विभाग प्रमुख नागप्पा मैंदर्गी यांनी केला. क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सचिन पाटील, क्रीडा विभाग प्रमुख नागप्पा मैंदर्गी यांचे मार्गदर्शन लाभले.

## रेल्वे कामगार क्रीडा महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर व डिव्हिजनल स्पोर्ट्स असोसिएशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रेल्वे कर्मचारी करिता आयोजित रेल्वे कामगार क्रीडा महोत्सव उत्साहात पार पडला.

याचे पारितोषिक वितरण समारंभ सोलापूर विभागाचे डीआरएम नीरज कुमार दोहरे यांच्या हस्ते करण्यात आले. या याप्रसंगी मध्य रेल्वे सोलापूर विभागाचे क्रीडा अधिकारी शितल वाली, वरिष्ठ मंडल इंजिनियर समन्वय सचिन गनेर, नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे सचिव सज्जी जेकब, सी.आर.एम.एस.चे सचिव उल्हास बागेवाडी, मध्य रेल्वे सोलापूरचे सचिव किशोर पिल्ले व खजिनदार विक्रांत पवार आदी उपस्थित होते.



या कामगार क्रीडा महोत्सव विविध क्रीडा प्रकारातील वैयक्तिक व सांघिक खेळातील विजेत्या प्रथम तीन क्रमांकाच्या खेळाडूंना व संघांना आकर्षक ट्रॉफी, मेडल व रोख बक्षिसे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुदेश मालप यांनी केले. पारितोषिक वाचन मनोज वाल्मिकी यांनी केले. कामगार क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूरचे कमिटी मेंबर नेताजी घोडके, सुभाष पांढरे, विक्रम माने,नागेश नवले, दत्ता वाघमोडे व मोहनदास यांच्यासहित डिव्हिजनल स्पोर्ट्स असोसिएशनचे कर्मचारी व मध्य रेल्वे इन्स्टिट्यूटचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले

## आर्यन कुंभारला सुवर्ण

### राज्य शालेय रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेबर-**

राज्य शालेय रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये मेरी माता हायस्कूल म्हसवड येथील आर्यन मनोजकुमार कुंभार याने दहा मीटर ओपन साईट रायफल शुटींगमध्ये १४ वर्षाखालील गटात सुवर्णपदक पटकाविले.



छत्रपती संभाजी नगर येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांच्या वतीने महात्मा गांधी युनिव्हर्सिटीमध्ये सुरू असलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेच्या इतिहासातील या वयोगटाचा सर्वाधिक ३५५/४00 गुण मिळवित ही कामगिरी केली. त्याचबरोबर जानेवारी महिन्यामध्ये भोपाळ येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेकरिता पात्रता मिळवली. त्याचे प्राचार्य फादर सनु, साताराचे जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, क्रीडा अधिकारी सुमित पाटील, रवी पाटील, फादर रॉबिन, उपप्रचार्य स्मिता आनंद, संतोष खासबागे, राहुल राम, संजय शर्मा आदींनी अभिनंदन केले.

## शरद नागरी सहकारी बँकेतर्फे शरद सप्ताह

### शनिवारी जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

शरद नागरी सहकारी बँकेच्या वतीने राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त आणि शरद नागरी बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त दि. १२ ते ३० डिसेंबर दरम्यान शरद सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती माजी महापौर संस्थापक मनोहर सपाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या सप्ताह अंतर्गत गुरुवार दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता शरद नागरी सहकारी पतसंस्था, लकी चौक येथे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. शनिवारी १४ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता चार हुतात्मा पुतळा चौक, सोलापूर येथे जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. विविध पाच गटांमध्ये ही स्पर्धा होणार आहे. एक किलोमीटर ते सात किलोमीटर अंतराची ही स्पर्धा राहणार आहे.

रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे बक्षिसाचे स्वरूप राहणार आहे. सोमवार दि. १६ डिसेंबर रोजी सकाळी ९.३0 वाजता राजश्री शाहू विद्यालय विडी घरकुल येथे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. २0 डिसेंबर २0२४ रोजी सकाळी ८.३0 वाजता गवळी वस्ती, दमानी नगर येथे आणि अवंती नगर येथे स्वच्छता मोहीम घेण्यात येणार आहे. सोमवार दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी १0 वाजता मराठा मंदिर सोलापूर येथे रक्त तपासणी शिबिर होणार आहे. शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ९.३0 वाजता सन २0२३ मधील चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ छत्रपती शिवाजी प्रशाला, सोलापूर येथे होणार आहे. सोमवार दि. ३0 डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३0 वाजता शरद नागरी सहकारी बँक येथे दिनदर्शिका प्रकाशन कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केले आहे.

गेल्या २८ वर्षापासून बँक कार्यरत आहे. चार शाखा सुरू आहेत. विविध सहा जिल्ह्यात बँक सेवा देत आहे. बँकेला ऑडिटरचा अ दर्जा कायम प्राप्त आहे. बँकेचे भाग भांडवल ३३१.९२ लाख, बँकेच्या ठेवी ७९00.२९ लाख, कर्जवाटप ५८५२.0६ लाख तर नफा ६९.२७ लाख आहे. या पत्रकार परिषदेस चेअरमन महेश माने, महानंदा सोलापूरे, ज्ञानेश्वर सपाटे, राजेंद्र अवताडे, श्रेणिक शहा, निलेश उंब्रजकर, सुनिता साळुंखे, संतोष गवळी, दत्ता भोसले, शंकर चव्हाण, महेश ढेंगळे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### अणदूर येथे काशिनाथ करपे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**अणदूर, दि. ७ डिसेंबर-**

जवाहर महाविद्यालयातील वरीष्ठ लिपिक तथा अधीक्षक काशिनाथ करपे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त खडकाळी मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सत्कार करण्यात आला. जवाहर महाविद्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून ३१ वर्षाची यशस्वी सेवा करून काशिनाथ करपे हे ३० नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त झाले. आपल्या सेवाकालावधीत अत्यंत प्रामाणिक, सचोटीने सेवा देऊन ते सेवानिवृत्त झाले. यावेळी प्रसन्ना कंदले, एम. बी. बिराजदार, शिवशंकर तिरगुळे, डॉ. नागनाथ कुंभार यांची भाषणे झाली. यावेळी डॉ. जितेंद्र कानडे, करबसप्पा धमुरे, मल्लिकार्जुन नरे, अविनाश मोकाशे, डॉ. हरिदास मुंडे, सचिन गुड्डू, गुणवंत मुळे, खंडू मुळे, पत्रकार संजीव आलुरे, सचिन तोग्गी, अजय अणदूरकर, दयानंद काळुंके आदी मान्यवर उपस्थित होते. आभार सत्कारमूर्ती काशिनाथ करपे यांनी मानले.



### लक्ष्मीनगर शाळेचा ओम घड्याळे धावण्याच्या स्पर्धेत प्रथम

**पिलीव, दि. ७ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर शाळेचा ओम शशिकांत घड्याळे याने बिटस्तरीय झालेल्या क्रीडा स्पर्धेत १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. त्याची तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल त्याला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. ओमच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत घड्याळे, उपाध्यक्ष स्वाती गारुळे, उपसरपंच स्वाती मदने, माजी उपसरपंच संजय पाटील, मुख्याध्यापक सुहास कोल्हे, सुनिल डुरे यांनी अभिनंदन केले.




### घोळसगावमध्ये महापरिनिर्वाण दिन

**अक्कलकोट, दि. ७ डिसेंबर-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिवसानिमित्त जिल्हा परिषद प्रा. मराठी शाळा घोळसगाव येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. शाळेत बालसभा आयोजित करण्यात आली. बालसभा सहावीच्या मराठी विषयातील घटक आहे. त्यामुळे हा घटक या दिवशी शिकवण्यासाठी सहावीतील विद्यार्थ्यांनी नियोजन केले होते. अध्यक्षस्थानी वेदिका रामेश्वर पाटील होती. सूत्रसंचालन अमरीन गुणके यांनी केले. सौरभ धरगुंडे, प्रीती बादोले, गणेश आलुरे, निधी कोलाटी यांनी मनोगत व्यक्त केले. गायत्री किवडे हिने मानले. यावेळी मुख्याध्यापक सो. द. मोरे व श्री. मु. वागदकर उपस्थित होते.



### विजयपुरातील वाहतूक सुरळीत करणार : जिल्हाधिकारी टी. भुबालन

**विजयपूर, दि. ७ डिसेंबर-**

विजयपूर शहराच्या सुशोभिकरणासाठी जिल्हा प्रशासन पुढे आले असून त्यासाठी जनतेचे सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी टी. भुबालन यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी टी. भुबलन यांनी रस्त्याच्या कडेला असलेल्या व्यापाऱ्यांनी नियोजित ठिकाणी शिस्तबद्ध व्यवसाय करून सर्वत्र कचरा न टाकताकचरा कुंड्यांमध्ये जमा करून कचरा उचलणाऱ्या वाहनाला द्यावा, असे आवाहन केले आहे. शहरातील जनता बाजार, एमआर हॉटेल जवळ, केएसआरटीसी डेपोजवळ, सैनिक स्कूल, जिमखाना क्लबच्या मागे आणि इंडी रोड स्टेडियजवळ खाद्यपदार्थ विक्री, भाजीपाला विक्रीसाठी नियोजित क्षेत्रांना भेट देऊन पाहणी केली. विजयपूर शहरातील पार्किंगच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक व महापालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करून तोडगा काढणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महानगरपालिका आयुक्त विजयकुमार मेक्कलकी म्हणाले की, महानगरपालिकेच्या व्यावसायिक भागात कचरा गोळा करण्याचे काम सुरू असून, जनता व व्यापारांनी कचरा रस्त्यावर फेकण्याऐवजी कचरा संकलन करणाऱ्या वाहनांना द्यावा.

# आरोपीचा शोध घ्या, अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन

## सागर पाटील यांच्या गाडीवरील हल्ल्याचा शिवसेनेकडून निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.७ डिसेंबर-**

युवा सेना सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख सागर पाटील यांच्या गाडीवरील हल्ल्यातील आरोपीचा येत्या दोन दिवसात पोलिसांनी छडा लावावा अन्यथा शिवसेनेच्या वतीने सांगोला तालुका बंद करून तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे यांनी पोलीस प्रशासनाला दिला.

सागर पाटील यांच्या फॉर्च्यूनर एम.एच.४५.ए.यु.१९२९ या गाडीवर शुक्रवारी दुपारी २ च्या सुमारास अनोळखी इसमांनी दगडफेक करून हल्ला केल्याची घटना घडली होती. दरम्यान शनिवारी सांगोल्यात माजी आ.शहाजीबापू पाटील यांच्या संपर्क कार्यालयासमोर सांगोला शहर व तालुक्यातील शिवसेनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन



**तात्काळ छडा लावणार : पोनि खणदाळे**

सागर पाटील यांच्या गाडीवर हल्ल्याची गंभीर दखल घेतली असून पोलिसांनी शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत आसपासचे सीसीटीव्ही फुटेज तपासणी केली असून आज शनिवारी देखील सीसीटीव्ही फुटेज तपासणी चालू आहे. लवकरात लवकर जे कोणी आहे त्याला आम्ही शोधून काढू असे आश्वासन सांगोला पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे यांनी यावेळी दिले.

सदर घटनेचा निषेध नोंदवला. यावेळी शिवसेनेचे आनंद माने, माऊली तेली, समीर पाटील, अच्युत फुले, गुंडा खटकाळे, सोमेश यावलकर, प्रा.संजय देशमुख, अभिजीत नलवडे, सुभाष इंगोले, संभाजी ब्रिगेडचे अरविंद केदार, हरिभाऊ पाटील, बाळासाहेब आसबे, अजिंक्य शिंदे, सुनील पवार, श्रीनिवास करे, राहुल गायकवाड, विजय बाबर, सुरेश कदम, अस्मीर तांबोळी, गणेश कदम, रावसाहेब आलदर, राहुल घोंगडे, गणेश मिसाळ, सौदागर केदार यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिवसैनिकांनी घोषणाबाजी केल्यामुळे वातावरण तणावपूर्ण झाले होते. तसेच या हल्ल्याच्या निषेधार्थ मांजरी, कडलास, बलवडी गावात शिवसेनेच्या वतीने बंद पाळण्यात आला. दरम्यान पोलिसांनी आ. बाबासाहेब देशमुख यांच्या निवासस्थानासमोर व म ाजी आ.शहाजीबापू पाटील यांच्या संपर्क कार्यालयासमोर पोलीसांचा बंदोबस्त ठेवला होता.

**पोलिस संरक्षण द्या**

हल्लेखोरांचा हेतू सुनियोजित कटाचा भाग असून पाटील कुटुंबियांच्या सर्व गाड्यांचे नंबर १९२९ आहेत. कदाचित त्यांना माजी आ. शहाजीबापू पाटील किंवा सागर पाटील यांना टार्गेट करून हल्ला करण्याचा डाव असल्याचा संशय शिवसेनेला आहे. हल्लेखोरांचा त्वरित शोध लावून त्याच्या पाठीम ागील कटकारस्थान करणाऱ्या मास्टरम ाईंचाही शोध घ्यावा. तसेच सागर पाटील यांना पोलीस संरक्षण देऊन या प्रकरणाची चौकशी त्वरित करावी अशी मागणी शिवसेनेकडून करण्यात आली.




## बार्शीत भक्तिमय वातावरणात अखंड हरिनाम सप्ताह

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा ७२७ वा संजीवन समाधी सोहळा;**
**श्री भगवंत निष्काम अष्टोप्रहार वारकरी मंडळ, श्री भगवंत देवस्थान पंच कमिटीचा होता पुढाकार**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ डिसेंबर-**

संतश्रेष्ठ श्री. माऊली ज्ञानेश्वर महाराज यांचा ७२७ वा संजीवन समाधीनिमित्त श्री भगवंत निष्काम अष्टोप्रहार वारकरी मंडळ व श्री भगवंत देवस्थान पंचकमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने अतिशय भक्तिमय वातावरणात अखंड हरिनाम सप्ताह झाला.

कापसेवाडी येथील मठाचे पीठाधीश प्रेमपुरी स्वामींच्या अधिपत्याखाली या सप्ताहाची सुरुवात झाली. देवस्थानचे कमिटीचे पंच प्रमोद कुलकर्णी यांचे हस्ते टाळ, विणा पूजनाने झाली. शिवाजीराव घोरपडे गुरुजी यांच्या अधिपत्याखाली ज्ञानेश्वरी पारायण, देविदास महाराज ननवरे यांचे नेतृत्वात गाथा भजन, दररोज दुपारी बार्शीतील विविध संगीत भजनी मंडळीचा भजनाचा कार्यक्रम, दुपारी प्रवचन, हरिपाठ व हरिकिर्तन असे नित्याचे कार्यक्रम झाले. या कार्यक्रम ात राजाभाऊ गव्हाणे खांडवी, जनार्दन डमरे, सरदार गव्हाणे, गणेश सांगळे, धनराज भारती, ऋषीकेश आवटे, मिलिंद घोलप, परशुराम डोंबे यांनी प्रवचनाची सेवा केली तर डॉ. लिमकर म हाराज, देविदास ननवरे, विनोद कुलकर्णी, प्रा. अशोक पाटील, फौजदार लालासाहेब गव्हाणे, प्रकाश मुसळे सर, मठाधीश प्रेम पुरी महाराज यांची किर्तन सेवा झाली.

संजीवन समाधी प्रसंगी गुलालाचे किर्तन संत माणकोजी बोधले महाराजांचे वंशज माधव महाराज बोधले गौर तर काल्याचे किर्तन शिवाजीराव घोरपडे गुरुजी यांचे झाले. या कार्यक्रमात बार्शीतील शिवाजी पाटील, नितीन लटके व रोशन पवार (कापसेवाडी) यांनी महाप्रसादाची सेवा केली. त्याचबरोबर रसिका जाधव यांनी सप्ताहातील सेवाधारी मान्यवर व ज्ञानेश्वर पारायणाचे वाचक यांचा यथोचित सन्मान केला. कार्यक्रम ासाठी सेवावृत्तीने देवस्थान पंच कमिटी शिवाजीराव क्षीरसागर, संजय बेणे, आदर्श शिक्षक जाधव गुरुजी तसेच कापसेवाडी येथील सर्व वारकरी संस्थेचे सर्व भजनी विद्यार्थी यांच्या सेवेतून हा उपक्रम झाला.

**कीर्तन, प्रवचनकारांनी केला खर्च**

सप्ताहासाठी सप्ताहातील किर्तनकार व प्रवचनकार यांच्या स्वखर्चातून तसेच काही भगवंत भक्तांनी स्वेच्छेने दिलेल्या देणगीतून हा सप्ताह भव्यदिव्य स्वरुपात झाला, हे या सप्ताहाचे वैशिष्ट्य आहे.

## कुंभारीत एक एकर ऊस जळून खाक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथे शेतकऱ्याचा उसाला आग लागल्याची घटना शुक्रवारी घडली. या घटनेत साडेतीन एकर ऊस जळून खाक झाला. यामध्ये शेतकऱ्याचे जवळपास चार लाख रुपयाचे नुकसान झाल्याचा अंदाज शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, कुंभारी शिवारातील गट क्रमांक ५२४ मध्ये गेनसिद्ध भोरगुंडे यांचा ११ महिन्यांचा साडेतीन एकर ऊस होता. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास शेतकरी गेनसिद्ध भोरगुंडे शेतात गेले असता उसाला आग लागल्याची त्यांना दिसली. कुणीतरी अज्ञात व्यक्तीने या उसाला आग लावली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. आग लागल्याचे दिसताच त्यांनी आरडाओरड केली. आग विझवण्यासाठी परिसरातील नागरिक धावून आले. फोन करून अग्निशमन दलाला बोलावून घेतले. आग विझवण्याचा प्रयत्नदेखील केला. परंतु आगीचा भडका व वारा मोठ्या प्रमाणात असल्याने आग भिजवण्यासाठी नागरिकांचे प्रयत्न निष्कळ ठरले आणि साडेतीन एकर ऊस जळून खाक झाले. सदरील आग कुणीतरी अज्ञात व्यक्तीने लावली असल्याचा संशय शेतकरी गेनसिद्ध भोरगुंडे यांनी व्यक्त केला आहे. हा ऊस अकरा महिन्यांचा होता. एका महिन्यात साखर कारखान्याला ऊस जाणार होता. मात्र त्या आधीच हा प्रकार घडला. आता या उसाचे करायचे काय असा प्रश्न शेतकऱ्याला पडला आहे.

## बार्शीत अग्रीवीर अमोल शिरामे यांचे पुष्पवर्षावाने स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ डिसेंबर-**

शहरातील माळे गल्ली येथील अमोल संतोष शिरामे या बार्शीतील अग्निवीराने देशसेवेचे ८ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करुन बार्शीत आगमन केले. त्यांचे पुष्पवर्षाव व फटाक्यांची आतषबाजी करत उत्साहात स्वागत करण्यात आले. या स्वागताने कुटुंबियांसह जवान अमोल शिरामेदेखील भारावून गेले.

फेब्रुवारी महिन्यात अमोल यांनी अग्निवीर परीक्षा यशस्वीरित्या पूर्ण करत आई वडिलांच्या कष्टाचे चीज केले होते. त्यानंतर बेंगलोर येथे आर्मी सर्व्हिस कोअर या ठिकाणी ८ महिने प्रशिक्षणदेखील त्यांनी पूर्ण केले. सध्या २० दिवसांच्या सुटीसाठी घरी आले आहेत. काही दिवसांनी ते देशसेवेसाठी पश्चिम बंगाल येथील दार्जिलिंग जवळील सिलीगुडी येथे एएससी बटालियनमध्ये जवान म्हणून सेवा बजावणार आहेत. माळे गल्ली येथे त्यांचे वाजतगाजत, फटाक्याच्या आतिषबाजीत स्वागत करण्यात आले. यावेळी वकील, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक, डॉक्टर आदींनी शिरामे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी वडील संतोष शिरामे, आई



वर्षा शिरामे, भाऊ अभिषेक शिरामे, शशिकांत शिरामे, नारायण शिरामे, तलाठी ऐश्वर्या शिरामे यांच्यासह प्रा. गंभीर, प्रा. तात्यासाहेब घावटे, माजी नगरसेवक ॲड. महेश जगताप, सावळे गल्ली, माळे गल्ली, भीमनगर, अण्णाभाऊ साठेनगरमधील रहिवाशी उपस्थित होते.

## स्वसंरक्षणासाठी मुलींनी तायक्कांदोचे धडे घ्यावे : सपोनि मनोज पवार

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ७ डिसेंबर-**

मुलींनी स्वतःच्या संरक्षणासाठी कराटेचे प्रशिक्षण घ्यावे. महाविद्यालय असो किंवा समाजात वावरताना स्वतःच्या संरक्षणासाठी तत्पर राहावे, असे आवाहन मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी केले.

ते मंद्रुप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण समिती आयोजित महिला स्वसंरक्षण प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे सचिव महादेव कमळे होते. यावेळी संस्था उपाध्यक्ष डॉ. चनगोंडा हविनाळे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.



जवाहर मोरे, गोपनीय विभागाचे सागर चव्हाण, तायक्कांदो अकॅडमीचे प्रशिक्षक शिवराज मुगळे उपस्थित होते. मनोज पवार म्हणाले की, मुलींना हात, पाय, केसातील पिना, पेपर स्प्रे व ओढणी यांच्या सहाय्यानेही संरक्षण करता येते. विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर होण्यासाठी तायक्कांदो, कराटे अशा उपक्रमामध्ये भाग घ्यावा. स्वतःचे रक्षण स्वतः करावे व मुलीने सदैव तत्पर राहून स्वतःचे स्वंरक्षण कसे करता येईल यासाठी मार्शल आर्टचे धडे शिकावे. यावेळी डॉ. हविनाळे यांनी मनोगत व्यक्त केले. महादेव कमळे म्हणाले की, अन्याय व अत्याचार रोखण्यासाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण सर्व मुलींनी घ्यावे. प्रास्ताविक अंतर्गत तक्रार निवारण समिती अध्यक्ष प्रा. बी. एस. कोरे यांनी केले. सूत्रसंचालन सदफ शेख हिने केले तर आभार समिती समन्वयक डॉ. ज्योती नादरगी यांनी मानले.

# पवार साहेब येताय तर हे पण बघून जा!

## माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवारांच्या मारकडवाडी दौऱ्यानिमित्ताने माजी आ. राम सातपुते यांचे ट्विट

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ डिसेंबर-**

राज्यामध्ये निवडणूक नुकतीच पार पडली. त्यामध्ये महायुतीला अभूतपूर्व यश मिळाले असताना विरोधकांकडून आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडण्यात येत आहे. यामध्ये माळशिरस तालुक्यातील विजयी उमेदवारांच्या सांगण्यावरून तालुक्यातील मारकडवाडी या गावातील गावकऱ्यांनी बॅलेट पेपरवर चाचणी मतदान घेण्याचा निर्णय घेतला असताना देशाचे नेते शरद पवार त्या लोकांशी संवाद साधण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली असल्याने माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांनी यासंदर्भात पवार साहेब मारकडवाडीला येताय तर बुडवलेल्या पतसंस्था, विकलेला कारखाना, मोहिते-पाटलांनी लुटलेल्या जमिनी बघून जा असे एक ट्विट केले आहे.

यामध्ये म्हटले आहे की, मी पवार साहेबांना





विनंती करेन की, साहेब तुम्ही माळशिरसमधील मारकडवाडी या छोट्याशा गावामध्ये येणार आहात तर आल्यानंतर तालुक्यातील बुडवलेली पतसंस्था, त्यामध्ये देशोधडीला लागलेले छोटे-मोठे व्यवसायिक, महिलांनी मंगळसूत्र गहाण ठेवून उभा केलेला कारखाना ज्यांनी विकला. त्या कारखान्याचे ज्या शेतकऱ्यांच्या सातबारावरती बोजा आहेत. काही कारखानदारांनी उसाची बिल बुडवली, त्या लोकांनाही जरा भेटून जावा. तालुक्यात येणारच आहात तर गेल्या तीन वर्षांम ध्ये आम्ही केलेला विकास थोडासा तोही पाहून घ्या. ज्या मारकडवाडी गावामध्ये तुम्ही येणार आहात. त्याच गावांमध्ये पाच गावांच्या शिवेवर असणाऱ्या मारूती मंदिरात थोडसं दर्शन घेऊन गरिबांच्या मुलांसाठी उभा केलेले पर्यटन केंद्रही जरा पाहून जावा. साहेब मारकडवाडीमध्ये जात आहात त्या गावाला एकेकाळी झाडाझुडपांनी वेढलेलं गाव म्हणून अशी ओळख होती. त्या गावचे रस्ते जरा साहेब पाहून जावा. मग एवढं केल्यानंतर त्या गावांमध्ये जर माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांना थोडंसं मतदान जास्त झालं तर तुमचा एवढा कांगावा कशासाठी? हा येणाऱ्या काळातील मारकडवाडीतील युवा आपल्याला विचारल्याशिवाय राहणार नाही. पण साहेब येताय तर मारकडवाडीमध्ये भाजपा सरकारने किती निधी दिला, याची पण माहिती घेऊन जावा, अशा स्वरूपाचे ट्विट सोशल मीडियावर माजी आमदार राम सातपुते यांनी केले आहे.



### कुसमोड येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**पिलीव, दि. ७ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी आरपीआयचे तालुका उपाध्यक्ष अमोल वाघमारे, कुसमोडचे अध्यक्ष राहुल सातपुते, विलास मोरे, ज्ञानेश्वर सातपुते, पप्पू मोरे, राकेश सातपुते, सागर सातपुते, रामभाऊ पालखे, पोपट मोरे, शुभम वाघमारे, सतिश गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वैराग येथे डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**वैराग, दि. ७ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथील सिद्धार्थ नगर बुद्ध विहारात सामुदायिक त्रिशरण व पंचशील प्रार्थना घेऊन महामानवास अभिवादन करण्यात आले. यावेळी धम्म प्रसारक किशोर सोनवणे लखन वाघमारे, राहुल भालशंकर, अशोक वाघमारे, युवराज क्षीरसागर, बापू वाघमारे, अंकुश भालशंकर आदी बौद्ध उपासक व समाज बांधव उपस्थित होते.



# हरवलेला स्वराज चार तासात कुटुंबियांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

हरवलेल्या तीन वर्षाच्या मुलाला फौजदार चावडी पोलिसांनी अवघ्या चार तासात आईच्या स्वाधीन केले. स्वराज प्रशांत गवळी (वय ३, रा. यश नगर, सोलापूर) असे बालकाचे नाव आहे. फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीत ॲम्बेसिडर हॉटेलच्यासमोर ३ वर्षाचा मुलगा बेवारस स्थितीत रडत असलेला पोलीस शिपाई वामने (बीट मार्शल) यांना मिळून आला. त्यांनी सदर बालकास सोबत घेऊन आजूबाजूच्या भागात विचारपूस केली, परंतु सदर बालकाचे पालक मिळून न आल्याने सदर बालकास पोलीस स्टेशनला आणून ऑपरेशन मुस्कान पथकाच्या ताब्यात दिले.

ऑपरेशन मुस्कान पथकाने या बालकास ताब्यात घेऊन त्याचा फोटो काढून पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलिंग करून सदर बालकाचा फोटो स्थानिक लोकांच्या व्हाट्सअप ग्रुपवर प्रसारित केला. त्यामध्ये त्याच्या पालकांबाबत माहिती मिळाल्याने त्यांच्याशी संपर्क करून त्यांना पोलीस ठाणेस बोलावून घेतले. सदर पालकांचे आधार कार्ड बघून सर्व खात्री करून सदर बालक कायदेशीर पालकांच्या ताब्यात दिले. त्या बालकाला ऑपरेशन मुस्कान पथकाने केलेल्या प्रयत्नामुळे अवघ्या ४ तासात पालकांच्या ताब्यात देण्यात आले. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन मुस्कान पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सविता मोरे-पाटील, पोलिस शिपाई महेश पाटील व अभिजित वामने यांनी केली आहे.

### काय झाले होते नेमके?

नातेवाईकाच्या अंत्यविधीकरिता गवळी कुटुंबातील सदस्य जुना पुना नाका परिसरात आले होते. या मयतीमध्ये तीन वर्षाचा स्वराज सुद्धा आला होता. गर्दीमध्ये तो हरवून गेला. मुलगा हरवल्यानंतर कुटुंबीयांनी शोधाशोध चालू केली होती. इकडे पोलिसांनीही शोध कार्य वेगाने राबवून मुलाला कुटुंबियांच्या ताब्यात दिले.

## संक्षिप्त वृत्त

### नवऱ्यासोबत तक्रार झाल्याने पत्नीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

नवऱ्यासोबत तक्रार झाल्याने पत्नीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. पल्लवी अमर कसबे (वय ३०, रा. डोणगाव, ता. उत्तर सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव आहे. ६ डिसेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास राहत्या घरी पल्लवी व अमर यांच्यात तक्रार झाली. त्याचा राग मनात धरून पल्लवी यांनी विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे पल्लवी यांना त्रास होऊ लागल्यानंतर त्यांना वडील सुखदेव कसबे यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घरगुती कारणावरून पतीकडून पत्नीस मारहाण; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

घरगुती कारणावरून पतीकडून पत्नीस मारहाण करून जखमी करण्यात आले. सारिका अजय जाधव (वय २५, रा. विजापूर नाका झोपडपट्टी नं. १, सोलापूर) असे जखमी पत्नीचे नाव आहे. ६ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास सारिका यांस घरी घरगुती कारणावरून पती अजय जाधव याने लाथाबुक्क्याने जबर मारहाण केली. यामध्ये सारिका यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना आई श्रीदेवी ऐवळे यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.





प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी आय.पी.एल.च्या थीमवर बहारदार नृत्य केले. क्रीडा सप्ताहाच्या समारोपप्रसंगी दीप प्रज्वलन करताना मान्यवर.

# अरिहंतच्या ब्लू हाऊसला बेस्ट हाऊसचा मान

## अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलच्या क्रीडा सप्ताहाचा थाटात समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

विडी घरकुल येथील अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलचा क्रीडा सप्ताह मोठ्या थाटात पार पडला. यंदाचा २०२४-२५ च्या स्पर्धांमध्ये सर्व हाऊसमध्ये ब्लू हाऊसने सर्वात जास्त पदके मिळवून बेस्ट हाऊसचा मान पटकावला. विद्यार्थ्यांच्या शिस्तबध्द संचलनाने उपस्थितांची मने जिंकली. स्कूलच्या क्रीडा सप्ताह समारोप प्रसंगी क्रीडा स्पर्धेतील यशस्वी प्रथम, द्वितीय व तृतीय संघास व खेळाडूस सोलापूर जिल्हा कॅरम असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. शिवानंद तोरवी, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने तसेच वृत्तसंपादक अजितकुमार संगवे यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात आले.

अंजली रगबले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय पोन्नम यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल, बुके देवून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी अतिथींच्या हस्ते सरस्वतीमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मंचावर संचालिका सुलक्षणा पोन्नम, चन्नेश इंडी, पर्यवेक्षिका तस्मिन शेख, रजनी सग्गम, रूपाली निकते, ज्योती आडम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध संचलनाने झाली. प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी आय.पी.एल.च्या थीमवर बहारदार नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फौजान अझहरी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी तोषिता पोन्नम यांनी आभार मानले.

### जिंकण्यापेक्षा खेळात सहभाग महत्त्वाचा

प्रमुख अतिथी मार्गदर्शनपर करताना म्हणाले, खेळामध्ये हरणे व जिंकणे महत्त्वाचे नसून खेळात हिरीरीने सहभागी होत कौशल्य पणाला लावून खेळणे महत्त्वाचे असते. खेळामुळे शारीरिक आणि मानसिक विकास होतो. त्यामुळे प्रत्येकाने खेळ खेळणे गरजेचे आहे. तसेच सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी खेळामध्ये कौशल्य दाखवून शाळेचे नाव मोठे करावे.

# फसवणूकप्रकरणी बांधकाम ठेकेदार पती-पत्नीविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. ७ डिसेंबर -**

घरबांधकामाकरीता दिलेले ३ लाख ५० हजार रुपये परत ने देता तसेच बांधकाम न करता फसवणुक केल्याप्रकरणी बांधकाम ठेकेदार पती-पत्नीविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संतराम उर्फ शांतीकुमार गुलाब नागटिळक (वय ५४, रा. न्यु बुधवार पेठ, भिमालय निवास, डॉ. आंबेडकर नगर, सम्राट चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजकुमार भिमाशंकर उडचण व वर्षा राजकुमार उडचण (रा. घर नं. ९, निराळे वस्ती, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतराम नागटिळक यांच्या घरजागेचे बांधकाम करण्यासाठी २६ डिसेंबर २०१९ रोजी उडचण यांनी करारपत्र करून १ लाख रुपये घेऊन बांधकाम सुरु केले. नागटिकळ यांच्या घराचे बांधकाम हे ४ लाख ५० हजार रुपयांमध्ये करून देण्याचे ठरवून उडचण यांनी तसे करारपत्र करून दिले होते. त्यानंतर नागटिळक यांनी उडचण यांना वेळोवेळी असे ५ लाख ५४ हजार रुपये दिले. जादा पैसे घेऊनसुध्दा उडचण यांनी नागटिळक यांच्या घराचे अर्धवट बांधकाम करून उर्वरीत काम न करता ते सोडून निघून गेले. त्यामुळे नागटिळक यांनी उडचण यांच्या मागे बांधकाम पूर्ण करण्याचा तगादा लावला असता उडचण पती-पत्नीने बांधकाम होणार नाही असे सांगून थोड्या दिवसांनी हिशोब करून पैसे परत करू, तुम्ही आमच्या घरी यायचे नाही असे म्हणून शिवीगाळ केली. उडचण यांनी नागटिळक यायांचे घेतलेले ३ लाख ५० हजार रुपये परत न करता त्यांची फसवणुक केल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.

# अखेर विद्यापीठात कराटे स्पर्धेचा समावेश

## आजपासून शिवदारे महाविद्यालयात महाविद्यालयीन स्पर्धा

### व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

मार्शल आर्टमधील कराटेची स्पर्धा अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तसेच वेस्ट झोन आंतर विद्यापीठ स्पर्धेत व अनेक विद्यापीठांमध्ये घेतली जात होती. मात्र, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येत नव्हती. कराटे संघटना, खेळाडू, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांच्या पाठपुरावानंतर अखेर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानगर यांनी याचा समावेश केला असून शिवदारे महाविद्यालयात ही स्पर्धा उद्या रविवार आठ डिसेंबरपासून सुरू होणार आहे.



मागील दहा वर्षापासून कराटे संघटना व खेळाडूंनी या स्पर्धा महाविद्यालय स्तरावर सोलापूर विद्यापीठामध्ये घेतल्या जाव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न करत होते. मात्र, अनेक अडथळ्यामुळे या स्पर्धा घेतल्या जात नव्हत्या. त्यामुळे या क्रीडा प्रकारामध्ये सोलापूर जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पात्र असूनही वंचित राहत होते. एक जिल्ह्यासाठी असलेल्या या विद्यापीठांमध्ये त्यांना या क्रीडा प्रकाराच्या स्पर्धेमध्ये भाग घेता येत नव्हता. त्यामुळे अनेक विद्यार्थी हे शिवाजी, पुणे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या ठिकाणी प्रवेश घेत होते.

कराटेचा समावेश सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धेमध्ये व्हावा यासाठी सिनेट सदस्य प्रा. गायकवाड हे पाठपुरावा करत होते

वेगवेगळ्या कराटे संघटना तसेच त्यांचे मार्गदर्शक हे सातत्याने मागणी करत होते. राज्य व राष्ट्रीय स्तरावर कराटे वेगवेगळ्या संघटनेतील भूमिकेमुळे स्पर्धा घेणे बाबत संधीग्धता निर्माण झाली होती. मात्र, मान्यताप्राप्त संघटनेच्या सहकार्याने तसेच इतरही या क्रीडा प्रकारातील मार्गदर्शकांना सकारात्मक करून विद्यार्थ्यांच्या हितासाठी या स्पर्धा पार पाडण्याची भूमिका विद्यापीठ क्रीडा मंडळ तसेच झोनल स्पोर्ट्स कौन्सिल यांच्या मान्यतेने या स्पर्धा घेणेसाठी प्रा. गायकवाड यांनी व्यवस्थापन परिषदेमध्ये कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्रो कुलगुरू लक्ष्मीकांत दामा तसेच सर्वांना विनंती करून विद्यार्थी हितासाठी या स्पर्धा घेण्यासाठी मान्यता द्यावी असा ठराव मांडला व त्यास सर्वांनी मान्यता दिली.

त्यासाठी विविध महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक, सर्व क्रीडा मार्गदर्शक, प्राचार्य, संस्थाचालक, सिनेट व व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य या सर्वांचे सहकार्य लाभले. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील कराटेतील सर्व खेळाडूंना सोलापूर विद्यापीठामुळे महाविद्यालयीन व वेस्ट झोन त्याचबरोबर अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. त्याचबरोबर वर्ल्ड युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठीही संधी मिळणार आहे.

# बाळे येथील गुरुकृपा नगरात २ लाखांची घरफोडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

बाळे परिसरातील गुरुकृपा नगरात चोरट्यांनी बंद घर फोडून २ लाख ६ हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचा ऐवज चोरून नेला.

याबाबत शिवदास हिरगप्पा हरवाळकर (वय ५६, रा. प्लॉट नं. २४, गुरुकृपा नगर, बाळे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ डिसेंबर रोजी हरवाळकर हे घराला कुलूप लावून पुणे येथे साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी गेले होते. ते ६ डिसेंबर रोजी रात्री परत घरी आले. त्यावेळी त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने हरवाळकर यांच्या घराचा कोयंडा कशाने तरी तोडून बेडरुममधील लोखंडी कपाटातील ड्रॉव्हरच्या चोर कप्प्यात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. यामध्ये सोन्याचे मणी मंगळसूत्र, पिळ्याची अंगठी, बोरमाळ, कानातील टॉप्स, सोन्याचे बदाम, चांदीचे पैंजण, चांदीचा छल्ला, चांदीचा पंचमेदक, रोख ५० हजार रुपये असा २ लाख ६ हजार २०० रुपयांच्या ऐवजाचा समावेश आहे. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे पुढील तपास करीत आहेत.

# बेळगावला माजी सैनिकांच्या अडचणी निराकरणासाठी १५ डिसेंबरला मेळावा

**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

जिल्ह्यातील माजी सैनिक, वीरनारी, विरपिता व सर्व व वयोवृद्ध सैनिकांसाठी पेन्शन व स्पर्शसंबंधी असलेल्या सर्व अडचणींचे निराकरण करण्यासाठी १५ डिसेंबर रोजी बेळगाव येथे मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तर माजी सैनिक, वीरनारी, विरपिता व सर्व वयोवृद्ध सैनिकांसाठी १५ डिसेंबर २०२४ रोजी मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंट सेंटर, बेळगाव येथील शिवाजी स्टेडियम येथे सकाळी ८.३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत मेळाव्यात उपस्थित राहावे.

# विशेष स्वच्छता मोहिमेंतर्गत दोन रस्त्यांवरचे अतिक्रमण हटविले

- महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई
- लोखंडी खोके, हात गाड्या, ऑटो रिक्षांसह इतर साहित्य केले जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

विशेष स्वच्छता मोहिमे अंतर्गत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील दोन रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात आले. किडवाई चौक ते सिव्हिल चौक तसेच गुरुनानक चौक ते महावीर चौक रस्त्यावरील व फुटपाथवरील अतिक्रमण काढण्यात आले.



महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेच्या वतीने दि. २ ते १३ डिसेंबर दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रस्ते, फुटपाथ तसेच दुभाजकाची नेटक्या पद्धतीने स्वच्छता करण्यात येत आहे. रस्त्यावरील तसेच फुटपाथवरील अतिक्रमणही काढण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत किडवाई चौक ते सिव्हिल चौक तसेच गुरुनानक चौक ते महावीर चौक रस्त्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत दोन लोखंडी खोके, दोन हात गाड्या, टेबल, ऑटो रिक्षा आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते. शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.










**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# कुलकर्णी, कारंजकर यांना ज्योतिष जीवनरत्न पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

भास्कराचार्य ज्योतिष मंडळ या संस्थेतील वयोवृद्ध शिक्षक श्री.जगदीश जगन्नाथ कारंजकर आणि माधव रावसाहेब कुलकर्णी या दोघांनी दि. १ डिसेंबर रोजी नाशिक येथे महाराष्ट्र ज्योतिष परिषदेचे अध्यक्ष अनिल चांदवडकर तसेच प्रा. डॉ. विनायक गोविलकर,



माधव कुलकर्णी

प्रख्यात अर्थतज्ज्ञ आणि प्रा. गोविंद पाण्डेय, निदेशक केंद्रीय



जगदीश कारंजकर

संस्कृत महाविद्यालय नासिक यांच्या उपस्थितीत ज्योतिष जीवनरत्न पुरस्कार सन्मानपत्र आणि स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले.

या दोन्ही शिक्षकांना भास्कराचार्य ज्योतिष मंडळाचे अध्यक्ष तुषार पांडुरंग कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले. अंजली लंके, किर्तीलक्ष्मी अत्रे, मधुरा कुलकर्णी, आरकाल, नल्ला यांनी अभिनंदन केले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

शहरातील गांधी नगर ते सात रस्ता या रस्त्यावर चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी झाला. याबाबत सखुबाई रमेश पवार (वय ४७, रा. कुमठे, ता. दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चारचाकी वाहनचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ डिसेंबर रोजी सकाळी पावणे आठच्या सुमारास सखुबाई पवार यांचा भाऊ रविकांत शंकर राठोड हा गांधी नगर ते सात रस्ता या रस्त्यावरून जात असताना हेरिटेज लॉनसमोर राठोड याच्या एमएच १३ डीएस २३४७ या दुचाकीला अज्ञात चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली. यामध्ये दुचाकीवरील राठोड हे गंभीर जखमी झाल्याने चारचाकी वाहनधारकाने त्यांना हॉस्पीटलला न नेता पळ काढला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### बाळे येथील तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर. दि. ७ डिसेंबर -**

घरगुती कारणावरून बाळे येथील तरूणाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. संतोष बसवराज कोलार (वय ३०, रा. वाणे गल्ली, बाळे, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. ७ डिसेंबर रोजी सकाळी सव्वा आकराच्या सुमारास संतोष कोलार याने घरी घरगुती कारणावरून विषारी औषध प्राशन केले. त्यानंतर संतोष यास त्रास होऊ लागल्याने त्याची मामी सावित्री हुल्लर यांनी त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बाजरी मागण्याच्या कारणावरून दोघांना मारहाण

**सोलापूर. दि. ७ डिसेंबर -**

बाजरी मागण्याच्या कारणावरून दोघांना मारहाण करण्यात आल्याची घटना मंगळवेढा येथे घडली. राजू महादेव इंगोले (वय ३२), पुजा महादेव इंगोले (वय १८, रा. मानेवाडी, ता. मंगळवेढा) अशी जखमींची नावे आहेत. ६ डिसेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास मानेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या पाठीमागे बाजरी मागण्याच्या कारणावरून गोरख शिंदे व इतर पाच जणांनी मिळून राजू व पुजा यांना काठीने व दगडाने मारहाण करून जखमी केले. या दोघांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### जांबमुनी मोची समाजसेवा मंडळाची उद्या बैठक

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

जांबमुनी मोची समाज सेवा मंडळ शहर व जिल्हा सोलापूर संघटनेच्या वतीने दि. ८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री. आदी जांबमुनी रथोत्सव मध्यवर्ती मंडळाची बैठक जांबमुनी सांस्कृतिक भवन, मोदी, हुडको येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व संघटनेचे पदाधिकारी, सल्लागार, रथोत्सव मंडळाचे सर्व पदाधिकारी, युवक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष देवेंद्र भंडारे, युवक अध्यक्ष रतिकांत कमलापूरे, रथोत्सव अध्यक्ष रवि आसादे यांनी केले.

### अवंती नगर येथे भाजी विक्रेत्यामध्ये हाणामारी

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

अवंती नगर येथे रस्त्यावर भाजी विक्रित्यांमध्ये हाणामारी झाल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत संदीप बाळासाहेब कोळी (वय ३७, रा. मनोहर नगर झोपडपट्टी, निराळे वस्ती, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन नंदु चौंडे, त्याची पत्नी, आई (रा. अवंती नगर विठ्ठल मंदीरामागे, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप कोळी व त्याची आई शारदाबाई हे दोघे मिळून ५ डिसेंबर रोजी रात्री रोडच्या कडेला बसून भाजीपाल विक्रि करीत होते. त्यावेळी नंदु चौंडे, त्याची पत्नी व आई यांनी संदीप व त्याच्या आईला पाहून बघ रस्त्यावर बसलेली कुत्री भुंकत्यात कशी असे बोलून शिवीगाळ केली. तसेच नंदू याने शिवीगाळ करीत संदीपचा डावा हात पिरगाळून खाली पाडून त्यास जबर मारहाण केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.


# पंढरपुरात १० लाखांच्या बनावट नोटा जप्त

## जनावरांच्या गोठ्याच्या अनुदानाची रक्कम बँकेत भरणा करताना झाला भांडाफोड

### पंढरपूर शहर पोलिसांची मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ डिसेंबर-**

पंढरपूर शहर पोलिसांनी तब्बल १० लाख १४ हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. या प्रकरणी राजू चोरमले आणि अतुल तावरे या दोन संशयित आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. पंढरपूर शहर पोलिसांनी बनावट नोटांचा पर्दाफाश केल्याने त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले जात आहे.



या संदर्भात पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी मधुकर माने यांना राजू चोरमले आणि अतुल तावरे यांनी गाई गोठ्याचे अनुदान मंजूर झाले म्हणून दहा लाख १४ हजार ५०० रुपये दिले होते. यामध्ये पाचशे रुपयांच्या दोन हजार २९ नोटांचा समावेश होता. त्यानंतर फिर्यादी मधुकर माने यांनी अनुदानाची रक्कम म्हणून राजू चोरमले आणि अतुल तावरे यांनी दिलेली ही रक्कम बँकेत भरणा करण्यासाठी नेली असता, सर्व पाचशेच्या नोटा बनावट असल्याचे समोर आले.त्यानंतर मधुकर माने यांनी थेट पोलिस ठाणे गाठून झालेला सर्व प्रकार पोलिसां समोर कथन केला. त्यामध्ये जनावरांच्या गोठ्याचे अनुदान मंजूर झाले आहे, असे सांगत राजू चोरमले व अतुल तावरे यांनी आपणाला दहा लाख १४ हजार ५०० रुपये एवढी रक्कम दिल्याचे सांगितले. मात्र बँकेत भरणा करताना या सर्व नोटा बनावट असल्याचे समोर आले. त्यामुळे आरोपीने बनावट नोटा देऊन आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याची माहिती मधुकर माने यांनी पोलिसांना दिली.दरम्यान मधुकर माने यांनी शहर पोलिस ठाण्यात याबाबतची तक्रार दिली. माने यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार राजू चोरमले व अतुल तावरे या दोन संशयित आरोपींना पोलिसांनी तात्काळ अटक केली.

### मोठे घबाड सापडण्याची शक्यता

पोलिस या प्रकरणाचा कसून तपास करीत आहेत. यामध्ये आणखी कुणाची फसवणूक झाली आहे का? या दोन संशयितांशिवाय आणि दुसऱ्या कुणाचा यामध्ये हात आहे का? हे पोलिस तपासानंतरच समोर येईल. पण इतक्या मोठ्या प्रमाणात बनावट नोटा मिळाल्याने पंढरपूरमध्ये सध्या एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान पोलिस तपासात आरोपींकडून बनावट नोटांचे आणखी मोठं घबाड सापडण्याची शक्यतादेखील वर्तविली जात आहे.

# सहप्रवासी बनलेल्या महिलांनी ९० हजारांचे दागिने लांबविले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. ७ डिसेंबर -**

सहप्रवासी बनून रिक्षातून प्रवास करणाऱ्या दोन महिलांनी एका महिलेचे ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

याबाबत सावित्री मल्लिकार्जुन दिंडवार (वय ५०, रा. शास्त्री नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ डिसेंबर रोजी दुपारी अडीचच्या सुमारास सावित्री दिंडवार मंगळवार बाजार ते बाळीवेस या मार्गावर रिक्षातून प्रवास करीत होत्या. त्यावेळी सावित्री दिंडवार यांच्या सोबत रिक्षातून दोन लहान बाळांना घेऊन प्रवास करणाऱ्या दोन महिलांनी त्यांच्याकडील बाळांना सावित्री यांच्या अंगाला झोंबाझोंबी करायला लावून त्यांचे लक्ष विचलित केले. त्यानंतर त्या दोन महिलांनी सावित्री दिंडवार यांच्या पर्समधून दागिने चोरून नेले. या पर्समधून त्या महिलांनी १० ग्रॅमची सोन्याची पिळ्याची अंगठी व ५ ग्रॅमची बोरमाळ असा ऐवज चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस नाईक चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

# जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कंत्राटी भरती

### १५६ जणांची नियुक्ती

### ४४ उमेदवार गैरहजर, ६ जणांनी नियुक्ती नाकारली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य सेवेत २३० नवीन कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येणार आहे. यासाठी गुरुवार, ५ डिसेंबर रोजी समुपदेशन घेण्यात आले. समुपदेशनासाठी बोलावण्यात आलेल्या २०६ पैकी १५६ जणांना नियुक्ती देण्यात आले. ४४ उमेदवार गैरहजर राहिले. ६ जणांनी नियुक्ती नाकारली असल्याची माहिती जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. संतोष नवले यांनी दिली.

दरम्यान, जिल्हा परिषद आरोग्य विभागात नवीन कर्मचारी भरती करण्यात येणार असल्याने बहुतांश रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. या नवीन कंत्राटी कर्मचाऱ्यांत वैद्यकीय अधिकारी, विशेष तज्ज्ञ,दंत चिकित्सक, वित्त अधिकारी, फिजिओथेरपिस्ट, कार्यक्रम समन्वयक, परिचारिका, लेखापाल, डाटा एन्ट्री ऑपरेटर, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक आदी संवर्गाचा समावेश आहे. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांच्या उपस्थितीत समुपदेशन झाले.

### अशी राबविली भरती प्रक्रिया

- एकूण रिक्त पदे : २१९
- मुलाखतीस बोलावण्यात आलेले उमेदवार : २०६
- समुपदेशनास हजर उमेदवार : १६२
- पदस्थापनेस नकार दिलेले उमेदवार : ६
- नियुक्ती आदेश देण्यात आलेले उमेदवार : १५६
- समुपदेशनास गैरहजर उमेदवार : ४४

# मारकडवाडीचा 'फेर मतदान' पॅटर्न गाजतोय राज्यभर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी येथील ग्रामस्थांनी ईव्हीएमवर शंका व्यक्त करत बॅलेट पेपरने मतदान घेण्याचे ठरवले होते. यासाठी 'मॉक पॉल'चे आयोजन करण्यात आले होते. मात्र राज्य सरकारने हा 'मॉक पोल' थांबवला आणि ग्रामस्थांविरुद्ध गुन्हे दाखल केले. काही जणांना अटकही केली. यामुळे महाविकास आघाडीने आक्रमक होत शनिवारी निषेध म्हणून शपथविधी सोहळ्यावर बहिष्कार टाकला. आता या गावाला राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते शरद पवार, संसदेचे विरोधी पक्षनेते राहूल गांधीसारखे मोठे नेते येत असल्याने या गावाचा ईव्हीएमचा फेर मतदान पॅटर्न राज्यभर गाजत असल्याचेच सध्यातरी दिसून येत आहे.



या मारकडवाडी पॅटर्नविषयी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी माध्यमांशी आज संवाद साधला. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी स्वातंत्र्याचा दुसरा अध्याय सुरू झाला असून, मारकडवाडीचा प्रयोग आधुनिक भारताचा 'दांडी मार्च' असेल असे विधान यावेळी केले आहे. याच धर्तीवर नाना पटोले, आदित्य ठाकरे व इतर काही नेत्यांनीही मारकडवाडी येथे जो प्रयोग होणार होता तो सरकारने जबरदस्तीने थांबवला. लोकांना आंदोलनाचा अधिकार आहे. तो अधिकार सरकारने हिरावून घेतला आणि अटकसत्र सुरू केले. महात्मा गांधी यांच्या विचारांना पुढे घेऊन मारकडवाडीतील ग्रामस्थांनी लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्याचे ठरवले. त्यांचा नक्की गुन्हा काय? त्यांना अटक का केली? असे विविध सवाल या नेत्यांनी उपस्थित केले आहेत.

### जेष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनानंतर पुढील लढा : जानकर

मारकडवाडीत पडलेली ठिणगी देशभरात पोहचवण्याचा संकल्प महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आता केला आहे. यासाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी, राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते शरद पवार हेही मारकडवाडीत येणार असून, त्यांच्या मार्गदर्शनानंतर पुढील लढ्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती माळशिरस मतदारसंघाचे आ. उत्तम जानकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

### बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची दिल्लीत तयारी सुरू : पटोले

लोकशाही व मताचा अधिकार वाचवण्याची जबाबदारी आमची आहे. मारकडवाडीतून जी ठिणगी पेटलेली आहे ती देशात पोहचवण्याचा संकल्प आहे. यासंदर्भात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी चर्चा झाली असून, बॅलेट पेपरवर मतदान घेण्याच्या आंदोलनावर दिल्लीत तयारी सुरु आहे. सर्व तयारी झाल्यानंतर मारकडवाडीचे आंदोलन देशव्यापी करण्यासंदर्भात निर्णय होईल असे कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

# लाचखोर पोलिस शिपाई साखरे निलंबित

### वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक दराडे यांची बदली

### फौजदार चावडीचे पोलिस निरीक्षक देशमुख यांची नियत्रंण कक्षात बदली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि. ७ डिसेंबर -**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचेची रक्कम स्विकारताना पकडलेल्या सोलापूर शहर वाहतूक शाखेतील पोलिस कर्मचाऱ्यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी निलंबित करण्याचे आदेश दिले. तर वाहतूक शाखेच्या दक्षिण विभागाचे पोलिस निरीक्षक तानाजी दराडे यांची बदली करण्याचे आदेश दिले.

पोलिस शिपाई बसप्पा शिवराज साखरे (ब. नं. ५५५, नेमणूक - शहर वाहतूक शाखा, उत्तर विभाग) असे निलंबित करण्यात आलेल्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे.



शहर वाहतूक शाखेतील पोलिस शिपाई बसप्पा साखरे यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १५०० रुपयांची लाच स्विकारताना अटक करून त्याच्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात विशेष न्यायालयाने पोलिस शिपाई साखरे यांना पोलिस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणारमुळे पोलिस दलाची प्रतिमा मलिन झाली असल्याचा ठपका ठेवत पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी पोलिस शिपाई साखरे यांस निलंबित करण्याचे आदेश दिले. निलंबन कालावधीत साखरे यांना पोलिस मुख्यालयात दोन वेळेस हजेरी देणे बंधनकारक असल्याचेही आदेशात म्हंणण्यात आले आहे.

### तीन पोलिस निरीक्षकांच्या बदल्या

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयांमध्ये कार्यरत असलेल्या तीन पोलिस निरीक्षकांच्या बदल्या करण्याचे आदेश पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिले आहेत. त्यामध्ये फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे दुय्यम पोलिस निरीक्षक विकास देशमुख यांची नियत्रंण कक्षाकडे, शहर वाहतूक दक्षिण शाखेचे पोलिस निरीक्षक तानाजी दराडे यांची फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या दुय्यम पोलिस निरीक्षकपदी तर अतिक्रमण विभागाचे पोलिस निरीक्षक रविंद्रनाथ भंडारे यांची शहर वाहतूक शाखा दक्षिण विभागाच्या पोलिस निरीक्षकपदी बदली करण्यात आली आहे. तर अतिक्रमण विभागाचा कार्यभार हा नियत्रंण कक्षातील पोलिस निरीक्षक खुबा चव्हाण यांच्याकडे देण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक दराडे आणि देशमुख यांच्या बदलीबाबत कर्मचाऱ्यांमधून चर्चा होत आहे.

# पोलिस उपनिरीक्षकाबरोबर हुज्जत घालणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

राष्ट्रीय मानव अधिकार संस्थेचा शासकीय कर्मचारी असल्याचे सांगून पोलिस उपनिरीक्षकाबरोबर हुज्जत घालून सरकारी कामात अडथळा निर्माण करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक नागेश येणपे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वसीम अब्बास शेख (रा. दहिटणे, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

५ डिसेंबर रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक येणपे हे जुना बोरामणी नाका चौकात वाहतूक नियमनाचे काम करीत होते. त्यावेळी वसीम शेख हा त्याची बुलेट क्र. एमएच १३ बीएल ९७५१ या दुचाकीला मॉडीफाय सायलन्सर लावून शहराकडे येत होता. त्यावेळी पोलिस उपनिरीक्षक येणपे यांनी वसीम शेख यास अडवून बुलेटचे सायलन्सर काढण्यास सांगितले. त्यावेळी वसीम शेख याने पोलिस उपनिरीक्षक येणपे यांच्यासोबत हुज्जत घालण्यास सुरुवात केली. त्यावेळी वसीम शेख याने पोलिस उपनिरीक्षक येणपे यांच्याशी तक्रार करून त्यांच्या सरकारी कामात अडथळा आणला. म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्साहात

### येळकोट..येळकोट.. जय मल्हारचा जयघोष

### आज यात्रेचा पहिला रविवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ डिसेंबर**

श्रीक्षेत्र बाळे येथील ग्रामदैवत असलेल्या श्री खंडोबा देवाची यात्रा मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात सुरू झाली. शनिवार (दि.७) डिसेंबर रोजी चंपाषष्ठी आधारित विधी मंदिरात मोठ्या चैतन्य वातावरणात संपन्न झाला. यावेळी सोलापूर शहर जिल्ह्यातील अबालवृद्ध भक्तांनी मंदिरात श्रीखंडोबा देवाला भरीत रोडगा आणि पुरणपोळीचा अर्पण करून येळकोट.येळकोट..जय मल्हारचा.. जयघोष केला.





दरम्यान, मार्गशीर्ष महिन्यातील षष्ठी ही चंपाषष्ठी अथवा मार्तंडभैरव षष्ठी म्हणून सर्वत्र साजरी होते. या मासाचा पहिला दिवस 'खंडोबाची नवरात्री' आणि 'देवदिवाळी' म्हणून साजरा झाल्यानंतर सहा दिवसांच्या उत्सवाचा समारोप शनिवारी (दि. ७) चंपाषष्ठीला खंडोबा पूजनाने झाली. ज्या परिवारांमध्ये खंडोबा कुलदैवत आहे तिथे चंपाषष्ठीनिमित्त कुलाचार-कुलधर्म करण्याची परंपरा असते. तत्पूर्वी पाच दिवस अनेक घरांमधील सदस्य उपवास करतात. सहाव्या दिवशी खंडोबाची षोडशोपचार पूजा करून महानैवेद्य दाखवला जातो. यात्रा काळात मंदिर समितीकडून गाभारा व सभा मंडपामध्ये आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली आहे. भाविकांना अन्नदान प्रसाद, दर्शनासाठी मुख दर्शन व गाभारा दर्शन रांग , कमांडो फोर्स, सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमरे, पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. सोलापूर महानगपालिकेच्या वतीने मंदिर परिसरामध्ये आरोग्याच्या दृष्टीने औषध फवारणी, साफसफाई, पालखी मार्ग व परिसरात अतिरिक्त पथदिवे, बसेस, फिरते शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. कोणताही आनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस आयुक्त यांच्याकडून चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यात्रेच्या प्रत्येक रविवारी सायं श्री ची पालखी, घोडा, नंदीध्वजसह मिरवणूक निघते.

### चंपाषष्ठीचे महत्त्व

भगवान खंडोबाच्या मल्ल आणि मणि या दोन राक्षसांवर झालेल्या विजयाचे स्मरण म्हणून चंपाषष्ठी साजरी करतात. या राक्षसांचा पराभव करण्यासाठी भगवान शंकराने मार्तंड भैरवाचे रूप घेतल्याचे पुराणात सांगितले जाते. हे युद्ध अवघ्या सहा दिवसांतच संपले. याच दिवशी मार्गशीर्ष महिन्यातील षष्ठी तिथी होती. हा दिवस वाईटावर विजय म्हणून साजरा केला जातो.

आज यात्रेचा पहिला रविवार असून, श्रींचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात भाविकांची मोठी मांदियाळी होते. नवविवाहित जोडपे, तसेच इतर आबालवृद्ध भाविक भंडारा उधळत श्रींचे दर्शन घेतात.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९६७

**न लगे लौकिक सांडावा वेव्हार ।**
**घ्यावें वनांतर भस्म दंड ।।**

ईश्वरप्राप्ती किंवा आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी माणसाची सदैव धडपड चालू असते. त्याची ही धडपड संन्यास, ब्रह्मचर्य पालन, उपवास, व्रत-वैकल्ये तर कधी पायी वारीच्या माध्यमातून चालू असते. विविध मार्गाने धडपड करणारा हा माणूस स्वत:च्या वर्तनाकडे मात्र दूर्लक्ष करतो. ईश्वरप्राप्ती किंवा आत्मज्ञानप्राप्तीचा आधारस्तंभ हे मानवाचे वर्तन असायला हवे असे आम्हास वाटते. वर्तन चांगले नसेल तर व्रत-वैकल्याला किंवा पूजा-पाठाला कांही अर्थ नसतो. भगवंत भक्तीसाठी विविध प्रकारचे देहदंड सोसणारेही कांही कमी नाहीत. लोटांगण घालीत वारी करणारे, देहाला, इंद्रियांना विविध प्रकारचे दंड देणारे लोक पहायला मिळतात. अंगावर विशिष्ट पेहराव धारण करणारे, वनात जावून बसणारेही कांही कमी नाहीत.



प्रत्येक जीव हा ईश्वराचा अंश असतांनाही विशिष्ट रुपातल्या ईश्वराचा हे लोक शोध घेत असतात. आपला स्वभाव, वर्तन चांगले असेल, आपल्यात काम-क्रोध, मोह-माया, अहंकार-मत्सराला स्थान नसेल तर ईश्वरप्राप्तीसाठी वेगळे कांही करावे लागत नाही. संसारात अडकलेल्या जीवाला कांही कर्महीं करावीच लागतात. तेव्हा निती-नियमपूर्वक ही कर्म करावीत. त्याचबरोबर संसार सोडून संन्यास घेण्याची किंवा वनात जाऊन भस्म किंवा दंड घेण्याची गरज नाही. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**न लगे लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्म दंड ।।**

अत्यंत साध्या सरळ शब्दांत महाराजांनी भक्तीमार्ग दाखविला आहे. आपल्या वाट्याला आलेले कर्म निती-नियमपूर्वक पार पाडणे हीच ईश्वरभक्ती आहे. सदविचार, सदवर्तन हाच या भक्तीमार्गाचा आधारस्तंभ आहे. चार चांगल्या गोष्टी ऐकणे, चांगल्या गोष्टी सांगणे, मुखाने भगवंताचे नाम घेणे, कधीही कोणाचे वाईट न इच्छिणे, मनात कुविचाराला स्थान न देणे हीच योग्य अशी ईश्वरभक्ती आहे. संसारात अडकलेल्या जीवाने संसार सोडण्याची भाषा न करता, संसाराच्या आधिन न होण्याची भाषा करावी. संसारात स्वत:ला किती गुरफटू घ्यायचे हे ज्याचे त्याच्यावर अवलंबून आहे. केवळ वाऱ्या केल्या किंवा उपवास केले म्हणजे ईश्वरभक्ती झाली असे होत नाही. कर्म हाच भगवंत आहे. कर्तव्याकडे पाठ फिरवून ईश्वरभक्तीची भाषा बोलणे व्यर्थ असते. आपल्या वाट्याला आलेल्या कर्मात, कर्माच्या फळात आपण गुंतले नाही म्हणजे झाले. अर्थात, आपल्याकडून होणाऱ्या किंवा आपणाला कराव्या लागणाऱ्या कार्यात आपण मी ला स्थान देऊ नये. मी ला गुंतवू देणे किंवा मी ची जोपासणूक करणे म्हणजे भगवंतापासून दूर होणे होय. संत कबिरांनी म्हटले आहे, जब मैं था तब हरी नहीं । अब हरी है मैं नहीं ।। अर्थात, जोपर्यंत आपल्यात मी आहे, तोपर्यंत भगवंत येण्याचा प्रश्न उद्भवत नाही. आपल्यातील जेव्हा मी नष्ट होतो, तेंव्हा भगवंताचे आगमन आपोआप होते. तुकाराम महाराजांनी सांसारिकांना भक्तिमार्गाचा अत्यंत साधा-सोपा मार्ग दाखविला आहे. आपल्या वाट्याला आलेल्या कर्माचा त्याग न करता किंवा वनात न जाताही भक्ति होऊ शकते. अर्थात, निती-नियम हा आपल्या वर्तनाचा, कार्याचा आधरस्तंभ असायला हवा. भगवंत हा वनात किंवा आपण धारणा करीत असलेल्या विशिष्ट अशा वेशात नसून तो आपल्या कर्तव्यात आहे. या अभंगप्रसंगी कर्तव्य हीच खरी ईश्वरभक्ती एवढे जरी आपण लक्षात ठेवून वागलो तरी ते पुरेसे होईल असे वाटते. महाराजांच्या अभंगांचे अर्थ हे आमच्या अल्पबुध्दीचे असल्याने आपण सुजाण वाचकांनी आमची चूक भूल पदरात घ्यावी, अशी प्रार्थना आहे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : रविवार** | **दिनविशेष -** |
| **दि. ८ डिसेंबर २०२४** | **संत रोहिदास पुण्यतिथी,** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **चांगला दिवस** |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - मार्गशिर्ष** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **शु. सप्तमी (०९.४४)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - शततारका (१६.०२)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - वज्र (२७.५२)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - विष्टि (२०.५५)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ :** जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन :** आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क :** आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलते मुळे आपला फायदा होईल. विरोधकांपासून सावध रहा. कौटुंबिक संबंध चांगले राहतील. परमेश्वरावरील विश्वास वाढणार आहे.

**सिंह :** आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजना सुरू होतील. वडीलधाऱ्या व्यक्तिंच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**कन्या :** धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा. सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे.

**तुळ :** आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील. प्रवास करण्याचे शक्यतो टाळावे.

**वृश्चिक :** सकारात्मक परिस्थिती राहील. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल. कौटुंबिक तणाव निर्माण होईल.

**धनु :** आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मकर :** घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा.

**कुंभ :** उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन :** आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका.

# विविध उपक्रमांनी महामानवास अभिवादन

## शहरातील विविध शाळा, संस्था, संघटनांच्यावतीने अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील विविध शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटनांच्यावतीने विविध उपक्रमांनी आदरांजली वाहून महामानवास अभिवादन केले.




### एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळा

एन.ए.बी.निवासी अंधकार्यशाळेत महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यशाळेचे अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नॅब संस्थेचे सदस्य देवेंद्र भंडारे होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिवशरण गडदुरे व श्रीकृष्णा नागटिळक या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रियाज मुल्ला यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन दिपांजली केसकर यांनी केले तर आभार आमसिद्ध मोची यांनी केले.



### राष्ट्रसंत शाळा, विश्वभूषण विद्यालय

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजन्म विद्यार्थी होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञांनामुळेच आज भारतीय संविधान हे जगात सर्वश्रेष्ठ संविधान म्हणून ओळखले जाते. असे उद्‌गार ज्येष्ठ साहित्यिक, निवृत्त शिक्षणाधिकारी योगिराज वाघमारे यांनी काढले. अक्कलकोट रोड सोलापूर येथील सदसंकल्प शिक्षण समुहाच्या राष्ट्रसंत प्राथमिक शाळा आणि विश्वभूषण विद्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक सचिव अण्णासाहेब भालशंकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. शिवाजी बनसोडे हे होते. प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा.शिवाजी बनसोडे, राष्ट्रसंत शाळेच्या मुख्याध्यापिका मंजुश्री खंडागळे, विश्वभूषण विद्यालयचे मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे उपस्थित होते. प्रास्ताविक संतोष वाघमारे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रवीण पाटील यांनी केले. सत्यवान पाचकुडवे यांनी आभार मानले.



### नू.म.वि शाळा

नू.म.वि शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम बालसभेतर्फे साजरा करण्यात आला. कार्यक्रमास बाल अध्यक्ष म्हणून विवेक विधाते याची निवड केली गेली. त्यास अनुमोदन मयुरी झिपरे हिने दिले. प्रास्ताविक तनिष्का अग्निहोत्री हिने केले. मुख्याध्यापिका वर्षा जेधे व बाल अध्यक्ष विवेक विधाते यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. बाल अध्यक्षाचा परिचय साई झगळघंटे याने करून दिला. दीपा कुलकर्णी यांनी बुद्धवंदना सादर केली. संगीत शिक्षिका मीनाक्षी कुलकर्णी यांनी श्रद्धांजली गीत गायले. सूत्रसंचालन वेदांत पाटील याने तर आभार श्लोक नलावडे यांनी मानले.

### रेल्वे कार्यालय

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिवसाचे आयोजन विभागीय रेल्वे कार्यालय सोलापूर येथे अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विभागीय रेल्वे व्यवस्थापक निरजकुमार दोहरे व सर्व शाखा आधिकाऱ्यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार तसेच सामुदायिक बुद्ध वंदना करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे आयोजन अरविंदकुमार भगत वरिष्ठ मंडल कार्मिक अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली कार्मिक विभागातर्फे करण्यात आले. राजभाषा विभागाचे अनुवादक राजीव वलिवकर यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.



### कामगार शक्ती युनियन

महानगरपालिका कामगार शक्ती युनियनच्या कार्यालयामध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमेस कामगार संघटना संघर्ष समितीचे जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे व जन मंगल पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमन नयना पलंगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा चतुर्थश्रेणी पसंतीचे माजी चेअरमन भालचंद्र साखरे, केरबा माने, नितीन कांबळे, अजय कांबळे, परमेश्वर शिंगे, किरण काळे, दत्ता कोळी, रमेश माने, संस्कार पलंगे, अमोल गायकवाड, अंजना शिंगे, सरोजा पिलगिरी, सुशीला पिलगिरी, गुरूगंगा बनसोडे आदी उपस्थित होते.



### शहा कोठारी हायस्कूल

श्री. न. फु. शहा कोठारी हायस्कूलमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश यादवाड उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून रितेश मेहता उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आला. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याविषयी माहिती प्रशालेतील कु. सृष्टी कोळी, मंगल कुंभार, हुंडेकरी, कांबळे या विद्यार्थिनीने मनोगतात सांगितले. सूत्रसंचालन एस. एम. बगले यांनी केले तर आभार एस.एस. शिंदे यांनी मानले.



### राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटना

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, सोलापूर व राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, पदाधिकारी, सदस्यांनी विश्वभूषण, ज्ञानसूर्य तथा भारतीय संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना सोलापूर व राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना सोलापूर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अशोक इंदापूरे, राजीव साळुंके अध्यक्ष, शंतनु गायकवाड, अमृत कोकाटे, गजानन गायकवाड, मंजूनाथ गायकवाड दिपक पुजारी, किशोर साळवे, शंकर जाधव, मरप्पा फंदेललू, पाटील विनायक, देसाई सचिन, बनसोडे दशरथ, नवनाथ विभुते, रवि नष्टे, सुभाष मोपडे, मुदसर मंगरुळकर, रणजीत म्हेत्रे, विरेश सुलगडले, गंगाधर हाके,यलप्पा वरगंटी, देवीदास शिंदे, ज्ञानेश्वर कदम, संजय मसने, पंकज जाधव आदींची उपस्थिती होती.

### संभाजी ब्रिगेड

उत्तर सोलापूर तालुक्यातील सावंतवाडी येथील संभाजी ब्रिगेडच्या जिल्हा संपर्क कार्यालयात संभाजी ब्रिगेडच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना एक वहि एक पेन हा उपक्रम राबविण्यात येऊन भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, प्रदीप गवळी, पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष सोमनाथ गवळी, तलाठी सुधाकर कांबळे, ग्रामपंचायत सदस्य अभिमान सर्वगोड, अविनाश रणसुरे, भाऊ कसबे, आबा कांबळे, सुनील आलाटे, विशाल आस्वरे, सुरज सर्वगोड, सावकार गवळी, परमेश्वर सर्वगोड, अमोल सावंत, शेखर चौगुले, सुलेमान पिरजादे, सोहेल सय्यद, अजित चौगुले, बालाजी सावंत, सागर देवकुळे, सोमनाथ देवकुळे, विकास सावंत, अमर जगदाळे, चंद्रकांत माने, नारायण जगताप, अण्णासाहेब सावंत उपस्थित होते.





### नेताजी प्रशाला

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त हर घर संविधान उपक्रम साजरा करण्यात आला. प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, ज्येष्ठ शिक्षक संगप्पा दसगोंडे याच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, विठ्ठल कुंभार, प्रकाश कोरे, षडाक्षरी हिरेमठ उपस्थित होते.कावेरी नागठाण गायत्री माशाळ, दिव्या भंडारी, रत्नकला नागठाण, निर्जला म्हेत्रे, अनुष्का तुळशीगार स्नेहल लगशेट्टी, श्रेया नायकोडी, सारिका मोतकुर,राज रचा, गौतम येमूल, बसवराज जेटगी, आदर्श बुरेल, विवेक तुळशीगार, रघुनंदन गडगी, गणेश मुसळे, आदित्य बोद्दुल, प्रज्वल गुत्तीकोंडा, अथर्व कोंकत्ती, जगदीश पोगूल, भावेश कारमपुरी, सिद्धिविनायक दूधभाते व विघ्नेश पिडगुंडे आदी विद्यार्थ्यांनी हर घर संविधान या उपक्रमात सहभाग घेतला. सूत्रसंचालन शिवानंद पुजारी यांनी केले व आभार रेवणसिद्ध दसले यांनी मानले.



### क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना

सकल मातंग समाज व क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे, प्रविण वाडे, कोमल माचले, गौतम बनसोडे, राजाभाऊ जाधव, योगेश सोनवणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### पुतळा परिसराची स्वच्छता मोहीम

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या पुढाकारातून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (पार्क चौक) येथे सोलापूर शहर व ग्रामीण भागातील नागरिक येऊन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर या परिसरामध्ये मेणबत्ती, फुले, हार व उदबत्त्या हे या परिसरात इतरत्र अस्वस्थ पडलेले एकत्र करून हा परिसर आज सकाळी ७ वाजता सोलापूर महानगरपालिकेचे २० ते २५ कर्मचारी व नागरिकांच्या उपस्थितीमध्ये हा संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, मुख्य आरोग्य निरीक्षक नागेश मेंडगुळे, मुख्य आरोग्य निरीक्षक सूर्यकांत लोखंडे, विभागीय अधिकारी मुजावर शेख, आरोग्य निरीक्षक विठोबा सिंधी बंदे, आरोग्य निरीक्षक बसवराज जमादार, आरोग्य निरीक्षक शेषराव शिरसट, आरोग्य निरीक्षक कोंगे, आरोग्य निरीक्षक किरण पिडगुलकर उपस्थित होते.

### मेहता शाळा

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत शाळासमिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या प्रेरणेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न झाला. रेणुका पट्टणशेट्टी व मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शरण सलगरे या विद्यार्थ्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वेशभूषा अतिशय हुबेहूब साकारली होती. यावेळी शिक्षक संतोषी बिरादार यांनी मनोगत व्यक्त केले. इयत्ता १ ली विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरच्या जीवनातील प्रसंगाचे सुंदर



सादरीकरण केल्याबद्दल त्यांना भेटवस्तू देण्यात आली. तसेच दिव्यांग सप्ताहानिमित्त घेतलेल्या स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतर्फे पाहुण्यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली. सूत्रसंचालन मधुरा छत्रे यांनी केले तर आभार योगेश सरवदे यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महामानवाला अभिवादन



### श्री सिद्धरामेश्वर वाचनालय, हिपळे

**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

हिपळे येथील श्री सिद्धरामेश्वर सार्वजनिक वाचनालयात महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम वाचनालयाच्या अध्यक्षा शारदादेवी भीमाशंकर बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन हिपळे गावचे ज्येष्ठ नागरिक आबाजी वाघमोडे व विलास माने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी पुस्तकाचे वाचन केले. यावेळी मल्हार वाघमोडे, प्रल्हाद वाघमोडे, आकाश वाघमोडे, गौरीशंकर झांबरे, आपाशा जंगलबाग, दत्ता कोकरे, भाऊसाहेब वाघमोडे, कासिम शेख, सागर गडदे, सिद्धू वाघमोडे, मल्लिकार्जुन हुकिरे, गजू करजोळे उपस्थित होते. वाचनालयाचे व्यवस्थापक बापू वाघमोडे यांनी मनोगत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.



### कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालय, बार्शी

**बार्शी, दि. ७ डिसेंबर-**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालय येथे भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव, विश्वरत्न, भारतरत्न, युगप्रवर्तक, प्रज्ञावंत, प्रज्ञासूर्य, महामानव, बोधिसत्व, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने त्यांचे प्रतिमेसमोर त्यांनी लिहिलेले भारतीय संविधान माहितीसाठी ठेवण्यात आले होते. यावेळी पांडुरंग आस्वदे, कमलेश जाधव, सोमनाथ गायकवाड, किशोर भगत, सूरज काळे, हनुमंत तुपे आदींसह वाचक उपस्थित होते. सूत्रसंचालन ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी केले.



### आवताडेंकडून बाबासाहेबांना अभिवादन

**पंढरपूर, दि. ७ डिसेंबर-**

पंढरपूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबडेकर चौक येथे तसेच भीमशक्ती सांस्कृतिक व शैक्षणिक कला व क्रीडा मंडळ संत पेठ महापूर चाळ येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे यांनी स्मारकास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विद्वत्तेचा उपयोग तळागाळातील लोकांना सशक्त करण्यासाठी केला. तसेच त्यांनी केवळ भारतातच नाही तर जगभरातील हक्कांना मानवी प्रतिष्ठेला वैचारिक संघटनात्मक बळ मिळवून दिले आहे.



### सांगोला विद्या मंदिर

**सांगोला, दि. ७ डिसेंबर-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब झपके यांच्या प्रतिमेस कॉलेजमधील खेळाडू महेक मुलाणी व प्रतिक्षा येलपले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कॉलेजची विद्यार्थीनी सुतकरने धम्म प्रार्थनेचे पठण केले. यावेळी सां. ता. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. यावेळी प्रा. धनाजी चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.

### छत्रपती शिवाजी महाराज चौक, वैराग

**वैराग, दि. ७ डिसेंबर-**

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलीस अंमलदार किसन कोलते, ताजोद्दीन शेख, होमगार्ड किशोर खरटमोल, शाहरुख शेख, खंडू सकट, सूरज कांबळे, अजय काळे, सादिक पटवेकर, समीर शेख, ऋषी वाघमारे, युसुफ शेख, महेश भालशंकर, राहुल सकट, विशाल क्षीरसागर, मानेगाव-वैराग रिक्षा स्टॉप संघटनेचे सदस्यदेखील उपस्थित होते.

### सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळा, वैराग

**वैराग, दि. ७ डिसेंबर-**

वैराग : राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सामाजिक कार्यकर्ते महेंद्र निंबाळकर व महेश वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सलीमा सय्यद, यास्मिन शेख, रामराजे पाटील सर्व शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

# माढा लोकसभा मतदारसंघातील रस्ते होणार सुपर फास्ट

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचे केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ डिसेंबर-**

नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची माढा लोकसभा मतदारसंघातील रस्ते विकास व दळणवळणाच्या विविध प्रश्नांबाबत खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भेट घेतली व निवेदन दिले.



पुणे-सोलापूर एनएच-६५ वरील शिराळ फाटा, वेणगाव फाटा, जुना शिराळ रस्ता (टेंभुर्णी बायपास) येथे अंडरपास व शिराळ ते वेणगावदरम्यान सर्व्हिस रोडचे निर्माण करावे. एनएच ५६१ टेंभुर्णी-करमाळा-जातेगाव रस्त्याचा डीपीआर नुकताच प्रकाशित झाला आहे. तथापि, यामध्ये अकोले (खुर्द) येथील अंडरपास अकोले गावाकडे जाणाऱ्या रस्त्याशी जोडण्याऐवजी कन्हेरगाव रस्त्याशी जोडलेला दर्शविण्यात आला आहे. त्यामुळे अंडरपास १३५+५९८ च्या साखळीवर बांधण्याऐवजी १३५+३०० येथे बांधण्यात यावा व त्याची लांबी कमी करण्यात यावी. तसेच डीपीआरमध्ये टेंभुर्णी येथे पुणे-सोलापूर महामार्गाखालील अंडरपास ते महामार्गास जोडणाऱ्या उड्डाणपुलाऐवजी, टेंभुर्णी-करमाळा-जातेगाव रस्ता पुणे-सोलापूर महामार्गाशी जमिनीच्या पातळीवर जोडणारा रस्ता तयार करण्यात यावा, अशी नागरिकांची मागणी आहे. मागण्या विचारात घेऊन सुधारित डीपीआरमध्ये समाविष्ट कराव्यात अशी मागणी केली.

तरडगाव (ता. फलटण, जि. सातारा) येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग (राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५) वरील सध्या बांधकाम चालू असलेल्या पुलामुळे ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गावाचा विस्तार असून, शाळा, महाविद्यालये, शेती क्षेत्र, बागायती वाहतूक व दैनंदिन रहदारीसाठी पुलाची उंची व रुंदी अपुरी आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी व अपघात टाळण्यासाठी मोठा 'ध' आकाराचा उड्डाणपूल आवश्यक आहे. सध्याचे अपूर्ण व अयोग्य रचना असलेले पुलाचे काम ग्रामस्थांच्या जिवितासाठी धोकादायक असून, भविष्यातील जिवितहानी टाळण्यासाठी काम तातडीने थांबवून योग्य पर्यायांचा अवलंब व्हावा व तरडगाव ग्रामस्थांच्या मागणीनुसार सरकारने छक्ख सोबत चर्चा करून तांत्रिकदृष्ट्या सक्षम व वाहतुकीस सोयीचा पूल बांधावा, अशी मागणी केली.

**सकारात्मक प्रतिसाद**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासमवते खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माढा लोकसभा मतदारसंघातील रस्ते व दळणवळणा संदर्भातील प्रश्नांबाबत विविध प्रश्नांबाबत चर्चा करून निवेदन दिले. यावेळेस गडकरी यांनी यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# सर्वाधिश किंकर विठ्ठल रामानुज महाराजांनी घेतले पंढरीच्या श्री विठ्ठल-रूक्मिणीमातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ डिसेंबर-**

अखिल भारत जयगुरू संप्रदायाचे सर्वाधिश किंकर विठ्ठल रामानुज महाराज, कलकत्ता यांनी शनिवारी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचा मंदिर समितीच्या वतीने संत तुकाराम भवन येथे मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्रींची मूर्ती व उपरणे देऊन सन्मान केला.



किंकर विठ्ठल रामानुज महाराज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत. त्यांना अलौकिक मधुर आवाजाचे वरदान लाभले आहे. महाराजांच्या सत्संगाचा लाभ घेतलेल्या असंख्य साधकांचा हाच अनुभव आहे. त्यांनी आपल्या संगीत प्रविणतेचा उपयोग करून भगवान नाम अनेक रागांमध्ये विणले आहे. अतिशय मधुर स्वरांची हे सृजन म्हणजे अतिशय अद्भुत आणि अमूल्य ठेवा आहे, ज्याचे श्रवण केल्यावर श्रोते भगवान नामाकडे आकर्षित होतात; लोकांना नामाबद्दल आत्मीयता प्राप्त होते, तर अनेक साधकांना 'अमृताहुनी गोड नाम तुझे देवा...' ही रचना अनुभवायला मिळते आणि त्यांची आध्यात्मिक प्रगती व्यापक आणि गतिमान होते. चित्त का नित्य महोत्सव ग्रंथ व 'तणावमुक्त व्हा' या पुस्तकाचे लेखन करून, सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करून वाचकाला अध्यात्म, गुरू आणि देव इत्यादींची ओळख अगदी सोप्या पद्धतीने करून देत आहेत. तसेच त्यांनी 'सहजक्रिया योग' नावाची अतिशय सोपी पण प्रभावी योग पद्धत विकसित केली असून, या पद्धतीमध्ये प्राणायाम, प्रणाम आणि मंत्रजप यांचा अतिशय प्रभावी मिलाफ आहे. त्यांना अखिल भारत जय गुरु संप्रदायाचे तिसरे 'सर्वाधिश' म्हणून नाव देण्यात आले असून, त्यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली भारतात कार्यरत असलेल्या पंच्याहत्तरहून अधिक धार्मिक केंद्रांमध्ये आश्रमाची काळजी, 'नाम' शिकवणे, सनातन धर्माचा प्रचार, भजन, कीर्तन इत्यादी कार्यक्रम मोठ्या प्रेमाने आयोजित केले जातात, असा त्यांचा परिचय आहे. यावेळी मंदिर समितीचे कर्मचारी व रामानुज महाराज यांचा भक्तगण उपस्थित होता, असे मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

**मंदिर समितीला ५१ हजारांची देणगी**

रामानुज महाराज यांनी मंदिर समितीला ५१ हजार रूपये इतकी धनादेश स्वरूपात देणगी दिली आहे. तसेच त्यांनी श्री संत तुकाराम भवन येथे भजन देखील केले असून, त्यांच्या वतीने व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला व सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांचा देखील सन्मान व्यवस्थापक यांनी स्वीकारला. याशिवाय, ज्ञानेश्वर कुलकर्णी, पांडुरंग बुरांडे, भीमाशंकर सारवाडकर, राजेश पिटले, चंद्रकांत कोळी, प्रसाद दशपुत्रे, राजकुमार कुलकर्णी, सुधाकर घोडके, विशाल देवकुळे, सुशिलकुमार ढेकळे पाटील या कर्मचाऱ्यांचा देखील सन्मान केला.



# भाजपा पदाधिकाऱ्यांकडून श्री विठ्ठलाची तुळशी पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ डिसेंबर-**

महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून आज अतिशय आनंदाचा दिवस होता, भारतीय जनता पार्टी व महायुतीचे नेते देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.

यावेळी पंढरपूरमध्ये सर्व भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते, महिला मोर्चा, शहर कार्यकारिणी आणि जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने श्री. पांडुरंग-रुक्मिणी मातेस तुळशी अर्चन करून पेढ्याचा नैवेद्य दाखवून भाविकांमध्ये पेढे वाटून जल्लोष करून आनंद साजरा केला. यावेळी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सदस्य बाबासाहेब बडवे, भाजप पंढरपूर शहर सरचिटणीस श्याम तापडिया, भाजप पंढरपूर शहर सरचिटणीस आदित्य जोशी, भाजप महिला मोर्चा सोलापूर जिल्हाध्यक्षा डॉ. प्राजक्ता बेणारे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष अपर्णा तारके, भाजप महिला मोर्चा पंढरपूर शहर अध्यक्ष डॉ. ज्योती शेटे, भाजप महिला पदाधिकारी संचिता सगर, ज्योती जोशी यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एका महिलेसह दोघांना मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

## लक्ष्मी दहिवडी येथील घटना; पाणी बॉटलच्या व्यवसायावरुन घडली घटना

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ७ डिसेंबर-**

लक्ष्मी दहिवडी येथे परवानगीशिवाय बेकायदेशीरपणे स्मार्ट परी पाणी बॉटल व नयन जीरा सोडाचे उत्पादन सुरु केल्याने याबाबत जाब विचारावयास गेलेल्या एका ३२ वर्षीय बहिणीस तू येथे का आलीस? असे म्हणून तिला लाथ मारुन गळ्यातील १५ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र हिसकावून घेतले. यावेळी भांडणे सोडवण्यास आलेल्या भैय्या देशमुख व दत्तात्रय पवार यांना काठीने बेदम मारहाण करण्यात आल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी बाबुराव बर्गे, दादासाहेब बर्गे, अश्विनी बर्गे या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी, यातील फिर्यादी राधिका किरण जाधव (वय ३२, रा. सिद्धेवाडी, ता. पंढरपूर) यांचे माहेरी लक्ष्मी दहिवडी यमाई मंदिराजवळ गट नं. ९०३/२ येथे स्मार्ट परी या नावाने पॅक बंद पाणी बॉटलचे प्रॉडक्शन तयार करुन विक्री करत आहेत.

सदर कंपनी मध्ये फिर्यादीचा भाऊ बाबूराव हा मॅनेजर म्हणून काम पाहत आहे. मात्र कंपनीबाबत मालकी हक्क सांगू लागल्याने काही दिवस कंपनी बंद ठेवली आहे. हा वाद सुरु झाल्याने यापूर्वी मंगळवेढा पोलिसात गुन्हाही दाखल केला आहे.

दि.५ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वाजता यातील फिर्यादी सदर ठिकाणी आल्यावर कंपनीचे शटर उघडे दिसले. त्यावेळी पाणी बॉटलचे उत्पादन सुरु असल्याचे दिसून आले. तसेच परवाना नसलेल्या नयन जिरा सोडा याचेही उत्पादन सुरु असल्याचे दिसून आले.

त्यावेळी फिर्यादीची खात्री झाली की, परवानगी शिवाय बेकायदेशीरपणे आरोपी भाऊ बाबूराव बर्गे यांनी उत्पादन सुरु केले आहे म्हणून कंपनीतील सर्व साहित्य घरी घेऊन जायचे ठरवले, त्यावेळी फिर्यादीचे वडील दादासाहेब बर्गे, भाऊ बाबुराव बर्गे,वहिनी अश्विनी बर्गे सदर ठिकाणी आले व भांडण करु लागले. भावाने तू येथे का आलीस? असे म्हणून फिर्यादीच्या पाठीत लाथ मारताच फिर्यादी जमिनीवर कोसळली.

**पोटात घातल्या लाथा, मंगळसूत्रही तोडले**


पोटात लाथ मारुन गळ्यातील १५ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून तोडून घेतले. हा प्रकार सुरु असताना फिर्यादीचा पती किरण जाधव व त्यांचे मित्र भैय्या देशमुख व दत्तात्रय पवार हे भांडणे सोडविण्यास आल्यावर त्यांनाही काठीने बेदम मारहाण केल्याचे राधिका जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणजे विकासाचे व्हिजन : चेतनसिंह केदार-सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ डिसेंबर-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणजे विकासाचे व्हिजन आहेत, अशी भावना भाजपाचे पश्चिम जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केली.





महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर राज्यात पुनश्च विकासपर्व सुरू होणार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ मध्ये आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात राज्यात सर्वांगीण विकासाची पायाभरणी केल्यामुळे, आज महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात विकासासह रस्ते, रेल्वे आणि मेट्रोचे जाळे विस्तारले आहे. महाराष्ट्रात अनेक विकासाभिमुख प्रकल्पांची मुहूर्तमेढ रोवली, त्यांची सुरुवात केली. देवेंद्र फडणवीसांसारखे दूरदृष्टी लाभलेले नेतृत्व विकसित महाराष्ट्राला आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्रात नव्या उंचीवर घेऊन जाईल, यात शंका नाही. देवेंद्र फडणवीस म्हणजे कार्यकर्त्यांना आधार देणारा लोकाभिमुख नेता आणि विकासाचे व्हिजन असणारे लोकाभिमुख नेतृत्व होय अशा शब्दात भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या.

राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा शपथ घेणार असल्याने सोलापूर जिल्ह्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजता राष्ट्रगीत आणि महाराष्ट्रगीताने या शपथविधी सोहळ्याची सुरुवात होताच सांगोला तालुक्यासह माळशिरस, करमाळा, माढा, बार्शी तालुक्यातील चौकाचौकात लावण्यात आलेल्या स्क्रीनवर देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीचा ऐतिहासिक क्षण अनुभवण्यासाठी रस्त्याने जाणारा प्रत्येक जण थांबला. देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री बनल्याने भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत आणि एकमेकांना पेढे भरवत जल्लोष साजरा केला.

# मैंदर्गीत मुले धावली, खेळले अन् जिंकलेही

## बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेचे बक्षिस वितरण; लंगडीमध्ये कन्नड शाळेच्या मुली अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेत विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यात मुले मनसोक्त खेळले, रनिंग स्पर्धेत धावले अन् चमकदार कामगिरी करत बक्षिसही मिळवले. विद्यार्थ्यांचे हे क्रीडा नैपुण्य पाहण्यासाठी मैंदर्गी बीटमधील विद्यार्थी, शिक्षकांसह क्रीडाप्रेमींही मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मोठा गट मुले-मुली, लहान गट मुले-मुली अशा गटात लंगडी, कबड्डी, खो-खो, वैयक्तिक रनिंग, चेस अशा स्पर्धा घेण्यात आल्या. या क्रीडा प्रकारात मोठा गट लंगडीमध्ये मैंदर्गी मुलींची शाळा, कबड्डी मोठा गट मुली नगोरे शाळा, खो-खो मुली मोठा गट हत्तीकणबस, मुले मोठा गट कबड्डी दहिटणेवाडी शाळा, लंगडी मोठा गट मुले नागोरे शाळा, मोठा गट खो-खो हत्तीकणबस शाळा, लहान गट कबड्डी मुले तळेवाड शाळा, लंगडी लहान गट मुली सलगर कन्नड शाळा, खो-खो लहान गट मुली नागुरे कन्नड शाळा, कबड्डी लहान गट मुले सापळे शाळा, लंगडी लहान गट मुले हालहळ्ळी (अ) शाळा, खो-खो लहान गट मुले हालहळ्ळी (अ) शाळा, १०० मीटर धावणे मुली मोठा गट मैंदर्गी मुलींची कन्नड शाळा सपना खेत्री, मुले कन्नड मुगळी शाळा साहिल आवटे, २०० मीटर धावणे मुली मोठा गट हत्तीकणबस शाळा लक्ष्मी हलकुडे, २०० मीटर धावणे मोठा गट मुले मुगळी मराठी शाळा साहिल आवटी, बुद्धिबळ मोठे गट मुली सापळे शाळा वैष्णवी चंद्रकांत घंटे, मोठा घट मुले सापळे शाळा आनंद बंदीछोडे, १०० मीटर धावणे लहान गट मुली कन्नड शाळा सलोनी माडजे, मुले मुस्तफा मंजलापुरे मैंदर्गी उर्दू शाळा, २०० मीटर धावणे लहान गट मुली करजाळ भाग्यश्री माडजे, बुद्धिबळ लहान गट मुली साफळे वर्षा बंदीछोडे, मुले सापळे शाळा यश बंदीछोडे हे विजेते ठरले. या स्पर्धा मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आल्या. यावेळी विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, माजी नगराध्यक्ष तुकप्पा नागूर, केंद्रप्रमुख जीवराज खोबरे, इंद्रसेन पवार, कृष्णात मोरे, मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी, श्रीशैल हडलगी, आप्पाशा विभुते, विजयकुमार तडकलकर, रमेश रोजगार, महादेव पाटील, विजयकुमार गुंडद, अंबाराया उजनी, गुरुलिंगप्पा शिवणगी आदी उपस्थित होते.

**कट्टीमनी गुरुजींच्या स्मरणार्थ पारितोषिक**

विजेत्या व उपविजेत्यांना दलितमित्र हनुमंतराव कट्टीमनी यांच्या स्मरणार्थ समर्थनगर अक्कलकोट येथील दलितमित्र फाउंडेशनतर्फे २४ सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. बक्षिसे देण्याचे यंदाचे हे दुसरे वर्ष आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शासकीय हमीभाव; उडीद, सोयाबीन खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीला मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ डिसेंबर-**

शासनाचे हमीभाव खरेदी योजनेंतर्गत ३० नोव्हेंबरअखेर उडीद व सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांनी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर ७/१२ उतारा, उडीद व सोयाबीन पिकाची नोंदीसह, आधारकार्ड व बँक पासबुक झेरॉक्स इत्यादी कागदपत्रे जमा करून ऑनलाईन नाव नोंदणी करण्यासाठी वरील कालावधी निश्चित केला होता. आता याला मुदतवाढ देण्यात आली आहे.



दरम्यान, शासनाकडे सदर नोंदणी कामी मुदत वाढ मिळावी म्हणून मागणी केलेली होती. त्यास राज्य शासनाने प्रतिसाद देत १५ डिसेंबरपर्यंत सदर खरेदीची ऑनलाईन नाव नोंदणीस मुदतवाढ दिलेली आहे. उडीद या शेतीमालासाठी शासकीय हमीभाव ७,४०० प्रति क्विंटल इतका आहे व सोयाबीन शेतीमालासाठी शासकीय हमीभाव ४,८९२ प्रति क्विंटल इतका आहे. शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर हमीभावाने उडीद व सोयाबीन विक्री करण्यासाठी सांगोला, माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील शेतकरी बांधवांनी १५ डिसेंबरअखेर आपल्या उडीद व सोयाबीन या शेतीमालाची ऑनलाईन नाव नोंदणी पंढरपूर तालुका सह. खरेदी विक्री संघ लि., नवी पेठ, पंढरपूर येथे नमूद कागदपत्रासह करावी, ऑनलाईन नाव नोंदणीशिवाय शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर उडीद व सोयाबीन विक्री करता येणार नाही. जास्तीत-जास्त शेतकरी बंधूंनी याचा लाभा घ्यावा असे आवाहन बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजूबापू गावडे यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### मांडवे येथील रत्नत्रय शैक्षणिक संकुलामध्ये फळे वाटप उपक्रम

**नातेपुते, दि. ७ डिसेंबर-**

मांडवे (ता. माळशिरस) येथील रत्नत्रय शैक्षणिक संकुलात शनिवारी फळे वाटपाचा स्तुत्य उपक्रम प्रत्येक शनिवारी राबविला जातो. त्यामुळे लहान मुलांना लहापणापासूनच फळे खाण्याची सवय लागावी यासाठी हा स्तुत्य उपक्रम प्रत्येक शनिवारी शाळेमध्ये घेण्यात येतो. नियमित फळांचे सेवन केल्याने पचनशक्ती वाढते, त्याचप्रमाणे आमच्या संस्थेचा हा उपक्रम घेण्यामागचा प्रमुख हेतू म्हणजे मुलांमध्ये असणारे कलागुण दर्शविण्याची त्यांना संधी उपलब्ध करून देणे, मुलांमध्ये स्टेज डेरिंग निर्माण करणे हा आहे. या दरम्यान मुलांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम, प्रश्नमंजुषा कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रसंगी सचिन लवटे, राहुल लवटे, रघुनाथ वाघमोडे, अरुण वाघमोडे, जतेंद्र निंबाळकर, ज्योतीराम शिंदे, माधुरी शिंदे, रूपाली शिंदे, पूनम खांडेकर, ताराबाई वाघमोडे, दीपाली वाघमोडे, सोनाली वाघमोडे, निकिता सोनवणे, प्रतीक्षा सोनवणे, दातार शशिकांत पंडित उपस्थित होते. सूत्रसंचालन मेघा सुतार यांनी केले.



### अभिनेते विश्वप्रकाश मलगोंड यांचा सिंदगी येथे सत्कार

**विजयपूर, दि. ७ डिसेंबर-**


सिंदगी येथे कर्नाटक राज्य सरकारी कर्मचारी संघटनेने सिंदगी तालुका घटकच्या वतीने अभिनेते विश्वप्रकाश टी. मलगोंड यांचा सत्कार करण्यात आला. कर्नाटक राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश सी. षडश्याळ, सय्यद जुबेर एस. केरुर, जगदीश सदाशिव बोळसूर, निजू एम. मालिनकेरी, शंकरगौडा आर. पाटील, नीला इंगळे, जयश्री बेन्नी, बी. टी. गौडार, रवींद्र प्रल्हाद उगार, अलमेल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष बिरदवी, रवींद्र गौडा आदी उपस्थित होते. आलमेल तालुका कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी बिरादार, सिंदगी तालुकाध्यक्ष अशोक तेलुर, राजू नरगोडी, कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



### झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**करमाळा, दि. ७ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूल मध्ये क्रीडा सप्ताहाचे उदघाटन श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक हरिदास डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष प्राचार्य जयप्रकाश बिले होते. योद्धा करिअर अकॅडमीचे प्रशिक्षक मेजर सोंडकर, संचालिका डॉ. स्वाती बिले, मुख्याध्यापिका अमृता परदेशी, सतीश कोंडलकर, तानाजी हरणावळ उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मार्चिंग, लेझीम तसेच डंबेल याचे गुण प्रदर्शन केले. सूत्रसंचालन सपना देशमुख आणि रूपाली शिंदे यांनी केले.



### माढा तालुका मराठा महासंघाच्या युवक अध्यक्षपदी उदय शेळके

**कुर्डूवाडी, दि. ७ डिसेंबर-**

माढा तालुका मराठा महासंघ युवक अध्यक्षपदी उदय शेळके यांची निवड करण्यात आली. निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष संदीप भोरे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी जिल्हा सचिव गणेश चव्हाण, माढा तालुकाध्यक्ष धनाजी गोडसे, शंकर बागल, ॲड. विजयकुमार आडकर, शंकर कदम, धनंजय जगताप, सौदागर भांगे, अजित भडकवाड, शहाजी कदम, माजी नगरसेवक अमर माने आदी मान्यवर उपस्थित होते.

## मंगळवेढ्यात पाच दिवसांत दोनवेळा उसाचे ट्रॅक्टर झाले पलटी

### शाळकरी मुलांचा जीव टांगणीला; प्रशासन कोणाच्या मृत्यूची वाट पाहतेय? नागरिकांचा संतापजनक सवाल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ७ डिसेंबर-**

मंगळवेढा शहरातून ऊस भरुन कारखान्याकडे निघालेला ट्रॅक्टर दामाजी चौकातील इंग्लिश स्कूल गेटच्या समोर पलटी झाल्याची घटना शुक्रवारी पहाटे घडली असून पाच दिवसांत ट्रॅक्टर पलटी होण्याच्या दोन घटना घडल्या आहेत. दरम्यान या दोन्ही घटना सुट्टीच्या दिवशी व पहाटे घडल्यामुळे सुदैवाने यात मनुष्यहानी होऊ शकली नाही. प्रशासन दोन घटना घडूनही कोणाच्या मृत्यूची वाट पाहते काय? असा संतापजनक सवाल नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे.

मंगळवेढा शहरातून दिवसरात्र उसाने भरलेले ट्रॅक्टर व कर्नाटकामधून येणाऱ्या अवजड वाहनांची ये-जा सुरु असते. जागरुक नागरिकांनी अवजड वाहतूक थांबविण्यासाठी वेळोवेळी आंदोलन केल्यावर पंढरपूर बायपास रोडजवळ कमान नगरपालिकेने बसविली. मात्र ही कमान प्रमाणापेक्षा उंच असल्याने याचा परिणाम अवजड वाहनावर न होता अलगदपणे शहरात जोमाने वाहने येत असल्यामुळे दामाजी चौकात शालेय मुले, नागरिक, वृद्ध यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरुन ओलांडाव लागतो. नगरपालिकेने केवळ कमान बसवून रडक्याचे डोळे पुसण्याचे काम केल्याच्या तिखट प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

पोलिसांनी अवजड वाहनावर दंडात्मक कारवाई केल्यास याला निश्चित आळा बसेल. मात्र पोलीस प्रशासन नगरपालिका प्रशासनाकडे बोट दाखवत असल्यामुळे लोकांचे आत्तापर्यंत दहा जणांचे जीव जाऊनही तू... तू... मै... मै.. चा प्रकार सुरु असल्याने नागरिकांनी या कामकाजाबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे.



### ...अन् दुर्घटना टळली

रविवारी भर दुपारी मोकळ्या ट्रॅक्टरचे ट्रेलर इंग्लिश स्कूलच्या समोर दामाजी चौकात पलटी झाल्याची घटना घडली होती. यानंतरही नगरपालिका व पोलीस प्रशासन तोंडावर बोट ठेवूनच आहे. शुक्रवारी पहाटे उसाने भरलेला ट्रेलरच चक्क पलटी झाला. सुदैवाने येथे नागरिकांची वर्दळ नसल्यामुळे दुर्घटना टळली.

### नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

सध्या नगरपालिकेचा प्रशासन कारभार प्रांताधिकारी हे पाहत असून त्यांचीही भूमिका गांधारीची असल्याने नागरिकांना या अवजड वाहनाबाबत मोठा गंभीर प्रश्न पडल्याच्या प्रतिक्रिया सुज्ञ नागरिकांमधून व्यक्त होत आहेत. यापूर्वीही त्यांच्याकडे मनसे तसेच वारी परिवार यांनी तक्रारी केल्या होत्या. मात्र या तक्रारीचा शंभर टक्के निपटारा न झाल्याने अद्यापही अवजड वाहतूक शहरामधून सुरु असल्याचे चित्र असून अजून कुणाच्या मरणाची वाट हे पाहतात काय? असा सवालही ज्येष्ठ नागरिक करीत आहेत.

## नातेपुते येथे आज अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ७ डिसेंबर-**

नातेपुते येथे गेल्या सात दिवसापासून सुरा असणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाचा आज काल्याचे किर्तन आणि व महाप्रसादाने सांगता कार्यक्रम होत असून नातेपुते येथे श्री विठ्ठल मंदिरात जगद्गुरु संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन त्रिशतकोत्तर तथा ३७५ वा. अमृत महोत्सव वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व भव्य दिव्य कीर्तन महोत्सव सोहळ्याचे आयोजन ग्रामस्थांच्या सहकार्यातून करण्यात आलेले होते.




शंभू महादेवांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नातेपुते नगरीमध्ये नाचू किर्तनांचे रंगी ज्ञान दिप लावू जगी !! चला जाऊ स्वल्प वाटे वाचे गाऊ विठ्ठल या न्यायाने सप्ताहाची प्रेरणा वै.ह भ प. मनोहर महाराज भगत सप्ताहाचा शुभारंभ सोमवार दि. २ डिसेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत झाला होता


सप्ताहातील किर्तन महोत्सवात रात्री ८ ते १० यावेळेत दि. २ डिसेंबरपासून रोजी हभप दत्तात्रय महाराज गलांडे भागवताचार्य लासुर्णे, हभप गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले, हभप बापूसाहेब महाराज देहुकर, अशोक महाराज जाधव, रामायणाचार्य, गणेश महाराज भगत, ज्ञानेश्वर महाराज शिंदे या महाराजांनी कीर्तन सेवा दिली. ८ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते ११ यावेळेत काल्याचे कीर्तन संतवीर हभप बंडातात्या कराडकर करणार आहेत. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद होईल. यासाठी अखंड हरिनाम सप्ताह समितीचे अध्यक्ष अमोल गजानन पाडसे, बापुसाहेब भांड, विनायकराव उराडे, चंद्रकांत ठोंबरे, गणेश कुचेकर, गणेश पागे, तुकाराम ठोंबरे, मंगेश दिक्षीत, अभिजित म्हामणे, समाधान माळी, जालिंदर ठोंबरे, नारायण काळे, सचिन साळी परिश्रम घेत आहेत.

## खानवडीत २८ डिसेंबर रोजी महात्मा फुले मराठी साहित्य संमेलन

### दशरथ यादव यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ७ डिसेंबर-**

सतरावे राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन खानवडी (ता. पुरंदर) येथे २८ डिसेंबर रोजी होणार आहे, उद्घाटन समारंभ, कथाकथन, ग्रंथदिंडी, नाट्यप्रयोग, कविसंमेलन असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक दशरथ यादव यांनी पत्रकार परिषदेत दिली.



संमेलनाच्या संयोजन बैठकीला राजाभाऊ जगताप, प्रसिद्धी प्रमुख दत्तानाना भोंगळे, सुनील लोणकर, श्यामकुमार मेमाणे, गंगाराम जाधव, बहुजन हक्क परिषदेचे सुनील धिवार, दत्ता कड, अरविंद जगताप, दीपक पवार, संजय सोनवणे, आदी उपस्थित होते. महात्मा फुले यांच्या मूळ खानवडीमध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान यांच्या वतीने दरवर्षी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते. या संमेलनात राज्यभरातून लेखक, कवी सहभागी होतात. कऱ्हा नदीच्या काठावर रंगणाऱ्या या साहित्य संमेलनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या लेखक, कवींनी मो. ९८८१०९८४८१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन यादव यांनी केले आहे.

## सह्याद्रीमध्ये बी, एम. फार्मसी तृतीय फेरीसाठीचे ऑपशन फॉर्म आजपासून चालू

**सांगोला,दि.६ डिसेंबर-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठीची बी व एम.फार्मसीसाठी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया तिसरी फेरी आजपासून पासून चालू होणार असून त्याचे ऑपशन फॉर्म दि.७ ते ९ डिसेंबर या दरम्यान भरायचे आहेत. तरी नोंदणीकृत विद्यार्थ्यांनी वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रियेत भाग घ्यावा असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी डॉ. एस. एम. मोरे (९७६६८१५१२३), प्रा. एस. एस. काळे (९८२२०४७२३६), डॉ. ए. एम. तांबोळी (९९७५४०२४६५), डॉ. एन. ए. तांबोळी (९४२२६४४८७६) व पी. एस. लोखंडे (९८२३१०७३७१) यांना संपर्क करावा असे आवाहन प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांनी केले आहे. तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी ऑपशन फॉर्म भरणे- ७ ते ९ डिसेंबर, तिसरी प्रवेश फेरी लिस्ट- १२ डिसेंबर, तिसऱ्या फेरीत नंबर लागलेल्या अर्जदार विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या प्रवेशासाठी करावयाची प्रक्रिया- १३ ते १६ डिसेंबर, कट ऑफ डेट- २३ डिसेंबर.

## बार्शीतील डीआयआयटी कॉम्प्युटर सेंटरला एमकेसीएलकडून उत्कृष्ट बेस्ट परफॉर्मिंगचा पुरस्कार



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ डिसेंबर-**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ एम केसीएलच्या वार्षिक सभेमध्ये बार्शी येथील ज्ञानेश्वरी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ( डी.आय.आय.टी कॉम्प्युटर्स, सन १९९६, बार्शी) सेंटरला सलग २४ व्या वर्षी एमकेसीएलकडून उत्कृष्ट बेस्ट परफॉर्मिंग सेंटर श्रुरी इर्शीं झशीर्षेीळपस खपीींळीींश म्हणून सन्मानित करण्यात आले.

डीआयआयटी कॉम्प्युटर यांनी २०२५ मध्ये सोलापूर जिल्ह्यात ६२८ विद्यार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाचे संगणक प्रॅक्टिकल ज्ञान दिले. सोलापूर जिल्ह्यात सर्वात जास्त २पव हायेस्ट ॲडमिशन करुन दुसरा क्रमांकाचा बहुमान मिळवला आहे म्हणून श्री. भारत पुरुषोत्तम चौधरी व सौ.पृथा भारत चौधरी संचालक यांना एम केसीएल व्यवस्थापकीय संचालक डॉ. विना कामत मॅडम यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या पुरस्कारांचे श्रेय तालुक्यातील सर्व स्मार्ट विद्यार्थी पालक तसेच सहकारी तसेच डीआयआयटी कॉम्प्युटरचे सहकारी स्वांती बारुंगळे, प्रशांत येव्हारे, विजय क्षीरसागर, स्वप्निल चोबे, गणेश स्वामी, कुलकर्णी प्रसाद व सौरभ पारडे व इतर स्टाफ यांच्या योगदानामुळेच हे यश मागील २८ वर्षांपासून संपादित करु शकलो, असे डीआयटी कॉम्प्युटरचे संचालिका संचालक श्री. व सौ. पृथा भारत चौधरी यांनी सांगितले. या कार्यक्रमांमध्ये एम केसीएलचे जनरल मॅनेजर अतुल पतोडी, अमित रानडे, महेश पत्रिके, रोहित जेऊरकर व कॉर्डिनेटर हरुन शेख, मलिक, शिवानंद सर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला.



## डॉ. संजय साळुंके यांना मिलेनियम फार्मर ऑफ इंडिया पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ७ डिसेंबर-**

वाशिंबे (ता. करमाळा) येथील डॉ. संजय साळुंके यांना आयसीएआर यांच्या वतीने शेतीतील केळी आणि ऊस पिकातील जैविक खतांचा वापर करून उत्कृष्ट उत्पादन घेतल्याबद्दल राष्ट्रीय स्तरावरील मिलेनियम फार्मर ऑफ इंडिया हा सर्वोच्च पुरस्कार मिळाला.

हा पुरस्कार दिल्ली येथे कृषी जागरण, महिंद्रा ट्रॅक्टर्स आणि आयसीएआर यांच्या संयुक्तपणे आयोजित आयसीएआरच्या पुसा कॅम्पसमधील एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. या पुरस्कारासाठी त्यांची निवड आयसीएआर या संस्थेने केली होती. शेतीत नवनवीन गोष्टींचा अवलंब करत शेती फायद्याची कशी करता येईल यावर त्यांचा भर असतो. बायोमी टेक्नॉलॉजीज कंपनीच्या अग्री इनपूट ट्रेनिंगमध्ये त्यांनी प्रशिक्षण घेतले आहे. त्यांच्या या सगळ्या प्रवासात बायोमी टेक्नॉलॉजीज कंपनीचे प्रमुख शास्त्रज्ञ आणि सीईओ डॉ. प्रफुल्ल गाडगे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

## आदर्श सैनिक शाळेच्या विद्यार्थ्यांचा एनडीए दौरा

### प्रेरणादायी आणि ज्ञानपूर्ण अनुभव

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ७ डिसेंबर-**

आदर्श सैनिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी २८ नोव्हेंबर २०२४ रोजी पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) ला शैक्षणिक दौरा केला. हा दौरा विद्यार्थ्यांसाठी एक अद्वितीय अनुभव होता, ज्यातून त्यांनी देशाच्या संरक्षण यंत्रणेचे, सैनिकी जीवनाचे आणि शिस्तबद्धतेचे महत्त्व समजले.

विद्यार्थी शाळेतून बसने सकाळी एनडीए कॅम्पसला पोहोचले. सुरक्षेतून तपासणीनंतर आणि स्वागत समारंभानंतर विद्यार्थ्यांना एनडीएच्या इतिहासावर व त्याच्या महत्त्वावर प्रझेंटेशन दाखवले गेले. यामध्ये एनडीएने भारतीय सेना, नौदल आणि हवाई दलासाठी भविष्यातील अधिकारी कसे घडवले जातात, याची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी एनडीएच्या विस्तीर्ण आणि सुव्यवस्थित कॅम्पसचे निरीक्षण केले. यामध्ये प्रशिक्षण केंद्र, कॅडेट हॉस्टेल, व्यायामशाळा, क्रीडांगणे आणि सुडान ब्लॉक यांचा समावेश होता. त्यांनी कॅडेटस्च्या प्रशिक्षण पद्धती आणि त्यांचे रोजचे कार्यक्रम पाहिले, ज्यामध्ये शारीरिक फिटनेस, मानसिक तयारी आणि नेतृत्व कौशल्याचा विकास केला जातो. एनडीए संग्रहालय हा दौऱ्यातील मुख्य आकर्षण होता. येथे विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्याच्या ऐतिहासिक कथा, युद्धसामग्री, शस्त्रे आणि उपकरणांची माहिती घेतली. तसेच, कॅडेटस्ने जिंकलेल्या पुरस्कारांचा आणि ऐतिहासिक दस्तऐवजांचा अभ्यास केला.



एनडीए परेड पाहून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण झाली. कॅडेटस्ची शिस्तबद्ध चाल, त्यांची पोशाखातील कर्तबगारी आणि गरिमा पाहून विद्यार्थी भारावून गेले. परेडनंतर, अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि एनडीएमध्ये प्रवेश प्रक्रिया तसेच सैनिकी क्षेत्रातील करिअर संधींविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांना एनडीएच्या अधिकाऱ्यांशी आणि कॅडेटस्शी चर्चा करण्याची संधी मिळाली. त्यांनी एनडीएत प्रवेश कसा घ्यावा, प्रशिक्षणातील अडचणी कशा हाताळाव्यात आणि सैन्य शिस्त कशी पाळावी याविषयी प्रश्न विचारले. या सत्रातून विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात प्रेरणा मिळाली. हा दौरा विद्यार्थ्यांसाठी फक्त शैक्षणिक नव्हता, तर जीवनातील महत्त्वाचे मूल्य शिकण्याची संधी होती. त्यांनी कष्ट, शिस्त आणि देशभक्तीच्या जोरावर कोणतेही लक्ष्य कसे साध्य करता येते हे शिकले.

### व्यवस्थापकीय संचालकांचा संदेश

आदर्श सैनिक शाळेच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती पूजा सुरवसे यांनी या दौऱ्याचे विशेष कौतुक केले आणि विद्यार्थ्यांसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले, विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभव देणे आवश्यक आहे. अशा दौऱ्यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्व क्षमता आणि देशभक्तीची भावना दृढ होते.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**येरमाळा :** चंपाषष्ठीनिमित्त दहिफळ (ता. कळंब) येथील ग्रामदैवत खंडोबा देवाच्या यात्रेनिमित्त गाडा बगाडा मिरवणूक काढण्यात आली. त्यावेळी लाखो भाविक दर्शनासाठी जमले होते.



# जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या ६६३ कोटी रुपयांच्या पिकविमा प्रकरणाला गती

## राज्य सरकारने दिले नियुक्तीचे आदेश... आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्याला यश...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हक्काच्या २०२० आणि २०२१ वर्षातील पिकविमा प्रकरणाला आता गती मिळणार आहे. शेतकऱ्यांचे ६६३ कोटी रुपये देण्यास टाळाटाळ करणाऱ्या विमा कंपनीस चाप बसणार आहे. छत्रपती संभाजीनगरच्या उच्च न्यायालयात विमा कंपनीच्या विरोधात आता ज्येष्ठ कायदेपंडित (सिनियर कौन्सिल) आर. एन. धोरडे-पाटील सरकारच्या वतीने बाजू मांडणार आहेत. विमा कंपनीच्या विरोधात राज्य सरकारची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी वरिष्ठ कायदेतज्ञाची नियुक्ती करण्यात यावी अशी आग्रही मागणी आपण तत्कालीन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे केली होती. हक्काचा पीकविमा मिळावा यासाठी आपण केलेल्या मागणीला यश आले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी विमा कंपनी जाणीवपूर्वक वेळकाढूपणा करीत आहे. त्यासाठी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने ज्येष्ठ व विख्यात विधिज्ञानी (सिनियर कौन्सिल) विमा कंपनीच्या विरोधात न्यायालयात राज्य सरकारची बाजू भक्कमपणे मांडायला हवी अशी आग्रही मागणी आपण लावून धरली होती. बुधवार २४ जुलै रोजी तत्कालीन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली त्यासाठी बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत आपल्या मागणीनुसार वरिष्ठ विधिज्ञाची (सिनियर कौन्सिल) सरकारच्या वतीने नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार वरिष्ठ कायदेतज्ञ आर. एन. धोरडे-पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. तत्कालीन ठाकरे सरकारकडे या प्रलंबित पीकविमा प्रकरणी अनेकदा मागणी करूनही याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे नाईलाजास्तव शेतकऱ्यांना या प्रकरणात न्यायालयात दाद मागावी लागली. त्यामुळेच खरीप २०२० व २०२१ या दोन वर्षांचा पिकविमा न्यायालयीन प्रक्रियेत रखडला. पिक विमा कंपनीकडून वरिष्ठ वकिलांच्या माध्यमातून कायद्यातील पळवाटांचा जाणीवपूर्वक वापर करून वेळकाढूपणा केला जात होता. यावर लवकरात लवकर मार्ग काढण्यासाठी आपण तत्कालीन कृषिमंत्री धनंजयजी मुंडे यांच्याकडे यासंदर्भात बैठक बोलविण्याची विनंती केली होती. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार खरीप २०२० मधील विम्यापोटी विमा कंपनीकडून २८९ कोटी रुपये येणे बाकी आहेत. तर पीकविमा योजनेतील मार्गदर्शक सूचनांचा चुकीचा अर्थ लावून विमा कंपनीने खरीप २०२१ मध्ये प्रत्यक्ष नुकसानीच्या केवळ ५० टक्के नुकसान भरपाई दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आणखी ३७४ कोटी वितरित करणे आवश्यक असल्याचे आपण या बैठकीत निदर्शनास आणून दिले होते. असेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने या प्रकरणात सीनियर कौन्सिलच्या माध्यमातून राज्य सरकारने खंबीर भूमिका घेत शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी विनंती आपण केली होती. त्यानुसार विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने या प्रकरणात सिनियर कौन्सिल देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला होता. ठाकरे सरकारने त्यापूर्वीच बैठक घेऊन योग्य कार्यवाही अनुसरली असती तर शेतकऱ्यांवर न्यायालयात जाण्याची वेळ आली नसती अशी खंतही आमदार पाटील यांनी व्यक्त केली. आता उच्च न्यायालयात सरकारची बाजू वरिष्ठ कायदेतज्ञ धोरडे-पाटील मांडणार आहेत तर याचिकाकर्त्यांच्या वतीने उच्च न्यायालयातील विख्यात विधिज्ञ व्ही. डी. साळुंके साहेबही न्यायालयात विमा कंपनीच्या विरोधात शेतकऱ्यांची बाजू लावून धरणार आहेत.

त्यामुळे या प्रकरणाचा लवकरच शेतकरी बांधवांच्या बाजूने निकाल लागेल असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### कुलस्वामिनी आश्रमशाळेत युवाजागर अभियानाचा समारोप

**जळकोट, दि.७ डिसेंबर -**

प्रत्येक गोष्टीमागे विज्ञान किंवा शास्त्र असते. त्यामुळे युवकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा, असे मत रवींद्र चिंचोळकर यांनी व्यक्त केले. हॅलो मेडिकलच्यावतीने तालुक्यातील आलियाबाद येथील कुलस्वामिनी आश्रम शाळेत युवा जागर जिल्हास्तरीय अभियानाच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हॅलो फाऊंडेशनचे विश्वस्त डॉ. क्रांती रायमाने हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा दोमकुंडवार, जि.प.चे माजी सदस्य प्रकाश चव्हाण, डॉ. सजय अंबेकर, सरपंच सुर्यकांत चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण, महिला बालकल्याणच्या प्रज्ञा बनसोडे उपस्थित होते. यावेळी विविध शाळेतील विद्यार्थ्यांचे पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी अभियानात उत्स्फूर्त सहभाग व योगदान दिलेल्या शाळा व मुख्याध्यापकांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. ज्योतिका चव्हाण, पोलीस पाटील शिवाजी चव्हाण, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष विनायक चव्हाण, ग्रा.प. सदस्य माणिक राठोड, सुभाष नाईक, शिवाजी चव्हाण, नागेंद्र गुरव, किरण कांबळे, किरण ढोले, कार्ले, कुंचगे, लंवग, चौगुले, अमित खारे, शिक्षक उपस्थित होते.



### परंडा ऊरुस कमेटीच्या अध्यक्षपदी इमरान मुजावर

**परंडा, दि.७ डिसेंबर -**

परंडा येथील हजरत ख्वॉजा बद्रोदीन चिश्ती शहीद यांचा ७०५ उर्स दि.९ जानेवारी रोजी दरवर्षी प्रमाणे साजरा करण्यात येणार आहे. उरूस कमेटीचे गठण करण्यासाठी दर्गाह येथे दि.५ नोव्हेंबर रोजी मुजावर जमातची बैठक घेऊन उर्स कमेटी जाहीर करण्यात आली. उरूस कमेटीच्या अध्यक्षपदी इम्रान बादेश मुजावर यांची तर उपाध्यक्षपदी तय्यब मुजावर यांची निवड करण्यात आली आहे. तर सेकट्ररी गौस मुजावर, सहसेक्रेटरी सलीम मुजावर, खजिनदार मलीक मुजावर, रफीक मुजावर, सल्लागार मुजाहीद मुजावर, समीर गफ्फार मुजावर यांची निवड करण्यात आली. तर सदस्यपदी चांद मुजावर, मुर्शरफ मुजावर, शारूक मुजावर, आकील मुजावर, अहेमद मुजावर, बबलू मुजावर, असलम मुजावर, सादीक मुजावर, रिजवान मुजावर यांची निवड करण्यात आली.

### नागेंद्र होसाळे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**शिराढोण, दि.७ डिसेंबर -**



प्रेरणा फाऊंडेशन ठाणे महाराष्ट्र यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन २०२४ कळंब तालुक्यातील एकुरका येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळात कार्यरत असलेले उपक्रमशील शिक्षक, विद्यार्थी गुणवत्तेसाठी वर्षाची ३६५ दिवस ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे आदर्श शिक्षक शिराढोणचे भूमिपुत्र नागेंद्र शांतीनाथ होसाळे यांना जाहीर करण्यात आला. दि.१५ डिसेंबर रोजी ठाणे येथे मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.

## ढोकीत दत्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील जागृत असे देवस्थान म्हणून ओळखले जाणारे श्री दत्तगुरु दत्त मंदिर दरवर्षीप्रमाणे ही वर्षी श्री दत्तगुरु यात्रा महोत्सव व जन्म महोत्सव सोहळा ग्रामस्थांच्या वतीने जंगी आयोजन करण्यात आले आहे. दत्त टेकडी मंदिर येथील सर्व स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. ढोकीतील सर्व शाळेने या धर्मिक कामात सहभाग घेतला आहे त्यावेळी तेरणा प्रशाला, जिल्हा परिषद कन्या शाळा, स्नेहलता देशमुख शाळा, गिरजाई इंग्लिश स्कूल, न्यू लाईफ प्रायमरी इंग्लिश स्कूल या शाळेने स्वच्छतामध्ये सहभाग नोंदवला.

तसेच विविध स्पर्धा आयोजन करण्यात आले आहे. धावण्याची स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, गाण्याची स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा, यासारख्या अनेक स्पर्धा घेण्यात येणार आहे.

# ढगाळ वातावरणामुळे हरभरा पीक संकटात; हरभऱ्यावर मर रोगाचा हल्ला



### पिकाचे संरक्षण करण्यासाठी कृषी विभागाने दिला सल्ला...

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.७ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा परिसरात मागील काही दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. याचा फटका रब्बी हंगामातील पिकांना बसत आहे. तर राज्यात काही तुरळक ठिकाणी पाऊस देखील पडला आहे. रब्बी हंगामातील सतत बदलत्या वातावरणामुळे याचा पिकावर परिणाम होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. परिणामी उत्पन्नात देखील घट होण्याची शक्यता असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

तालुक्यातील तेरखेडा परिसरात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी हरभरा पिकाची पेरणी केली आहे. पिक ही जोमदार आले आहे. मात्र सातत्याने बदलत्या वातावरणामुळे हरभरा पिकावर रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्ग हिरावून तर घेणार नाही, ना अशी भीती शेतकरी वर्गात आहे. अगदोरच अडचणीत असलेला बळीराजा अतिवृष्टीतून कसाबसा सावरत आहे. तोवर नवीन संकट उभे राहिले आहे. सध्या पिकावर रोग वाढीसाठी पोषक वातावरण असल्याने हरभऱ्यावर अळीने आक्रमक केले आहे. तसेच पिकावर बुरशीजन्य रोगांचे प्रमाण वाढले असून मर रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने हरभरा रोपांची मोठ्या प्रमाणात मर होत आहे. त्यामुळे पिकाची काळजी घेण्यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांना सल्ला दिला आहे.

### पिकाची मूळकूज होऊ नये नियंत्रण...

हरभरा पिकात मान कुजव्या रोग सुरवातीच्या काळात दिसून येतो याची लक्षणे-रोपे पिवळी पडतात व कोलमडतात. तसेच जमिनीलगत खोडावर तांबूस बुरशी दिसून येते,बीजेही पांढऱ्या रंगाचे असून खोडावर व मुळावर स्पष्टपणे दिसून येतो. शेतकऱ्यांनी उपाय म्हणून शेतातील बांध स्वच्छ ठेवावेत जेणेकरून रोगाचा प्रादुर्भाव होणार नाही. पिकावर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी मॅन्कोझेप २५ ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### घाटे अळीचा प्रादुर्भाव नियंत्रण...

ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावर मोठ्या प्रमाणात घाटाळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सुरुवातीला वाडीच्या काळात ५ टक्के निंबोळी अर्क एक मिली प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी. रासायनिक नियंत्रण किड नियंत्रणाची वेळ निश्चित करण्यासाठी नियमित पाहणी करावी. पानावर बारीक पांढरे डाग दिसून आले किंवा एक मिटर अंतरात १-२ आळ्या दिसून आल्यास खालील प्रमाणे रासायनिक फवारणी करावी क्विनॉलफॉस २५ मिली २० मिली लॅमडा सायहॅलोत्रिन ५ मिली १० मिली इमामेक्टिन बेंजोएट ५ शल ५ ग्राम क्रोलअट्रीनिलप्रोल (कोरोजन) एससी २.५ मिली. प्रमाण प्रती १० लिटर पाण्यासाठी फवारणी करावी

- **धनेश यादव,** कृषी सहायक तेरखेडा

# येळकोट येळकोट... च्या गजरात लंगर तोडण्याचा कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.७ डिसेंबर -**

प्रति वर्षाप्रमाणे कळंब येथील खंडोबा मंदिर येथे चंपाषष्ठी (सठ) निमित्त महिला, पुरुष भाविक भक्तांनी खंडेरायाच्या दर्शनासाठी व भरीत रोडगा नैवेद्य अर्पण करण्यासाठी सकाळपासून गर्दी केली होती. सकाळी ६ वाजता पूजा, अभिषेक करण्यात आला. यानंतर सकाळी ११ वाजता मंदिराचे पुजारी दिलीपराव पांचाळ यांच्या सुतारनेट कसबा पेठ येथील निवासस्थानापासून देवाचे मुखवटे असलेली पालखी मिरवणूक काढण्यात आली ही मिरवणूक खंडोबा मंदिर येथे पोहोचली.

यावेळी भाविक भक्तांनी बेल भंडारची उधळण केली. तर दुपारी ३ वाजता लंगर मिरवणुकीस सुरुवात झाली यात गजे, ढोल वाद्याच्या निनिदात धनगरी ओव्या गायन करण्यात आल्या मिरवणूक मंदिर येथे आल्यानंतर लंगरची पूजा करण्यात आली. लंगर तोडण्याचा कार्यक्रम ४.४५ वाजता संपन्न झाला लंगर तोडण्याचा मान दिलीप पांचाळ यांना मिळाला लंगर तुटताच भाविक भक्तांनी येळकोट-येळकोट जय मल्हार! सदानंदाचा चांगभल म्हणत बेल, भंडार व खोबऱ्याची उधळण केली. या उत्सव प्रसंगी खंडोबा महिला, पुरुष भक्तांची. मोठी गर्दी होती.

उत्सव यशस्वी करण्यासाठी कळंब येथील खंडोबा देवस्थानचे मानकरी पुजारी सोपानराव पांचाळ, दिलीपराव पांचाळ, शहाजीराव पांचाळ, चंद्रकांत पांचाळ, भारत पांचाळ, याचबरोबर नितीन वाडे, योगेश पांचाळ, हरिभाऊ शिंपले, उत्तम पांचाळ, सुभाष पांचाळ तसेच अविनाश पांचाळ, संजय पांचाळ, नितीन पांचाळ, समाधान पांचाळ, सचिन पांचाळ, विष्णू पांचाळ, मुकुंद देशमुख, बालाजी वाघमारे, बबलू पांचाळ, हितेंद्रसिंग राजपूत, संकेत देशमुख, सिद्धेश्वर वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

## संविधान जागृतीसाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा : मारुती बनसोडे

**जळकोट, दि.७ डिसेंबर -**

संविधानावर आपला देश चालतो. संविधान प्रत्येकाच्या हक्काची व जबाबदारीची जाणीव करुन देणारे आहे. या संविधनामुळे आज आपण सुरक्षित आहोत. याची जाणीव जागृती विद्यार्थ्यांनी करावी. असे आवाहन परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव मारुती बनसोडे यांनी केले.

जि.प. प्रशाला, नळदुर्ग येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. महापरिनिर्वाण दिन तथा घर घर संविधान अंतर्गत प्रशालेत मारुती बनसोडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात होते. यावेळी ते बोलत होते.

सोलापूर तरुण भारत

धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट नेमणे आहेत

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-२ (कमिशनवर)
तेर, ढोकी, अंबेजवळगे, कसबे तडवळे, पाडोळी (आ.), कनगरा, बेंबळी, पाटोदा, केशेगाव, वडगांव (सि.), पळसप, जागजी, पोहनेर, जुनोनी, कोंड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर शहर, तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, अपसिंगा, काक्रांबा, आरळी (बु.), किलज, चिकुंद्रा, जवळगा, वाणेगाव, वडगाव (देव), सलगरा, वागदरी, गुळहळ्ळी, निलेगाव, सिंदगाव, कुन्सावळी, सलगरा (दि.), होर्टी.

**लोहारा तालुका :** लोहारा शहर-तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, नागराळ, एकोंडी, सास्तुर, तावशीगड, सालेगाव, हराळी, जेवळी, आष्टा, भोसगा, अचलेर, फणेपुर.

**उमरगा तालुका :** शहर प्रतिनिधी, पेठसांगवी, नारंगवाडी, नाईचाकुर, समुद्राळ, बेटजगळगा, कलदेव (लिं), कोराळ, बलसुर, येणेगुर, दाळींब, सुंदरवाडी, आलुर, बेळंब, वरनाळवाडी, कदेर, औराद, खसगी, बेडगा, डिग्गी, मळगी, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, गुगळगाव, माडज, त्रिकोळी, एकूरगा, जेकेकुर, बेटजवळगा.

**कळंब तालुका :** शहर प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, मोहा, मस्सा, सापनाई, चोराखळी, माळकरंजा, निपाणी, पाडोळी (ना.), रायगव्हाण, रांजणी, शिरपूर (अ), शिराढोण, नागुलगाव, करंजकल्ला, लोहटा (पू), डिकसळ, इटकूर, बाहुला, खोदला, कन्हेरवाडी, तांदूळवाडी.

**वाशी तालुका :** तालुका प्रतिनिधी, पार्डी, कन्हेरी, सरमकुंडी, इझोरा, घाटनांदूर, चांदवड, अजनसोंडा, गिरवली, पारगाव, हातोला, फकाबादवाडी, जवळका, पारा, सेलू, पिंपळगाव (लिं), दसमेगाव, सोनारवाडी, मांडवा, सारोळा (मां), गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, ढगप्रिंप्री, आसू, कात्राबाद, सरणवाडी, हिंगणगाव (ब्रु), दहिटणा, खासापूरी, जवळा, जकेप्रिंप्री, सोनारी, रोसा, डोंजा, इनगोंदा, शेळगांव, चिंचपूर (बु), अनाळा, रोहकल, पांढरेवाडी, बावची, घारगाव.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, हाडोंग्री, वाकवड, सोनगिरी, सुकटा, देवळाली, माणकेश्वर, वांगी (ब्रु) अंतरगाव, चिंचपूर, वालवड, अंभी, अंतरवली, लांजेश्वर, निपाणी, ज्योतीबाची वाडी, ईराचीवाडी, पाथरूड, पाटसांगवी, अंतरगाव, चुंबळी, पखरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.१५ डिसेंबर २०२४ पर्यंत संपर्क साधावा.

: कार्यालय पत्ता :
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा कार्यालय,
ॲड. मसलेकर यांचे निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.
मो.नं. ९३७३४३८३५२ / ८४२१४८९७२०

# नळदुर्गच्या बसस्थानकासमोरील पोलिस चौकी कुलुप बंद

### कायमस्वरूपी पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणुक करण्याची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ डिसेंबर -**

नळदुर्ग बसस्थानकासमोर असणारी पोलिस चौकी कायम कुलुप बंद आहे. ही पोलिस चौकी पुन्हा पुर्ववत सुरु करून याठिकाणी कायमस्वरूपी दोन पोलिस कर्मचाऱ्यांची नेमणुक करावी अशी मागणी होत आहे.

नळदुर्ग हे राष्ट्रीय महामार्गावर वसलेले शहर असुन राष्ट्रीय महामार्गावरील गुटखा तस्करीसह विविध स्वरूपाची तस्करी रोखण्यासाठी नळदुर्ग बसस्थानकासमोर राष्ट्रीय महामार्गालगत गेल्या अनेक वर्षांपासुन पोलिस चौकी अस्तित्वात आहे. त्यापुर्वी निजाम राजवटीतही याच ठिकाणी निजामाने करोडगिरी नाका सुरु ठेवला होता.

निजाम राजवट संपुष्ठात आल्यानंतर याच करोडगिरी नाक्यात पोलिस चौकी सुरु करण्यात आली आहे. करोडगीरी नाक्यासाठी निजाम राजवटीत सन १९३० साली ही चौकी बांधण्यात आली होती. मात्र नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्याच्या कामात रस्त्याच्या रुंदीकरणासाठी निजाम राजवटीत बांधण्यात आलेली पोलिस चौकी पाडण्यात आली होती. त्यानंतर नव्याने याठिकाणी त्याच जागी पोलिस चौकी बांधण्यात आली आहे. या पोलिस चौकीमुळे बसस्थानकासमोरील अतिक्रमण कायम राहिले आहे. ही पोलिस चौकी याठिकाणी बांधण्यात आली नसती तर बसस्थानकासमोरील अतिक्रमण आज अस्तित्वात राहिले नसते.

या पोलिस चौकीमुळे महामार्गावरील तस्करीला आळा बसण्याबरोबरच बसस्थानकातील चोरीच्या घटना तसेच गुंडगीरीला मोठ्याप्रमाणात आळा बसला असता.

त्याचबरोबर याठिकाणी नेहमी मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी होते. या चौकीमध्ये पोलिस कर्मचारी उपस्थित असल्यानंतर ही वाहतुक कोंडीही लवकर सुटुन महामार्गावरील वाहतुक लवकर सुरळीत होऊ शकते.




त्याचबरोबर सर्वात महत्वाचे म्हणजे या पोलिस चौकीमुळे महामार्गावरील दोन नंबर धंद्याना तसेच बसस्थानकावरील गुंडगिरीला मोठ्या प्रमाणात आळा बसु शकतो.

त्यामुळे नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी नागरीकांच्या सुरक्षेसाठी असलेली ही पोलिस चौकी कायम स्वरूपी सुरु करुन या चौकीमध्ये पोलिस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी होत आहे.

धाराशिव जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांनी नळदुर्ग बसस्थानका समोरील जी की सर्वांसाठी महत्वाची असणारी पोलिस चौकी गेल्या अनेक महिन्यांपासुन कुलुपबंद का आहे याची चौकशी करुन नागरीकांच्या सुरक्षेसाठी तसेच महामार्गावरून होणाऱ्या विविध स्वरूपाच्या तस्करीला आळा घालण्यासाठी ही पोलिस चौकी सुरु करून या पोलिस चौकीमध्ये कायम स्वरूपी दोन पोलिस कर्मचाऱ्यांची नेमणुक करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी नळदुर्ग शहर वासियांनी केली आहे.

# खंडोबा यात्रेनिमित्त आनंदगाव येथे विविध सांस्कृतीक कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ डिसेंबर**

खंडोबा यात्रेनिमित्ताने आनंदगांव ता. केज. जि. बीड येथे खंडेश्वर यात्रा कमिटी अंतर्गत नाविण्यपूर्ण उपक्रम व कार्यक्रम म्हणून या वर्षी खास महिलांसाठी व युवतींसाठी विविध सांस्कृ तीक कार्यक्रम हणुमान मंदिर, येथे घेण्यात आले. आनंद गांव ता. केज. जि. बीड. ये थे दिनांक ५ – १ २ – २०२४ रोजी महिलांसाठी संगीत खुर्ची, उखाणे स्पर्धा, लिंबू चमचा, आविष्कार स्पर्धा, नकला, भारूड स्पर्धा, लंगडी स्पर्धा, इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.

युवतींसाठी ह संगीत खुर्ची, लिंबू चमचा, आविष्कार स्पर्धा, नकला, लंगडी स्पर्धा मुलींच्या दोन गटात घेणात आल्या.या सर्व सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन यात्रा कमिटीचे शिवाजी नाना गायकवाड, गोविंद गायकवाड, वैजनाथ गायकवाड, रामराव (तात्या) गायकवाड, उपसरपंच आशा शंकर शिंदे, सेवानिवृत्त प्रा. माणीक राव आनंद गांवकर, रविंद्र गायकवाड (पेंटर) व माजी प्राचार्य, जेष्ठ समाजसेवक वसुदेव ( बप्पा) गायकवाड इत्यादी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.दिवसभरात चाललेल्या सर्व सांस्कृ तीक कार्यक्रमाचे परिक्षक ( पंच) म्हणून कार्य माजी प्राचार्य वसुदेव (बप्पा) गायकवाड यांनी पार पाडले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. माणिकराव आनंदगावकर यांनी केल. तर सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन रविंद्र गायकवाड( पेंटर) यांनी केले ६० महिला व युवतीं नी या विविध स्पर्धेत सक्रीय सहभाग नोंदवला.या विविध स्पर्धेत खालील प्रमाणे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक देण्यात आले.

महिला गर
संगीत खुर्ची – जयश्री दशरथ गायकवाड – प्रथम, जान्हवी संपत गायकवाड – द्वितीय
– भाग्यश्री सुधीर गायकवाड – तृतीय.
– उखाणे स्पर्धा
– जडिता रामचंद्र नांदे – प्रथम
– अर्चना दिगांबर नांदे – द्वितीय
– मिरा शिवदास तट– तृतीय
– लिंबू – चमच्या
– माधुरी हणुमंत गायकवाड – प्रथम
– शुभांगी कुंडलीक गायकवाड – द्वितीय
– अनिता बंडू गायकवाड – तृतीय
– आविष्कार स्पधा
– कौशल्या देविदास जोगदंड – प्रथम
– शुभांगी कुंडलीक गायकवाड – हितीय
– मिरा शिवदास तट– तृतीय
– भारूड स्पर्धा
– सुदामती व्यंकट चौरे – प्रथम
– सावित्री महादेव गायकवाड – द्वितीय
लंगडी स्पर्धा
आशा बंडू गायकवाड – प्रथम
जयश्री दशरथ गायकवाड – द्वितीय
माधवी हणुमंत गायकवाड –तृतीय
युवती गट
संगीत खुर्ची
वसुधा अशोक गायकवाड – प्रथम
वैष्णवी दशरथ गायकवाड – द्वितीय
नंदीनी उत्तरेश्वर गायकवाड –तृतीय
लिंबू चमचा
उर्मीला मारुती गायकवाड – प्रथम
श्रेया शरद गायकवाड – द्वितीय
अनिता बंदन गायकवाड – तृतीय
आविष्कार स्पर्धा
वैष्णवी आबासाहेब गायकवाड – प्रथम
निकिता केदार गायकवाड – द्वितीय
उर्मीला मारुती गायकवाड – तृतीय
लंगडी स्पर्धा ( मुली – मोठा गट )
वैष्णवी आबासाहेब गायकवाड – प्रथम
श्रध्दा अशोक गायकवाड – द्वितीय
लंगडी स्पर्धा ( मुली छोटा गट)
जानकी श्रीकांत गायकवाड – प्रथम
ईश्वरी दशरथ गायकवाड
नकला स्पर्धा महिला – मुली एकत्र गट)
जयश्री दशरथ गायकवाड – प्रथम
वैष्णवी शरद गायकवाड – द्वितीय
विश्रांती विठल भोगजकर – तृतीय वरील प्रमाणे विजयी स्पर्धक घोषीत करण्यात आले.बक्षिस वितार तारीख, वेळ, ठिकाण विजयी स्पर्धकांना कळविले जाईल.

# अवकाळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई द्या

## आ.संदीप क्षीरसागरांची प्रशासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रासह बीड जिल्ह्यात शुक्रवारी (दि.६) रोजी सकाळपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. या अवकाळी पावसाने शेती पिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले आणि होत आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई देण्यासाठी कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

शुक्रवारी (दि.६) रोजी सकाळपासूनच बीड मतदारसंघातील बीड आणि शिरूर का. तालुक्यासह बीड जिल्ह्यात अवकाळी पाऊस होत आहे. या पावसाने शेतीपिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले आहे तसेच होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने अवकाळी पाऊस हे कारण नियमोचीत दाखवून झालेल्या नुकसानीची



तक्रार क्रॉप इन्शुरन्स पवर करण्यासाठी तलाठी व संबंधित यंत्रणेच्या मार्फत शेतकर्यांना कळवावे. तसेच प्रशासनाने घटनास्थळी जाऊन पंचनामे करावेत आणि शेतकरी बांधवांना सरसकट नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे केली आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक व तहसिलदार बीड आणि शिरूर का. यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

# स्वा सावरकर प्राथमिक विद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

६डिसेंबर रोजी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित ,स्वा . सावरकर प्राथमिक विद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप जोशी सर, विभाग प्रमुख श्री सचिन सानप सर, वक्त्या म्हणून श्रीमती.रूपाली गुळवेलकर यांची उपस्थिती होती.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विषयी काही विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रके तयार करण्यात आली होती त्याचे अनावरण करण्यात आले .यावेळी काही विद्यार्थ्यांनी भाषणे केली. श्रीमती रुपाली गुळवेलकर यांनी त्यांच्या जीवनातील काही प्रसंग विद्यार्थ्यांना सांगितले. अध्यक्ष समारोपात श्री प्रदीप जोशी सर यांनी संविधानचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे शेवटी विद्यार्थ्यांचे वाचन महायज्ञ घेण्यात आले. तसेच सहशिक्षक श्री.नामदेव एकशिंगे यांनी बौद्ध धर्म वंदना घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्रीमती.पल्लवी खंबायते यांनी केले.

# सेलूअंबा जवळ अपघात : अज्ञात वाहनाच्या धडकेत युवकाचा जागीच मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ डिसेंबर**

अंबाजोगाई – लातूर महामार्गावर अपघाताची घटना आज दुपारच्या सुमारास घडली आहे. अज्ञात वाहनाच्या धडकेत युवकाचा जागीच मृत्यू झाला असून अन्य एक जण गंभीर जखमी झाला आहे. जखमीला अधिक उपचारासाठी 'स्वाराती' रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सेलूअंबा टोलनाक्यावर ही अपघाताची घटना घडली आहे.

या बाबत प्राप्त माहिती अशी की, अंबाजोगाई शहरातील रमाबाई आंबेडकर चौकाजवळील वसाहतीमध्ये राहणारा रणजित बालाजी चिकटे वय – २५ हा युवक आपल्या मित्रासह एमएच – २५ एए ८८८२ या दुचाकीहून अंबाजोगाई – लातूर रस्त्यावरुन जात असताना सेलूअंबा टोलनाक्यावर त्याच्या दुचाकीला भरधाव अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. या धडकेत रणजित चिकटे याचा जागीच मृत्यू झाला तर दुचाकीवरील मित्र गंभीर जखमी झाला आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयामध्ये आनंददायी शाळा उपक्रम साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ डिसेंबर**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयात शैक्षणिक क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकत दर शनिवारी 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम सुरू ठेवला आहे. या नावीन्यपूर्ण उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या खांद्यावरचा भार हलका झाला आहे. त्याचबरोबर अभ्यासाव्यतिरिक्त नवनवीन गोष्टी शिकण्याचा उत्साह विद्यार्थ्यांमध्ये संचारल्याचे दिसून आले.

आता प्रत्येक शनिवारी स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयात पहिली ते चौथीचे वर्ग जल्लोषाने गजबजून जात आहे. आज शनिवारी शाळेत शालेय परिपाठ, बालगीत, कविता गायन, बोधकथा, कवायतीचे खडे व बैठे हात, पायाचा रूमाल सोडवणे, कोंबड्यांची झुंज असे मैदानी खेळ घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी अशा उपक्रमांना मुख्याध्यापक श्री.प्रदिप जोशी सर हे प्रोत्साहन देत आहेत. शाळेत विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी, अभ्यासाची गोडी लागावी आणि आठवड्याभराच्या शारिरिक, मानसिक सुदृढतेसाठी अनेक उपक्रम राबवत आहेत.





# अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील बनावट औषध प्रकरणी तपास सीबीआय मार्फत व्हावा–डॉ राजेश इंगोले

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ डिसेंबर**

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील रुग्णांना देण्यात आलेली औषधी बनावट असल्याचे तपासणी अहवालात सिद्ध झाले आहे. याप्रकरणी अन्न औषध निरीक्षक यांच्या फिर्यादीवरून चार औषध कंपन्यांवर गुन्हेही दाखल झाले आहेत. याप्रकरणी सीबीआय चौकशीची मागणी अंबेजोगाईचे माजी शिक्षण सभापती डॉ. राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय आधिकारी कार्यालयामार्फत केली आहे.

या घटने बाबत बोलताना डॉ इंगोले यांनी हे प्रकरण वरकरणी वाटते तेवढे सोपे नाही. या कंपन्यांनी महाराष्ट्रातील इतर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या ठिकाणीही याच प्रकारची बनावट औषधी वितरित केली असल्याची शक्यता आहे. याप्रकरणी वैद्यकीय संचालक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांचाही सहभाग असल्याची शक्यता नाकारता येत नाही कारण ही औषधी वितरित करण्याची शासकीय मान्यता ही याच संचालक कार्यालयाकडूनच दिली जाते.



या लोकांची बनावट औषधी देण्याची हिम्मत होतेच कशी हा सवाल करत सदरील गंभीर प्रकार हा महाराष्ट्रातील सर्व शासकीय रुग्णालयात घडल्या असण्याची शक्यता आहे. हा प्रकार म्हणजे सर्वसामान्य रुग्णांच्या जीविताशी खेळ करण्याचा गंभीर प्रकार आहे.

तरी या प्रकरणाची पाळेमुळे उकरून याचा निष्पक्षपाती तपास होणे गरजेचे आहे. तसेच या आरोपींविरुद्ध या कंपन्यांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही होणे गरजेचे आहे. जेणेकरून भविष्यामध्ये इतर कंपन्या असा प्रकार करण्याचे धाडस करणार नाही यासाठी हे प्रकरण सीबीआय कडे देऊन सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा ही अपेक्षा सर्वसामान्य जनतेची आहे. या प्रकरणात कुणालाही पाठीशी घालण्यात येवु नये त्यासाठी या घटनेचा पाठपुरावा आपण शेवटपर्यंत करणार असल्याची माहितीही डॉ राजेश इंगोले यांनी दिली आहे.

# तरुणावर तलवारीने प्राणघातक हल्ला केल्या प्रकरणी पोखरी येथील तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ डिसेंबर**

जुन्या वादावर बोलून समझोता करण्यासाठी गेलेल्या तरुणावर तिघा भावांनी तलवार, लाठ्या–काठ्यांनी प्राणघातक हल्ला चढविला. याप्रकरणी तिघांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला.

विनोद वसंत ढवारे (वय ३०, रा. पोखरी, ता. अंबाजोगाई) असे हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. विनोदच्या फिर्यादीनुसार त्याच्या गावातील सुरज संतोष वाघमारे याने विनोदचे भाऊ महादेव, शंभू आणि आकाश यांच्या विरोधात अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली होती. सदर वाद चर्चेतून सामोपचाराने मिटविण्यासाठी विनोद, विलास कुराडे, विनोद बलवंत आणि भाऊ आकाश हे बुधवारी (दि.०४) रात्री ८ वाजता सुरज वाघमारे याच्या घराकडे गेले. त्या ठिकाणी वाद मिटविण्याबाबत चर्चा सुरु असताना सुरज घरात गेला आणि लोखंडी तलवार आणून त्याने विनोदवर वार केला. तर त्याचे भाऊ संतोष आणि शिवम यांनी विनोदला लाकडी दांड्याने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी विनोद सोबत आलेल्या ग्रामस्थांनी त्याला हल्लेखोरांच्या तावडीतून वाचविले आणि उपचारासाठी स्वाराती रुग्णालयात दाखल केले. सदर फिर्यादीवरून सुरज संतोष वाघमारे, मनोज संतोष वाघमारे आणि शिवम संतोष वाघमारे या तिघांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. गुन्हा दाखल होताच सुरज वाघमारे यास पोलिसांनी अटक केली असून उर्वरित दोघे फरार आहेत. पुढील तपास एपीआय रंगनाथ जगताप करत आहेत.

# एमकेसीएलच्या वतीने परळी वैजनाथच्या विजय कॉम्प्युटर्स चा पुरस्काराने गौरव




**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.७ डिसेंबर**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) च्या वतीने बीड जिल्ह्यातून चघउड विविध क्लिक कोर्स चे २०२४ मध्ये सर्वात जास्त प्रवेश नोंदविले या साठी छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या वार्षिक सभेत परळी वैजनाथ येथील अजयकुमार सावजी यांच्या विजय कॉम्प्युटर्स ला जिल्ह्यातन द्रितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

एमकेसीएलच्या व्यवस्थापकीय संचालिका वीणा कामथ यांचे हस्ते विजय कॉम्प्युटर्स चे संचालक अजयकुमार सावजी यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले. गेल्या २० वर्ष्या पासून परळी वैजनाथ परिसरातील हजारो विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम घडविण्याचे काम सातत्याने विजय कॉम्प्युटर्स च्या माध्यमातून केले जाते. या मुळे दरवर्षी एमकेसीएल कडून सातत्याने विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. यावेळी महामंडळाचे अमित रानडे, अतुल पतौडी, दीपक पाटेकर विभागीय समन्वयक बालकिशन बलदवा, गजानन कुलथे लोकल लीड सेंटरचे विठ्ठल पांचाळ हे उपस्थित होते.या मिळालेल्या पुरस्काराबद्दल अजयकुमार सावजी यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# पंकजाताई मुंडेचे हात बळकट करण्यासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नोंदणी करणार –नवनाथ शिराळे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.७ डिसेंबर**

लोकनेत्या भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांचे हात पक्षात बळकट करण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व मतदार संघात मोठ्या प्रमाणात भाजप सदस्य नोंदणी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन जिल्हा संयोजक नवनाथ आण्णा शिराळे यांनी बोलताना केले.

गेवराई तालुका भाजपच्या सदस्य नोंदणी अभियान बैठकीत बोलताना शिराळे म्हणाले की, जगात सर्वाधिक सदस्य असलेले राजकीय संघटना ही भारतीय जनता पक्ष आहे या सघटनेची गल्ली ते दिल्ली सत्ता असुन कार्यकर्त्यांनी जनसेवेचा वसा घेऊन लोकांची कामे करावीत लोकनेत्या पंकजाताई मंत्री होणार आहेत त्यामुळे त्यांचे हात पक्षात बळकट करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने पक्ष सदस्य नोंदणी मधे सहभागी होऊन जास्तीत जास्त लोकांना सदस्य करुन घ्यावे असे आवाहन केले. जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचे नेतृत्वात लवकरच प्रत्येक तालुक्यात पक्षाचे कार्यालय सुरु होणार असुन



त्यामघे जनतेचे प्रश्न मार्गी लागतील असे यावेळी समन्वयक श्रीकांत सानप यांनी सांगितले.

या बैठकीस तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे,मा जिप सदस्य सुरेश हत्ते,जिल्हा सहसंयोजक उद्धव रासकर,मा पंस सभापती दीपक सुरवसे,तालुका संयोजक ईश्वर पवार, ज्ञानेश्वर खाडे,महादेव धोंडरे,संजय काळे,पं स सदस्य अशोक शिंदे,बाळासाहेब सानप,राजेश पवार, राहुल राका, श्रीराम गव्हाणे, मच्छिंद्र यादव, सुशील भोपळे,रामचंद्र कोळेकर,रंजीत शर्मा,बाळासाहेब लोंढे, प्रवीण करांडे,डॉ शेख इब्राहिम,मगन चव्हाण अनिल रत्नपारखे, सचिन दाभाडे,रवी खरसाडे,भीमाशंकर मिटकरी,संतोष थोरात,बाळू जोशी,विवेक कुलकर्णी,सुधीर शर्मा,गणेश देवा, अंकुश राठोड, शहादेव दादाराव सर, बाबासाहेब,घोडके प्रदीप उगलमुगले,नारायण गाडे,संजय भाऊ काळे, दिलीप चव्हाण, संदीप आंधळे, भागवत गव्हाणे, पुरुषोत्तम जगताप,पप्पू खेडकर, मुकुंद जगताप,ऋषिकेश पांचाळ, शेख दिलावर,सुनील नाटकर,शेख सलीम, कृष्णा बारगजे, शरद राधाकिसन मोटे, बाळासाहेब लोणकर,पांडुरंग जाधव, चंद्रसेन उबाळे,अंकुश कदम, गणेश सातपुते,दयानंद गवारे,विकास गायकवाड,नवनाथ साबळे, बाबुराव शिंदे,तुकाराम राजकवर, गोविंदा अबदर, फुलचंद पवार ,एकनाथ माने, सुंदर महाराज राठोड, बाळासाहेब पांढरे, सतीश पांढरे,आत्माराम पांढरे, महादेव खरात, विष्णु महाराज जगताप, कारभारी कोकरे,व इतर असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### मुदखेड शहरात विविध ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**मुदखेड**-भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी शहरातील विविध ठिकाणी अभिवादन करण्यात आले. भन्ते गगन बोधी यांच्या उपस्थितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी महापरिनिर्वान दिन कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानव परमपुज्य भारतरत्न विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैल चित्रास पुष्पहार अर्पण करुन सामूहिक रित्या त्रिशरण पंचशील ग्रहण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी उपस्थित असलेले भन्ते गगन बोधी, पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, उपा.डि.जी.चौदंते,नागोराव लोखंडे, एकनाथ तारु, नारायण गुरुजी चौदंते, मोहन सावते, माधव ढगारे, पत्रकार संजय कोलते, सूर्यकांत चौदंते, प्रवीण गायकवाड, कैलास गोडसे, शंकर राठी, गंगाधर डांगे, संजय आऊलवार, चांदू बोकेफोड, प्रभाकर पांचाळ, मुन्ना चांडक, दादाराव चौदंते, अमोल चौदंते, ऋषिकेश चौदंते, सुभाष चौदंते, अविनाश चौदंते, मुजिब पठाण, बालाजी गऊळकर, सचिन माने, मधुकर दवणे, पत्रकार साहेबराव हौसरे, यासह विविध पक्षातील पदाधिकारी व कायेकर्ते बौद्ध उपासकांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी शहरातील भिमनगर, नविआबादी, अशोका नगर, लूंबिनी नगर, समता नगर, रेल्वे स्टेशन कॉलोनी, येथील बौद्ध उपासक, उपासिका बालक, बालिका, आणि पत्रकार बांधव यांची उपस्थिती होती.

### अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**नांदेड**-येथील डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या ठिकाणी आणि नवीन नांदेड सिडको येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या ठिकाणी अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी नांदेड येथील डॉ. अण्णा भाऊ साठे ह्यांच्या पुतळ्याच्या ठिकाणी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी वाय.जी. वाघमारे मरशिवनीकर, महाराष्ट्र रत्न पी.बी. वाघमारे कोलंबीकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकर स्वामी दाताळकर, ग्रामविकास अधिकारी उत्तमरावजी भिसे, पी.जी. वाकळे, एस.एस. गायकवाड आणि मुख्याध्यापक सदाशिव एनवळ आदींची उपस्थिती होती, तर नवीन नांदेड सिडको येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या ठिकाणी अभिवादन प्रसंगी अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या जिल्हाध्यक्षा अरूणाताई बाबळे, पंचफुलाबाई घोसले राऊतखेडकर, प्रयागबाई ढगे, बबनराव बुचडे, केरबाजीराव बाबळे आणि संदीप दादा गायकवाड ह्यांची उपस्थिती होती.

### आदमपूर ग्रामपंचायतमध्ये महापरिनिर्वाण दिन



**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर ग्रामपंचायत येथे दि.०६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त सामुहिक अभिवादन करण्यात आले. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांसह डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार,पुष्पांजली अर्पण करीत वंदन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळ्यासही गावातील जयंती मंळळ अध्यक्ष,सदस्य आजी माजी पदाधिकाऱ्यांकडून पुष्पांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी ग्रामपंचायत विद्यमान पदाधिकारी, कर्मचारीवर्ग, प्रतिनिधी, पत्रकार, कंत्राटदार, व्यापारी, तालुका, जिल्हा, विविध संघटना आजी माजी पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, गावकरी यांची उपस्थिती होती.

### जाहिर प्रगटन

**लिहून देणार**:दत्तात्रय धोंडीबा रा.भोकर(खाता क्रमांक २६८)यांचे गट/सर्वे क्रमांक ४८७ लागवडीयोग्य क्षेत्र १.९१५३ हे.आर.चौ.मी. पैकी लागवडी योग्य क्षेत्र ०.०१०८हे. आर.चौ.मी. आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी.हे त्यांनी

**लिहून घेणार**:अश्विनी धनराज पवार(खाता क्रमांक ९५९८)गट/ सर्वे क्रमांक ४८७ लागवडी योग्य क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर यांचेकडील खरेदीदस्त क्रमांक ४५३दि.३१/०३/२०१७ प्रमाणे रक्कम रुपये १,६०,००० घेवून खरेदी दिली सबब खरेदी घेणाऱ्याचे नाव गाव नमूना ७/१२ वर दाखल केले.

संमती देणारे खातेदार:शामराव भाऊराव सूर्यवंशी दस्त क्रमांक ६०४ दि.२०/०४/१९९६ प्रमाणे रक्कम रुपये २२००० उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तूम्हास फर्मावित आहे.तलाठी भोकर यांच्याकडे उक्त १५ दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे असे ग्रहित धरले जाईल. कृपया याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तलाठी साझा भोकर**
**ता.भोकर जि.नांदेड**

## सिडको येथील ऑइल मिल दुर्घटना
# गंभीर जखमी झालेल्या सख्ख्या भावांचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ डिसेंबर**

सिडको येथील तिरूमला ऑइल मिलमध्ये स्फोट होऊन लागलेल्या आगीत जखमी झालेल्या दोन सख्ख्या भावाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर वडिलांची मृत्यूशी झुंज सुरु आहे. १ डिसेंबर रोजी तिरूमला ऑइल मिलमध्ये ही घटना घडली होती. हर्षद कोत्तावार आणि विनोद कोत्तावार असं मयताचे नाव आहे. मुलाच्या मृत्यूने कोत्तावार कुटुंबियांवर दुःखाच डोंगर कोसळलं आहे. या घटनेची पंचक्रोषीमध्ये चर्चा सुरू असून एकाच घरातील दोन भावांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



रविवार, १ डिसेंबर रोजी भास्कर कोत्तावार, हर्षद कोत्तावार, विनोद कोत्तावार यांच्या सह सुनील बंडेवार आणि सुधाकर बंडेवार हे मिल मध्ये काम करत होते. दुपारी १२ वाजताच्या सुमारास ऑईल मिलमध्ये अचानक स्फोट होऊन आगीचा भडका उडाला. आगीने रौद्र रूप धारण केले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ मिलकडे धाव घेऊन अग्निशमन दलाला कळविले. अग्निशामक दलाच्या पथकांनी तीन गाड्यांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवले. पण या आगीच्या घटनेत पाच ही जण होरपळले गेले. त्यांना तात्काळ बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान घटनेत अति गंभीर असलेल्या दोघांना हैद्राबाद येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दुर्दैवाने हर्षद कोत्तावार याचा बुधवारी आणि विनोद कोत्तावार याचा गुरुवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. भास्कर कोत्तावार यांच्यासह इतर दोघांवर उपचार सुरु आहे. दोन्ही मुलाच्या पार्थिवावर एका पाठोपाठ अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान दोन्ही मुलांच्या निधनाने कोत्तावार कुटुंबियांवर दुःखाच डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतर सिडको-हडको भागात शोककळा पसरली आहे. कोत्तावार कुटुंबियांना दोन मुलांच्या जाण्याने माणसिक धक्का बसला आहे. नेमका स्फोट कशामुळे झाला याचा तपास केला जात आहे.

## सुसंस्कारशील पिढी घडविण्यासाठी 'शिक्षणयोगी' गौरवग्रंथ प्रेरणादायी : डॉ. मनोहर चासकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ डिसेंबर**

शिक्षणक्षेत्रात मागील ३७ वर्षांपासून अनेक उपयुक्त ठरतील असे शैक्षणिक उपक्रम राबविलेल्या राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक पंडित पवळे या व्यक्तिमत्त्वावरील 'शिक्षणयोगी' गौरवग्रंथ सुस्कारीत पिढी घडविण्यासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांनी केले. ते नांदेड येथील हॉटेल ताजपाटील सभागृहात 'शिक्षणयोगी' गौरवग्रंथ प्रकाशनप्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार होते. यावेळी नांदेड परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, मा.आ. मोहनअण्णा हंबर्डे, अॅड. डी. के. हांडे, माजी सनदी अधिकारी एकनाथ मोरे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत, गोदातीरचे संपादक केशव घोणसे पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम, पूर्व अति.मु.अ. शिवाजीराव कपाळे, पूर्व शिक्षणाधिकारी शिवाजीराव खुडे, इंजि. शे.रा. पाटील, मधुकरराव देशमुख, कल्पना डोंगळीकर आदींची विशेष उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण यांनी संपादन आणि सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. जगदीश कदम यांनी पाठराखण केलेला ५७ लेखांचा गौरवग्रंथ निर्मल प्रकाशनने सिद्ध केला आहे.



**देगलूर-येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.**

## शंभर दिवसीय क्षयरोग मोहिमेचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ डिसेंबर**

संपूर्ण भारतात आज रोजी निवडक ३४७ जिल्ह्यांमध्ये १०० दिवसीय क्षयरोग मोहिमेस सुरुवात झाली आहे. यात नांदेड जिल्ह्याचा समावेश आहे. नांदेड जिल्ह्यातील या कार्यक्रमाचा जिल्हास्तरीय उद्घाटन सोहळा प्राथमिक आरोग्य केंद्र तुप्पा येथे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला . यावेळी सरपंच मंदाकिनी यन्नावार उपसरपंच दत्ता कदम, पोलीस पाटील वसंत पल्लेवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या मोहिमेची सुरुवात ७ डिसेंबर २०२४ पासून झालेली असून २४ मार्च २०२५ रोजी याची सांगता होणार आहे. या मोहिमेच्या माध्यमातून जास्तीत जास्त क्षय रुग्ण शोधून त्यांना उपचारावर आणणे, क्षय रुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, नवीन क्षय रुग्णांचे प्रमाण कमी करणे, वंचित व अति जोखमीच्या घटकापर्यंत पोहोचून आरोग्य सेवा पुरविणे, क्षयरोगाविषयी जनजागृती करणे समाजातील क्षयरोगा विषयी असलेल्या गैरसमजुती दूर करणे आदी असून शासकीय निमशासकीय स्वयंसेवी संस्था यांच्या मदतीने ही मोहीम हाती घेण्यात आलेली आहे. उद्घाटनाप्रसंगी क्षय रुग्णांच्या संपर्कातील व प्राथमिक आरोग्य केंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी आशा व एएनएम यांनीही सी वाय टेस्ट ची तपासणी करून घेऊन प्रत्यक्ष रूपाने कार्यक्रमास सुरुवात केली. या कार्यक्रमास जिल्हा क्षयरोग केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. गणपत मिरदुडे, डॉ.अमृत चव्हाण डॉ ज्ञानोबा जोगदंड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ प्रवीण मुंडे वैद्यकीय अधिकारी डॉ राठोड, डॉ मुदीराज, डॉ गुडपे, डॉ खाजा मोईनुद्दीन आणि आरोग्य कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शंभर दिवसीय क्षयरोग मोहिमेत सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतीश कोपुरवाड यांनी केले आहे.

# 'वेलींच्या गाठी'ने उलगडले बदलत्या नात्यांचे गुंतागुंतीचे प्रश्न

## कुसुम नाट्यगृहात राज्यनाट्य स्पर्धेत अंतिम नाटकाचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ डिसेंबर**

६३ व्या महाराष्ट्र राज्य मराठी नाट्य महोत्सवांतर्गत 'वेलींच्या गाठी' हे मेधा मराठे लिखित आणि गोविंद जोशी दिग्दर्शित नाटक बदलत्या नातेसंबंधांचे, प्रेमाचे, विवाह संस्थेचे आणि कुटुंब व्यवस्थेचे सूक्ष्म दर्शन घडवते. शुक्रवारी (ता.७) कुसुम सभागृहात या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले.



नाटकाची कथा सई आणि सलमा या दोन विवाहित महिलांच्या जीवनाभोवती फिरते. सई (रुपाली वडजकर) ही आय. टी. अभियंता असून, सलमा (राजेश्वरी जोशी) प्राध्यापक आहे. कौटुंबिक जीवनातील अस्वस्थता आणि अपेक्षांची पूर्तता न होण्यामुळे त्यांचे आयुष्य गुंतागुंतीच्या परिस्थितीत अडकते. त्यांचे पती अजय (राहुल वाळवेकर) आणि अख्तर (डॉ. शिवानंद बासरे), बाबा (डॉ. राजेंद्र गोणारकर), अब्बा (गोविंद जोशी), मित्र नवीन (विवेक भोगले) या पात्रांच्या माध्यमातून नात्यांमधील प्रेम, संशय, आणि ओढ यांचा प्रवास उलगडला जातो. नाटकात दाखवले गेलेले संवाद, पात्रांचे भावनिक आव्हान, आणि सामाजिक चौकटींमधून स्वातंत्र्य शोधण्याचा त्यांचा संघर्ष प्रेक्षकांना अंतर्मुख करणारा ठरतो. 'वेलींच्या गाठी' या नाटकाने नातेसंबंधांमधील नैतिकतेच्या सीमारेषा किती पुसट होत आहेत, यावर प्रकाश टाकत प्रेम आणि कुटुंब संस्थेतील विसंगती अधोरेखित केली आहे.हे नाटक केवळ नात्यांची कथा नसून, समाजाच्या बदलत्या मानसिकतेचे प्रतिबिंब आहे. प्रेक्षकांना प्रेम, नैतिकता, आणि व्यक्तीच्या वैयक्तिक समाधानाविषयी विचार करायला लावणारे हे नाटक ठरले.

या नाटकातील सई आणि सलमा यांच्या प्रमुख भूमिका अनुक्रमे रुपाली वडजकर आणि राजेश्वरी जोशी यांनी साकारल्या. अजयच्या भूमिकेत राहुल वाळवेकर, अख्तरच्या भूमिकेत डॉ. शिवानंद बासरे, अब्बांच्या भूमिकेत गोविंद जोशी, नवीनच्या भूमिकेत विवेक भोगले, तर बाबाच्या भूमिकेत डॉ. राजेंद्र गोणारकर झळकले. डॉ. अंकल या भूमिकेत दीपक बीडकर यांनी अभिनय केला. तांत्रिक बाजूंसाठी नेपथ्याची जबाबदारी अभिनव जोशी यांनी सांभाळली, प्रकाश योजना अशोक माढेकर यांनी केली, पार्श्वसंगीत कमलेश सारंगधर यांचे होते, रंगभूषा अर्चना जिरवनकर यांनी केली, तर वेशभूषा वैशाली गुंजकर यांनी सजवली. 'वेलींच्या गाठी' या नाटकाला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे सुरु असलेली ही मराठी राज्य नाट्य स्पर्धा स्पर्धा अप्पर मुख्य सचिव श्री.विकास खारगे, संचालक विभीषण चवरे, सह-संचालक श्रीराम पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून या स्पर्धे साठी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक म्हणून किरण चौधरी आणि त्यांची टीम परिश्रम घेत आहेत.

## आज जीवनगौरव पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ डिसेंबर**

ह.भ.प. भाऊसाहेब महाराज पावडेवाडीकर प्रतिष्ठान पावडेवाडी तर्फे राज्यस्तरीय महिला पुरस्कार दरवर्षी स्वर्गीय सौ. सुलोचनाबाई भाऊराव देशमुख पावडेवाडीकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जातो. यावर्षी नांदेड येथील जुन्या पिढीतील वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या डॉ. ज्योती दासराव देशमुख यांना पुरस्कार रविवार, दि. ८ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता नरहर कुरूंदकर सभागृह, पीपल्स महाविद्यालय, नांदेड येथे देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड परीक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप राहणार आहेत. डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण संचालक प्रा.डॉ. सूर्यप्रकाश जाधव व प्राचार्य बबन पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन या प्रतिष्ठानचे सचिव विश्वजीत पावडे यांनी केले आहे.



**लोहा-चंपाषष्टी निमित्त शहरातून खंडोबाच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी अनक भाविकांनी पालखीचे मनोभावे दर्शन घेतले. (छाया- विनोद महाबळे)**

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त ८७ रक्तदात्त्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर ,दि. ०७ डिसेंबर**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देगलूर येथील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा येथे वंचित बहुजन आघाडी व सुशिलकुमार देगलूरकर मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माजी नगरसेवक तथा पँथर फोर्स संघटना प्रमुख सुशीलकुमार देगलूरकर यांनी १०



वर्षापूर्वी महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबिराची सुरुवात केली होती. त्यानंतर आजतागायत हे रक्तदान शिबिराचा उपक्रम सुरू आहे. पहिल्या वर्षापासून ते आजपर्यंत नेहमी सातत्याने शेकडो युवक मोठया प्रमाणात व उत्स्फूर्ततेने रक्तदान करतात याही वर्षी या रक्तदान शिबिरात ८७ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी माजी नगरसेवक सुशिलकुमार देगलूरकर, तहसीलदार भारत सूर्यवंशी, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, निवृत्ती कांबळे, डॉ. विनायक मुंडे, मच्छिन्द्र गवाले, डॉ.उत्तम इंगोले, संजय कांबळे, रमेश भायेगावकर, अशोक देसाई दरेगावकर, अशोक कांबळे, मन्मथ परबते, आदी मान्यवर उपस्थित होते. महारक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी स्वप्नील देगलूरकर, प्रथ्वीराज वाघमारे, अभिनंदन खानापूरकर, अभिजित वाघमारे, निवृत्ती दिंडे, रत्नदिप सूर्यवंशी, कमलाकांत नरबागे, नितीन वाघमारे, नागेश लोहबंदे, चंद्रकांत मरखेलकर, प्रशांत माळे, सुरेश बकरे, सुरज वाघमारे, गौतम वाघमारे, अंतेश्वर बोने, आर्यन धनवे, निशिकांत कांबळे, प्रवीण कांबळे, आकाश वाघमारे, माधव कांबळे, सुनील शेरे, संजय कांबळे, अक्षय टेकाळे, डॉ.मारोती कांबळे, अभिजित कांबळे, विठ्ठल सुंडगीकर, यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## आ. प्रतापराव चिखलीकर यांनी घेतली शपथ

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०७ डिसेंबर**



लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आज विधानसभेच्या विशेष अधिवेशनात पहिल्याच दिवशी आमदारकीची शपथ घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शपथविधी पार पडल्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी विधानसभेतील सर्व नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी आजपासून सुरू झाला आहे. यासाठी विधानसभेचे विशेष तीन दिवशीय अधिवेशन बोलावण्यात आले आहे. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ.प्रतापराव चिखलीकर यांनी आज आमदारकीची आणि गोपनीयतेची शपथ घेतली. मी प्रताप वत्सलाबाई गोविंदराव पाटील चिखलीकर विधानसभेचा आमदार म्हणून निवडून आलो असल्याने , कायद्याद्वारे स्थापित झालेल्या संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा आणि निष्ठा बाळगेन. भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता उन्नत राखीन. आता मी जे कर्तव्य हाती घेणार आहे ते निष्ठापर्वक पार पाडेन अशी शपथ त्यांनी ग्रहण केली.

# हदगाव तालुक्यात वन्य प्राण्यांचा धुमाकूळ; वन विभागाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव ,दि. ०७ डिसेंबर**

हदगाव तालुक्यातील वन विभागाच्या परिक्षेत्रातील प्रत्येक विभागात संबंधित शेतकरी बांधवांना वन्यप्राण्यांचा १२ महिने अतोनात त्रास व पिकांचे नुकसान होत असून त्यातच कार्यालयात बसून शासनाचे लाखो रुपयांचे पगार घेणारे वन विभागातील अडेलतट्टू स्वभावाचे असणारे कर्मचारीमुळे व वरून वन्यप्राण्यांचा ज्यात रानडुक्कर, हरीण, माकड, रोही यांच्या धुमाकळीमुळे तालुक्यातील शेतकरी बांधव अक्षरशः मेटाकुटीला आला असून सदर बाबीकडे वनविभागाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचा सरळ आरोप होत असून याकडे नवनिर्वाचित खासदार व आमदार यांनी या मुजोर व कर्तव्यात कसूर करणाऱ्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवरती लक्ष द्यावे अशी मागणी आता शेतकरी बांधवांच्या माध्यमातून प्रकर्षाने समोर येत आहे.

रब्बी हंगामात तालुक्यातील शेतकऱ्यांनी हरभरा, गहू, रब्बी ज्वारी, तूर या सह आदी पिकांची पेरणी केली आहे.



मागचे दोन दिवसापासून ढगाळ वातावरण व सकाळच्या धुकं पडल्याने रब्बी पिकांवरती वेगवेगळ्या रोगाचा प्रादुर्भाव झाला असून त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी पदरमोड. उधारी करून महागडे औषधाची फवारणी करावी लागत आहे. अशातच प्रत्येक शेतात वन्य प्राण्यांनी धुमाकूळ घातल्याने पिकांचे अतोनात नुकसान होत आहेत. प्रस्तुत प्रतिनिधीने तालुक्यातील वेगवेगळ्या भागातील शेतकरी बांधवांशी संपर्क केला असता तर आश्चर्यजनक माहिती मिळाली ती अशी की, वन विभागाचे कर्मचारी कोणते आहेत तेच आम्हाला आतापर्यंत माहित नाही तर काहींनी आम्हाला १२ महिनेही या वन्य प्राण्यांचा त्रास असून आतापर्यंत मार्गदर्शन तर सोडा साधी दमडीही नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे सांगितले असून लोकप्रतिनिधींनी यावर लक्ष देऊन वन विभागाचे कर्मचाऱ्यांना जमिनीवर उतरवुन शक्य त्या ठिकाणी वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा व शेतकरी बांधवांना काय तरी नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी होत आहे.

# आदिवासी आमदार म्हणुन केराम यांना मंत्रीपद द्यावे

## आदिवासी समाजाचे युवानेते, ग्रा.पं. सदस्य दत्ता भिसे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट ,दि. ०७ डिसेंबर**

विकासात्मक कार्याच्या जोरावर किनवट विधानसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा विजयी ठरलेले आ. भीमराव केराम यांना संभाव्य मंत्रिमंडळात संधी द्यावी अशी मागणी आदिवासी समाज बांधवांच्या वतीने गोकुंदा ग्रामपंचायतचे सदस्य दत्ता भिसे यांनी केली आहे.



नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत आमदार भीमराव केराम यांनी महायुतीकडून दुसऱ्यांदा ऐतिहासिक विजय प्राप्त केला आहे भीमराव केराम यांचा या मतदारसंघातील हा तिसरा विजय असून अनारक्षित जागेवर सलग तीन वेळा विजयी होणार ते आदिवासी समाजातील एकमेव आमदार ठरले आहेत. मागील पाच वर्षाच्या आमदारकीच्या काळात भीमराव केराम यांनी करोडो रुपयाची विकास कामे करून किनवट माहूर तालुक्याचा चेहरा मोहरा बदलला आहे.रस्ते शेती सिंचन सभामंडप यासह वाडी तांड्यात त्यांनी अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

किनवट व माहूर हे दोन्ही तालुके आदिवासीबहुल असल्यामुळे या भागातील शोषित वंचित व दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमदार भीमराव केराम यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी किनवट तालुक्यातील आदिवासी समाज बांधवांच्या वतीने गोकुंदा ग्रामपंचायतचे सदस्य दत्ता भिसे यांनी केली आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## राजमाता जिजामाता संकुलात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.७ डिसेंबर -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात उपप्राचार्य कविता केंद्रे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.




यावेळी संस्थाध्यक्षा के.ए. जायभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, राजेंद्र जायेभाये, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी.आर. मुंडे, समन्वयक अश्विनी केंद्रे, राजीव मुंढे, वैशाली केंद्रे, राणी केंद्रे, पर्यवेक्षक सुनीता जवळे, मदन धुमाळ यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी उपप्राचार्य कविता केंद्रे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

## संक्षिप्त वृत्त...



### दैठणा येथे नागोबा जागृत देवस्थानचा परू उत्सव साजरा

**दैठणा, दि.७ डिसेंबर -**

दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) येथे गावच्या शेत शिवारात असलेले जाज्वल असे नागोबा देवस्थान आहे आणि या देवस्थानचा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी परू हा उत्सव अतिशय थाटामाटात साजरा करण्यात आला. सकाळी दहा वाजता सुशेन गुरुजी यांच्याकडून नागोबा वेदाचार्य महेश देव यांच्या हस्ते मंत्रोच्चाराने अभिषेक करण्यात आला. यानंतर गावातील अनेक नागोबा देवस्थानच्या भाविक भक्तांना निमंत्रित करण्यात आले होते. त्याप्रमाणे महाप्रसाद घेण्यासाठी गावातील अनेक मान्यवर सर्वसामान्य नागरिक शेतकरी महिला वर्ग मोठ्या संख्येने या ठिकाणी महाप्रसाद घेण्यासाठी प्रत्येकाकडून आवर्जून उपस्थिती लावण्यात आली. कार्यक्रमास जिल्हा मध्यवर्तीचे संचालक व्यंकटराव बिरादार, एम.एस. बिरादार, धनराज बिरादार, सुशेन गुरुजी, सतीश बिरादार, भगवान बिरादार, प्रशांत नाटके, व्यंकट बिरादार, तानाजी बिरादार व समस्त बिरादार परिवारातील सदस्य उपस्थित होते.



### येरोळ येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**शिरूर अनंतपाळ, दि.७ डिसेंबर -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथील रमाईनगर जवळील समाज मंदीर येथे दि.६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन येरोळ गावचे सरपंच सुकुमार लोकरे यांनी पुष्प अर्पण करुन करत त्यांना अभिवादन केले. तसेच तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्प अर्पण करत उपसरपंच सतीश शिंदाळकर यांनी अभिवादन केले. व त्यांच्याच हस्ते ध्वजरोहन करुन ध्वजाला सामूहिक मानवंदना देऊन या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी सरपंच सुकुमार लोकरे, उपसरपंच सतीश शिंदाळकर, सोसायटीचे चेअरमन अतुल पाटील गंभीरे, प्रकाश बनसोडे, अमर माडजे, बस्वराज शिंदाळकर, अब्दुल मुजेवार, भिवाजी लोकरे, बाबुराव वाघमारे, विनोद लोंढे, तसेच होमगार्ड स.स. दासरे तसेच सर्व गावकरी उपस्थित होते.



### बसपुर येथे ड्रोनद्वारे तुरीवर फवारणी; कृषी विभागाचे मार्गदर्शन

**निलंगा, दि.७ डिसेंबर -**

निलंगा तालुक्यातील बसपुर येथील उत्कृष्ट शेतकरी बालाजी बाबा चव्हाण यांच्या शेतामध्ये ड्रोनच्या साहाय्याने आज तूर या पिकावर औषध फवारणी करण्यात आली. शेतकरी पारंपारिक पद्धतीने नेहमीच आपली शेती करत आहे. मात्र एक पाऊल पुढे टाकून बालाजी चव्हाण यांनी नवीन तंत्रज्ञान वापरून आज कृषी सहाय्यक धर्मेंद्र क्षीरसागर यांच्या व परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये तूर या पिकावर ड्रोनद्वारे फवारणी करून एक पाऊल आधुनिक तिकडे टाकण्याचा प्रयत्न केला. यावेळी अनेक शेतकरी ही फवारणी पाहण्यासाठी उपस्थित होते. असलेले समज गैरसमज दूर करून त्यांना योग्य मार्गदर्शन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले. यावेळी कृषी सहाय्यक धर्मेंद्र क्षीरसागर, औरादे यांनी या संदर्भात प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले. यावेळी सरपंच माधव कांबळे, चेअरमन गंगाधर चव्हाण, राम पाटील, प्रगतशील शेतकरी प्रमोद पाटील व बसपुर गावातील शेतकरी उपस्थित होते.

### महात्मा बसवेश्वरमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**लातूर, दि.७ डिसेंबर -**

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात उच्च व तंत्र शिक्षण सहसंचालक कार्यालय नांदेडचे सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर यांच्या हस्ते महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. यावेळी श्री. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, ज्येष्ठ संचालक राजेश्वर बुके, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, प्राचार्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, प्राचार्य डॉ. संजय गवई. डॉ.सी.के. हारनाळे, डॉ. मोहन रोडे, डॉ. बालाजी डाकोरे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## शेतकरी संघटनेच्या आक्रमक भुमिकेपुढे साखर 'सम्राट' नरमले...

# 'मारोती'चा पहिला हप्ता २७०० रुपये; विक्रमी गाळपाचे नियोजन



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.७ डिसेंबर -**

यावर्षी गळित हंगामासाठी साखर कारखान्यांनी चिमणी पेटवून गाळपास सुरुवात केली. मात्र ऊसाचा दर जाहीर केला नाही. गेल्या हंगामात प्रत्येक कारखान्याचा वेगवेगळा भाव मिळाल्याने शेतकरी नुकसानीत आले होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य भाव मिळावा. यासाठी गेल्याच आठवड्यात पहिला हप्ता तीन हजार रुपयाचा द्यावा. अशी मागणी करीत अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा क्रांतीकारी शेतकरी संघटनेने दिला होता. याची दखल घेत औसा तालुक्यातील मारोती महाराज साखर कारखान्याने लातूर जिल्ह्यात या हंगामात पहिल्यांदाच पहिला हप्ता २७०० रुपये व पुढील रक्कम एमआरपी, साखर उताऱ्यावरुन देणार असल्याची माहिती चेअरमन शाम भोसले यांनी दिली आहे. यामुळे शेतकरी संघटनेच्या आक्रमक भुमिकेमुळे साखर सम्राट नरमले असून शेतकऱ्यांचा यातून फायदा होणार आहे.

गेल्या वर्षी पाऊस कमी झाल्याने पाण्याअभावी ऊसाच्या उत्पादनात घट झाली होती. त्याचप्रमाणे तालुक्यालगत असलेल्या लातूर व धाराशिव जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी २५०० रुपयांपासून २९०० रुपयांपर्यंतचा दर दिला होता. वर्षभर पोसलेल्या ऊसाला साखर कारखान्याकडून मिळत असलेल्या तफवतींच्या दरामुळे टनाला ४०० रुपयांचा फटका बसून शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा झटका बसला होता. एकीकडे उत्पादनातील घट आणि दुसरीकडे दरातील फरकामुळे वर्षभर पोसुनही ऊस पिकाच्या उत्पादनातून शेतकरी आर्थिक नुकसानीत आले होते.

परिणामी पाण्याची टंचाई आणि होत असलेल्या नुकसानीमुळे अनेक शेतकऱ्यांनी ऊस मोडला होता. गेल्या हंगामात मोठी तफावत असूनही कोणाचीही ओरड झाली नाही व यावर्षी जवळपास दोन्ही जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी एक महिन्यापुर्वीच गळित हंगामास सुरुवात केली. पण एकाही साखर कारखान्याने भाव जाहीर केला नाही.

त्यामुळे यावर्षी ऊसाला नेमका किती भाव मिळणार याची चर्चा शेतकऱ्यांतून सुरु होती. परंतू भाव जाहीर होत नव्हता. अशा या आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे राजेंद्र मोरे, सत्तार पटेल, अरुणदादा कुलकर्णी, नवनाथ शिंदे, राजीव कसबे, अशोक दहिफळे आदी नेतेमंडळी व पदाधिकारी यांची बैठक झाली. यावेळी साखर कारखान्यांनी ऊसाचा पहिला हप्ता ३०००हजार रुपये शेतकऱ्यांना द्यावा. अशी मागणी करीत पहिलं ऊसाला भाव जाहीर करा पुन्हा कोयतं लावा. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

सहकार महर्षी माजीमंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बेलकुंड येथील मारोती महाराज साखर कारखान्याची वाटचाल सुरु आहे. अनेक वर्षापासून बंद पडलेल्या या कारखान्याची गाळप क्षमता वाढवून या कारखान्यावरील कर्जाची परतफेड होईपर्यंत पालकत्व स्विकारलेले जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांच्या सहकार्यामुळे यावर्षी पहिला हप्ता २७०० रुपयेचा कारखान्याच्या वतीने जिल्ह्यात पहिल्यांदाच जाहीर करण्यात आला आहे.

यापुढील हप्ता एफआरपी व ऊसाला मिळणाऱ्या रिकव्हरी नुसार देण्याचा निर्णय संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती मारोती कारखान्याचे चेअरमन शाम भोसले यांनी दिली आहे. तसेच यावर्षी अधिक गाळप करण्यासाठी कारखान्याच्या वतीने नऊ हार्वेस्टर व टोळ्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले आहे. यामुळे इतर कारखान्याच्या भावाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# दोन लाखासाठी विवाहितेचा शारिरीक-मानसिक छळ

## पती, सासु, दिर, नंदेविरुद्ध गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.७ डिसेंबर -**

तालुक्यातील थेरगाव येथील मुलीचा सन २०१६ मध्ये बौद्ध धर्मीय पद्धतीने निलंगा तालुक्यातील माळेगाव (जे) येथे रितीरीवाजाप्रमाणे दत्तात्रय सुर्यवंशी यांच्याशी विवाह झाला होता. पण काही दिवस विवाहीत मुलीस चांगले नांदवले पण नंतर पतीकडून 'तु मला पसंद नाहीस मला स्लाईडींग खिडक्यांचे दुकान टाकायचे आहे'. म्हणून माहेरहून दोन लाख रुपये घेऊन ये म्हणून विवाहीतेस सासरकडील मंडळी कडून शारीरिक मानसिक छळ करून त्रास देत असल्यामुळे शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात पती, सासु सासरे, दिर, दोन नंदा यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

शिरूर अनंतपाळ पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, तालुक्यातील थेरगाव येथील रेशमा प्रेमनाथ सोनवणे यांचा सन २०१६ मध्ये रेशमा यांचा विवाह निलंगा तालुक्यातील माळेगाव (जे) येथील दत्तात्रय भानुदास सूर्यवंशी यांच्या सोबत रिती रिवाजा प्रमाणे लग्न करून दिले होते. लग्नानंतर पती दत्तात्रय सूर्यवंशी हे दारू पिऊन सतत तू मला पसंद नाहीस, असे म्हणत चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करून दररोज मारहाण करत असत तसेच सासू सविता भानूदास सूर्यवंशी, दिर दिगंबर भानुदास सूर्यवंशी दोघे राहणार माळेगाव (ता. निलंगा) व ननंद जया गौतम लांडगे (रा. पुणे) व दुसरी ननंद सरस्वती किशोर सीतापुरे (रा. मुंबई) ह्या पण काही पण सांगून शिवीगाळ देण्याची करून हाकलून धमक्या देऊ लागल्या. बाळंतपणानंतर सासरी माळेगाव (जे) येथे गेले, असता सासरच्या मंडळींनी शिवीगाळ करून मुलाला ठेवून घेऊन, आई वडीलांना व नातेवाईकाना तिथून हाकलून लावले. दत्तात्रय यांनी स्लाइडिंग डोअरचा व्यवसाय करण्यासाठी आई-वडीलाकडून दोन लाख रुपयाची मागणी केली व यावरून सासरच्या मंडळींनी मानसिक छळ केला. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली.



त्यामुळे पतीच्या कुटुंबियांकडून माझ्या संपुर्ण कुटुंबाला धोका आहे, असे या संदर्भात सासू, सासरे, पती, दीर, ननंद यांच्या विरोधात शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## देवणी तालुका संगणक परिचालक संघटनेची कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.७ डिसेंबर -**

देवणी तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत असलेल्या ग्राम पंचायत कार्यालयात कार्यरत असणाऱ्या संगणक परिचालकांच्या महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटना रजि. २८४० देवणी तालुका संघटनेची बैठक वलांडी येथील श्री खंडोबा मंदिर येथे शुक्रवारी (ता.७) आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीत नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.



बैठकीच्या अध्यक्षस्थानी संगणक परिचालक रेवण बडुरे होते. बैठकीच्या प्रास्ताविकात आनंद अंकुलगे यांनी संघटनेचे मार्गदर्शक तत्वे, ध्येय धोरणे मांडली. तसेच बैठकीत सर्वानुमते देवणी तालुकाध्यक्षपदी माधव उमाकांत कोरे तर सचिवपदी मोहसीन मुलतानीखान पठाण यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. नूतन अध्यक्ष माधव कोरे यांनी संघटनेचे नियम अटी पाळून पुढील काळात सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले.

## राधानगरीतील जिल्हा परिषद शाळेत डिजिटल बोर्डाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.७ डिसेंबर -**

औसा तालुक्यातील उजनीतील राधानगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी मिळावे. यासाठी पिण्याच्या पाण्याची सोय, ग्रामपंचायतीच्या पेवर ब्लाकच्या कामाचे व डिजीटल बोर्डाचे उद्घाटन बाजार समितीचे माजी सभापती योगीराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

सरपंच युवराज गायकवाड, ग्रा. पं. सदस्य शेखर चव्हाण, मझर पठाण, व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धेश्वर आळंगे, शब्बीर शेख, अजीज शेख, सुग्रीव वळके, दिपक चव्हाण, गोकुळ ढवण उपस्थित होते.

ग्रामपंचायतीच्या वतीने शाळेत कायमस्वरूपी पाण्याची सोय केली याबद्दल पालकांनी आभार व्यक्त केले.

तसेच शाळेच्या मैदानावर ग्रामपंचायत निधीतून पेवर ब्लॉकच्या कामाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

एम.आर. सुर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. बायस एस.सी. बायस यांनी प्रास्ताविक केले. केले. एम.टी. कांबळे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आर.डी. वैरागकर, एस.एम. सुर्यवंशी यांनी पुढाकार घेतला होता. यावेळी शाळेतील विद्यार्थी, पालक व नागरिक उपस्थित होते.

## शहर बसमधून हद्दीबाहेरील महिलांना मोफत सेवा का? नको...

# ग्रामीण भागातील महिला वर्गातून महापालिकेविषयी संताप

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.७ डिसेंबर -**

लातूर शहर महानगरपालिकेने दोन वर्षापूर्वीपासून महिलांना शहर बस सेवा मोफत चालू केली आहे. त्याला चांगलाही प्रतिसाद मिळाला. पण, आता १ जानेवारीपासून लातूर शहरातील रहिवाशी असणाऱ्या महिलांनाच मोफत शहर बस सेवा देणार असल्याचे घोषित केल्या महिला वर्गातून महापालिकेविषयी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.




लातूर शहर महानगरपालिकेच्या उपायुक्तांनी ६ डिसेंबर रोजी एक आवाहन केले आहे. त्यानुसार लातूर शहरातील रहिवाशी महिलांनी शहर बस पास (स्मार्ट कार्ड) काढावे असे आवाहन केले आहे.

१ जानेवारीपासून हे कार्ड दाखविणाऱ्या महिलांनाच शहर बसमधून मोफत प्रवास करता येणार आहे. मात्र, या शहरामध्ये हजारोंच्या संख्येने मुली, महिला ज्या बाहेरगावच्या आहेत.

शेजारच्या गावच्या आहेत. विद्यार्थीनी आहेत. त्यांना मात्र शहर बसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा मिळणार नाही. महापालिकेने सरसकट महिला म्हणून प्रत्येकीला मोफत शहर बस सेवा पुर्वीप्रमाणेच चालू ठेवणे आवश्यक असताना शहरातील रहिवाशी महिला व बाहेरगावच्या महिला असा भेद का केला असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पालिका प्रशासनाने शहरातील महिलांनाच मोफत एस.टी. प्रवासाची सोय करण्याचा जी फतवा काढला आहे. तो तात्काळ माघार च्यावा, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अनेक महिलांनी दिला आहे.

# 'चिन्मय मिशन' लातूरच्या वतीने जिल्हास्तरीय गीता पाठांतर स्पर्धेचे आयोजन

## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी होणार निवड...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.७ डिसेंबर -**

चिन्मय मिशन संस्थेची स्थापना ब्रह्मलिंग प.पू. स्वामी चिन्मयानंद यांनी इ.स. १९५१ साली केली आहे. श्रीमद्भगवद्गीता व उपनिषदे यांच्या ज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तसेच आत्मविकास व देशाचा विकास व्हावा यासाठी केली आहे. लातूर शहरामध्ये चिन्मय मिशन लातूर (चिन्मय सेवा ट्रस्ट महाराष्ट्र शाखा) यांच्या वतीने 'चिन्मय गीता पाठांतर स्पर्धा २०२४' चे आयोजन करण्यात आले.




या स्पर्धेमध्ये श्रीमद्भगवद्गीतेतील अध्याय क्रमांक ५ 'कर्मसंन्यास योग' यातील श्लोकांचे पाठांतरावर स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा बालवाडी ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती.

लातूर शहरातील पुरणमल, देशिकेंद्र, वाले इंग्लिश स्कूल, गोदावरीदेवी, लाहोटी कन्या विद्यालय, श्री श्री रविशंकर विद्यालय, शिवाजी शाळा, केशरबाई भार्गव शाळा, सरस्वती विद्यालय, शामराव पाटील विद्यालय, केशवराज माध्यमिक विद्यालय, बंकटलाल हायस्कूल, जयक्रांती विद्यालय, सदानंद माध्यमिक विद्यालय, शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल, राजा नारायणलाल लाहोटी, संत तुकाराम विद्यालय, शारदा सेमी इंग्लिश स्कूल, वेदांत बालकमंदिर व सेंट्रल हनुमान मंदिर संस्था या शाळांतील जवळपास १००० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या शाळेतील गीता पाठांतर स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना 'सहभागी प्रमाणपत्र' देण्यात येणार आहे. या शालेय स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या १८ शाळांमधील जवळपास १०० विद्यार्थ्यांची निवड जिल्हास्तरीय गीता पाठांतर स्पर्धेसाठी करण्यात आलेली आहे. ही जिल्हास्तरिय गीता पाठांतर स्पर्धा सोमवार, दि.९ डिसेंबर रोजी सकाळी १० ते सायं. ४ या वेळेत सत्संग भवन, व्यंकटेश बालाजी मंदिर, पापविनाश रोड, लातूर येथे घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यस्तरिय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे, अशी माहिती चिन्मय मिशन लातूरच्या वतीने देण्यात आली आहे.

## लालबहादूर शास्त्री विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.७ डिसेंबर -**

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक अनंतराम कोपले होते तर व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीत स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे, शिवाजीराव बिराजदार, परमानंद निलंगे, स्वाती निडवदे, अर्चना फावडे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, आशा मडके होते.

प्रमुख वक्त्या आशा मडके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याची ओळख करून देताना त्यांच्या जीवनातील काही प्रसंग सांगून अभ्यास हाच डॉ. आंबेडकर यांचा ध्यास होता असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात अनंतराम कोपले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्ष सांगून विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घ्यावी, असे मत व्यक्त केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त विद्यालयातील विद्यार्थिनींनी सलग चार तास मूक वाचन केले.

कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.